# शब्द रुची

४४

ऑगस्ट २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४८

शिक्षण नाही करता येत
'लॉकडाऊन!'




storytel
लोकसत्ता एकमेव लोकमान्य
आता ऑडिओबुक स्वरूपात ऐका!
दरमहा फक्त रू.99/- मध्ये मिळवा दर्जेदार साहित्याचा खजिना!
आजच डाउनलोड करा!
www.storytel.com या वेबसाईटला भेट द्या
किंवा QR code स्कॅन करा
App Store
Google Play
लोकमान्य
लोकमान्य टिळक स्मृतिशताब्दी
14:00
16:00
18:00
1.0x

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळ

# शब्द रुची

**ऑगस्ट २०२०, वर्ष सातवे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
**अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट : योगिता मोरे, सहकारी : सुमेधा कुवळेकर**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
✆ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**सुरेखा सबनीस**
'बुजगबाहुले जगातले' / **६**

**समीर रमेश सुर्वे**
अनेक प्रतिमांची एक प्रतिमा / **९**

स्वातंत्र्यातील बंधनं / **११**

**सानिका जगदीश सावंत**
लॉकडाऊनने दिली शिक्षणविचारांना गती / **१४**

**अपर्णा पाटील**
समकालीन / **१८**

**राज कुलकर्णी**
टाळेबंदीने उद्ध्वस्त झाला आठवडी बाजार / **२२**

**धनंजय जांगल**
अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि उदारमतवाद / **२६**

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
अध्यक्षपदाचे ट्रम्पचे प्रतिस्पर्धी ज्यो बायडन / **२९**

**विपुल विलास महागांवकर**
एनसीपीए आणि मी / **३५**

**डॉ. मोहन द्रविड**
नच सुंदरी करू कोपा / **३८**

ग्रंथाली' ग्रंथपाने / **चांगदेव काळे** / **४३**

# संपादकीय

**पा**ऊस तुफान - मुंबई ओलीचिंब. आसपास घडामोडीचाही उलटासुलटा पाऊस! आत्महत्या, कोविड सेंटर्समध्ये माणसं भेदरून शांत, दुमदुमणारे रामनाामाचे गजर, जाहीर होत जाणारे परीक्षांचे निकाल! मी फिरवत राहते कॅलिडोस्कोप अवतीभवतीच्या घटनांचा....

अचानक बातमी कानावर येते, कुणाच्या तरी मृत्यूची. सांत्वनाला न जाता घरातच गप्प आपण. बोलणं तोकडं राहतं खूपदा. 'भेटणं', 'भेट घेणं' या शब्दांना खूप अर्थ आहे, हे अधिक जाणवतं. 'उराउरी भेटणं', 'गळाभेट' या शब्दांना तर अधिकच अर्थ! स्पर्शाची उत्कट पालवी ही माणसाची गरज असते. तिची तीव्रता सध्याच्या काळात खूप जाणवते आहे.

भितीचे अडसर ओलांडून रोजीरोटीकरता माणसं घराबाहेर पडू लागली. गोरगरिबाला रोजचा घोर! त्याच्याकडे कष्टावाचून पर्याय नाही. घरात सुरक्षित राहण्याचे चोचले त्याला परवडत नाहीत. शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता होते आहे. कष्टकरी-कामकरी माणसांचा आवाज बुलंद करणारा हा लोकशाहीर. 'जग बदल घालुनी घाव' असे सांगणाऱ्या भीमरावांचा वारसा अण्णाभाऊंनी जपला. 'माझी मैना गावाकडे राहिली'सारखी त्यांची 'मुंबईची लावणी 'लोकमानसात अजरामर झाली. मुंबईत पोट भरण्याकरता आलेल्या माणसांनी इथेच बिऱ्हाड थाटले आणि ते चाकरमानी झाले. चाकरमान्यांची गावची ओढ मोठी... सणासुदीला गावी जाण्याची परंपरा चाकरमान्यांनी जपली. गौरी-गणपतीकरता अनेक चाकरमानी नित्यनेमाने गावी जातात. बातम्या पाहताना घाटात अडकलेले अनेक चाकरमानी पाहिले. सण-उत्सवांकडे सध्याच्या कोरोनाकाळात अतिशय वेगळ्या पद्धतीने पाहायला हवे. परंपरांचा, रीतीरिवाजांचा प्रचंड अभिमान आपल्याला असतो पण त्यांचा विचार काळानुसार करता यायला हवा. कालसुसंगत विचार न करता परंपरांचा पोकळ अभिमान जपणे निरर्थक ठरते. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवाऐवजी आरोग्योत्सव साजरा करणाऱ्या 'लालबागच्या राजा'ने वेगळा पायंडा घालून दिला आहे.

लोकमान्यांच्या स्मृतिशताब्दीची देखील यंदा सांगता होते आहे. स्वराज्य आणि स्वभाषेविषयीचा प्रखर अभिमान त्यांनी जागृत केला आणि परिस्थितीशी सण-उत्सवांची सांगड कशाप्रकारे घालता येते, हे दाखवून दिले. एकत्र येण्यातून समाज कशाप्रकारे बांधता येतो हे गणेशोत्सवाच्या माध्यम ातून त्यांनी सिद्ध केले. अशाप्रकारच्या संघटित समाजशक्तीची ऊर्जा किती जाज्वल्य असते हे स्वातंत्र्यलढ्याच्या संगरातून समोर आले.

विज्ञान, काळाच्या टप्प्यावरील बदल, समकालीन समस्या,काळाची गरज अशा अनेक पैलूंच्या संदर्भात सण-उत्सवांचा समग्र विचार होणे अपरिहार्य आहे.

मिरवणुका, उत्सवीकरण, कर्मकांडे यांच्या त्याच-त्याच आवृत्त्या आपण किती काळ गिरवत बसणार? आज तर कोरोनाकाळाच्या कात्रीत आपण अडकले आहोत अशा वेळी जुन्या परंपरांचा अट्टाहास कशाला? कुटुंबाचा जीव धोक्यात घालून मुंबई ते कोकण प्रवासही कशाला?

केशवसुतांच्या शब्दांतले 'नवे शिपाई' होऊन आपल्याला सतत विचार केला पाहिजे तर नवी उत्तरे मिळतील.

******

पुरुषप्रधान मानसिकतेचे हिंसक दर्शन कोरोनाकाळातही व्हावे यासारखे दुर्दैव नाही. कोविड सेंटरमध्येही बलात्कार घडल्याच्या घटना वाचून-पाहून मन अस्वस्थ झाले. कुठल्याही परिस्थितीत

बाईचा भोग घेणे हा आपला मालकी हक्क आहे, हे समजण्याची क्रूर मानसिकता संतापजनक आहे.

निखाऱ्यांवर चालूनही स्वाभिमानी स्त्री आपला मार्ग अटळपणे चालत राहते. स्टंटवुमन आजी रस्त्यावर उतरून तिची कला प्रदर्शित करताना आपण कोरोनाकाळात पाहिली. तर दुसरीकडे देहविक्री करणाऱ्या स्त्रियांनी एकमेकींना आधार देत स्वत:ला या कठीण काळात कसे तगवले हेही खोलवर भिडले. जगण्याचा आटोकाट संघर्ष आणि त्याचे नानाविध रंग...

*****

आज अवतीभवती शिक्षणाची, त्यातल्या बदलांची आणि नव्या शिक्षणपद्धतींची जोरदार चर्चा सुरू आहे.शिक्षणातून जगण्याची ऊर्जा मिळत राहिली पाहिजे खरं तर!

शिक्षकांच्या प्रत्यक्ष सहवासाचा एक फार मोठा प्रभाव विद्यार्थ्यांवर होतो अशी जगभरातील शिक्षणतज्ज्ञांची धारणा आहे. आता प्रत्यक्ष सहवासाऐवजी शिक्षकांचा 'व्हर्च्युअल' सहवास विद्यार्थ्यांना मिळणार आहे. एका बाजूला तंत्रज्ञानाची भिती, दुसऱ्या बाजूला त्यावर मात करून विद्यार्थ्यांकरता शिक्षणाच्या नव्या वाटा शोधणे अशा पेचातून शिक्षक जाताहेत. अनेक सुविद्य शिक्षक नव्या प्रयोगांना सामोरे जाण्यापासून पळ काढताहेत तर प्रयोगशील शिक्षक आव्हाने झेलण्याकरता पुढे सरसावतायत.

मुळात ऑनलाईन शिक्षणाचे प्रयोग म्हणजे शिक्षकांसाठीही एका अर्थी 'शिकणे' आहे नि गंमत म्हणजे जितके शिक्षक जास्त पदव्या घेत जातात, तितकी त्यांची शिकण्याची आच संपत जाते. ज्ञानाची जी परंपरा

आमच्या पूर्वीच्या पिढीने जोपासली ती आज अभावानेच जाणवते, ज्ञानाची कास धरणारी पिढी घडवायची तर शिक्षणाच्या नव्या वाटा शोधायलाच हव्या.

**– डॉ. वीणा सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.bom

ग्रंथाली

## भोवताल

राहुल जाधव




**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ८० रु.**

## ट्वेल्थ फेल

अनुराग पाठक




**मूल्य १९६ रु.**
**सवलतीत १२० रु.**


**व्हिक्टर फ्रँकेल. अदम्य इच्छाशक्ती बाळगणारा एक अनोखा माणूस. नाझी राजवटीच्या वरवंट्याखाली माणूसजात भरडून निघत असताना आपली आशावादी वृत्ती जागती ठेवणारा पोलादी मन:शक्तीचा, विलक्षण बुद्धिमत्तेचा चोख माणूस. ''माणूस एक प्राणी म्हणून कशाशीही जुळवून घेऊ शकतो'' हे दोस्तोव्हस्कीचं विधान उद्धृत करून फ्रँकेलनं त्याला आपल्या अनुभवांची साक्ष देऊन दुजोरा दिला आहे.**



**सुरेखा सबनीस**

# 'बुजगबाहुले जगातले'

**ए**का विपरीत पर्वाची सुरुवात झाली आहे. सुस्थिर वाटणाऱ्या व्यवस्थेचा शेवट होतो आहे की काय असं तीव्रतेनं वाटू लागण्याचे हे दिवस. हाती करण्याजोगं काहीच नाही. सर्वदूर व्यापून राहिलेली केवळ एक हताश निष्क्रियता. एक फोल विषण्णता... अशा वेळी हाती येतात काही पुस्तकं. बुडत्या मनाला या पुस्तकांच्या पानांचा आधार – गोष्टीतल्या बुडल्या मुंगीला कबुतरानं पाण्यात टाकलेल्या पानाचा मिळाला होता तसा! – आधार म्हणून ही पुस्तकांची पानं काय काय घेऊन येतात. सहज-साधं, परिचित वाटणारं काही आणि विलक्षण, अकल्पित थक्क करणारं असंही काही. पानापानावर प्रतिभावंतांचे श्वास-नि:श्वास, वेदना-संवेदना अक्षररूपानं उमटल्यावर कागदांचा कायाकल्प होऊन जातो. बुडत्याला तारण्याचा संजीवनी मंत्रच जणू.




तर पुस्तकं! हाताशी असलेली पण वाचायची राहून गेलेली काही पुस्तकं. काही खूप वर्षांपूर्वी वाचलेली आणि आता पुन्हा वाचताना नव्यानं कळलेली पुस्तकं, कागदी पानांवर, संजीवनी मंत्राची पेरणी करणारी विलक्षण ताकदीची पुस्तकं – अशांपैकीच एक अगदी छोटेखानी पुस्तक. एकशे चोपन्न पृष्ठांचं एक पॉकेट बुक. विदारक अनुभवांच्या भन्नाट जीवनरसात बुचकळून काढणारं पुस्तक. अनुभवकथनाच्या खूप पुढे जाऊन मानवी मनाच्या विलक्षण घडणीविषयी शास्त्रशुद्ध भाष्य करणारं पुस्तक. 'मॅन्स सर्च फॉर मिनिंग' लेखक व्हिक्टर इ. फ्रँकेल. मुळात हे जर्मन भाषेतलं पुस्तक. १९४६ साली प्रसिद्ध झालेलं. ग्रेट ब्रिटनमध्ये 'रँडम हाऊस ग्रूप'नं याची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित केली इ.स. २००४ मध्ये. या अनुवादित पुस्तकाचं शीर्षक झालं 'फ्रॉम डेथ कॅम्प टू एक्झिस्टँशियालिझम'. याच्या आजवर बारा लक्ष प्रती विकल्या गेल्या. इंग्रजीखेरीज जगातील अन्य एकवीस भाषांत याची भाषांतरं झाली. १९९२ पर्यंत याच्या शंभर आवृत्त्या निघाल्या. (हे लिहीत असताना हाती 'रायडर'नं प्रकाशित केलेली इ.स. २००८ची इंग्रजी आवृत्ती आहे.)


या पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिला नाझी छळछावण्यांतील अनुभवकथनाचा आणि दुसरा मानसशास्त्रातील लोगोथेरपी' विशद करणारा. (या 'लोगोथेरपी'ला फ्रँकेलनं कौतुकानं आपलं 'Foster brain child' म्हटलं आहे. याच्या संस्था आता पाच खंडांत विस्तारलेल्या आहेत.)

'मॅन्स सर्च फॉर मिनिंग' हे पुस्तक फ्रँकेलनं १९४५ मध्ये लिहिलं. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर त्याची छळछावणीतून सुटका झाल्यावर. तेही केवळ सलग नऊ दिवसांत केलेलं लिखाण. लेखक म्हणून स्वत:चा नामोल्लेख न करता हे पुस्तक प्रसिद्ध व्हावं अशी त्याची भूमिका होती. म्हणूनच पुस्तकाच्या मूळ जर्मन – प्रथम आवृत्तीवर त्याचं नाव प्रारंभी नव्हतं. मात्र मित्रांच्या अतीव आग्रहाखातर अखेरच्या क्षणी टायटल पेजवर त्याचं नाव आलं, व्हिक्टर इ. फ्रँकेल.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील एकेरी ओळ – 'The classic tribute to hope from the Holocaust' खूप काही काही सांगून जाते. काटेरी तारा आणि गॅस चेंबरची धुरांडी चितारलेल्या उदास, भयवह करड्या रंगाच्या मुखपृष्ठावरील, काटेरी तारेवर बसलेला लालसर रंगाचा, चमकत्या डोळ्याचा, पंख पसरवू पाहणारा तो इवलासा पक्षी 'मॅन्स सर्च फॉर मिनिंग'चा नेमका अर्थ सूचित करून जाणारा असाच.

हे पुस्तक मुळातच जगण्याच्या उमेदीवर संपूर्ण रोख असणारं आहे. जर्मन तत्त्वज्ञ नित्शे यांचं– ''He who has a why to live for

can bear almost any how'' हे वाक्य फ्रँकेलनं या पुस्तकात वारंवार उद्धृत केलं आहे. या संपूर्ण लेखनाचंच नव्हे तर फ्रँकेलच्या जगण्याचंही हे मूलभूत सूत्र ठरलं आहे. नाझींच्या कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्समध्ये लक्षावधी माणसं मरून गेली हे जगाला कळलेलं वास्तव आहे. मात्र फ्रँकेल दाखवतो आहे ती मेख वेगळीच. उपासमारीनं, औषधोपचारांच्या अभावानं आणि नित्याची मारहाण सोसून जितकी माणसं मरून गेली त्याहून अधिक मरण पावली ती केवळ निराशेनं. पेशानं डॉक्टर – मानसोपचार तज्ज्ञ – असणारा व्हिक्टर फ्रँकेलही त्या छळछावण्यांतील अनन्वित अत्याचार सहन करून वाचला तो केवळ त्याच्या जीजीविषेमुळेच. या पुस्तकात त्या अमानुष छळाविषयीची वर्णनं फ्रँकलेनं थोडक्यात केली आहेत. त्यानं विस्तारानं आणि ठाशीवपणे सांगितलं आहे ते अशा भयाण परिस्थितीत त्यानं जगण्यासाठी बळ कसं मिळवलं याविषयी. हिटलरच्या छळछावण्यांत असंख्य निरपराध माणसं गॅस चेंबरमध्ये गुदमरून किंवा रोगानं ग्रासून किंवा भुकेनं व्याकूळ होऊन मरून गेली. हताशेनं आणि निराशेनं संपून गेली. फारच थोडी माणसं फ्रँकेलप्रमाणे या नरकयातनांतून वाचून बाहेर आली. हे कशाच्या बळावर घडलं, तर आशावादाच्या जगण्याची उमेद कायम राखण्याच्या बळावर. फ्रँकेलला हे सांगायचं आहे. इच्छाशक्तीच्या बळाला अधोरेखित करायचं आहे.



व्हिक्टर फ्रँकेल

व्हिक्टर फ्रँकेल. अदम्य इच्छाशक्ती बाळगणारा एक अनोखा माणूस. नाझी राजवटीच्या वरवंट्याखाली माणूसजात भरडून निघत असताना आपली आशावादी वृत्ती जागती ठेवणारा पोलादी मन:शक्तीचा, विलक्षण बुद्धिमत्तेचा चोख माणूस. याचा जन्म ११९०५चा आणि मृत्यू १९९७चा. म्हणजे ब्याण्णव वर्षांचं दीर्घ आयुष्य लाभलं त्याला, तेही छळछावण्यांतल्या नरकयातना सहा वर्षं सोसल्यानंतरही. जिथे माणूस एखाद्या चिलटासारखा चिरडून संपून जावा – आणि असे असंख्य गेलेच बिचारे! – तिथून व्हिक्टर फ्रँकेल आपल्या पायांवर उभा राहून बाहेर पडला आणि ताठ कण्यानं पुढे बावन्न वर्षं जगला. छळछावणीत ढकलला जाण्यापूर्वी तो डॉक्टर होताच. व्हिएन्ना मेडिकल स्कूलमधील हा न्यूरोलॉजीचा डॉक्टर आणि सायकीअॅट्रीचा प्राध्यापक. पुढे 'पीएच.डी.' डॉक्टरही. जगभरातल्या एकोणतीस विद्यापीठांनी त्याला त्याच्या बौद्धिक कामगिरीसाठी डॉक्टरेट बहाल केल्या. फ्रॉइड आणि अॅडलर यांच्यानंतर व्हिएन्ना स्कूल ऑफ सायकोथेरपी'मध्ये फ्रँकेलचं नाव घेतलं जातं. हार्वर्ड, पिट्सबर्ग, सॅनदिअॅगो, डलास या विद्यापीठांत त्याचा 'व्हिजिटिंग प्रोफेसर' म्हणून सहभाग राहिला. 'मॅन्स सर्च...' या पुस्तकाखेरीज त्याच्या नावावर अन्य तीस पुस्तकं आहेत, ज्यांची एकूण तेवीस भाषांत भाषांतरं आली आहेत– त्याच्या 'Scintific book' ची कहाणी तर वेगळीच. खूप परिश्रमानं फ्रँकेलनं याची अभ्यासपूर्ण हस्तलिखित प्रत तयार केली आणि गेस्टापोनं त्याला अटक केली. छळछावणीकडे येताना त्यानं ती कशीबशी आपल्या कोटाच्या आत लपवून आणली. मात्र कोटासकट ती जाळून टाकली गेली. बाहेर पडल्यावर फ्रँकेलनं ते सारं पुन्हा लिहून काढलं – शिवाय त्याच्या 'लोगोथेरपी'ची मांडणी. त्याआधारे त्यानं अनेकांवर उपचार केले. ही लोगोथेरपी पाच खंडांत विस्तारत गेली. नरकयातना भोगून, मरणाला अनेक अंगांनी भिडून, सामान्य जीवनात परतल्यावर फ्रँकेलनं हे सारं केलं. नाझींच्या 'ऑशवित्झ', 'डकाहू' आणि अन्य छळछावण्यांत अपरिमित छळ भोगून आल्यावर फ्रँकेल हे करू शकला. त्या विखारी पर्वावर मात करून उभं राहिलेलं फ्रँकेलचं जगणं – नुसतं जगणं नव्हे तर लखलखीत यशस्वी जगणं – अवघ्या जगाला खूप काही शिकवून जाणारं, उमेद देणारं आहे.

''माणूस एक प्राणी म्हणून कशाशीही जुळवून घेऊ शकतो'' हे दोस्तोव्हस्कीचं विधान उद्‌धृत करून फ्रँकेलनं त्याला आपल्या अनुभवांची साक्ष देऊन दुजोरा दिला आहे. हिटलरनं ऑस्ट्रियावर आक्रमण केलं तेव्हाच या तिशीतल्या तरुण डॉक्टरला एक संधी मिळू पाहत होती सुरक्षित होण्याची. अमेरिकन वकिलातीकडून व्हिएन्नाचा इमिग्रेशन व्हिसा घेण्याचं आलेलं निमंत्रण त्यानं नाकारलं ते केवळ आपल्या वृद्ध आईवडिलांना मागे टाकून जावं लागू नये म्हणून आणि नंतर स्वीकारले ते अपरिहार्यपणे वाट्याला आलेले यातना-भोग. जबरदस्तीनं लादलेला जनावरांच्या कोंडवाड्यासारखा तो रेल्वेचा अनेक दिवसांचा प्रवास. वारंवार ऐकू येणारा, मदतीसाठी प्राणांतिक आक्रोश करत असल्यासारखा इंजिनाच्या शिट्टीचा कर्णभेदी आवाज, आपण अजून ऑस्ट्रियात आहोत की पोलंडमध्ये याचा थांगपत्ता लागू न शकणारं भोवतीचं वातावरण आणि सरतेशेवटी दृष्टीस पडणारं 'ऑशवित्झ' हे दूरवर दिसणारं धुरांडी गॅस चेंबर! मृत्यू!! केवळ भय, प्रचंड भय आणि जिवाचा थरकाप उडवणारं भयच!

गॅस चेंबरमध्ये थेट रवानगी झाली नाही त्यांच्यासाठी छळछावणीचा रौरव नरक होता. प्रत्येकाचं मूळ अस्तित्व निर्दयी टाचांखाली चिरडून टाकलेलं. तरुण, बुद्धिमान तरुण व्हिक्टर फ्रँकेलचं अस्तित्व केवळ एका क्रमांकाशी जोडलं गेलेलं. क्रमांक ११९, १०४ बस्स! दोनशे माणसांच्या जागी पंधराशे माणसांचं कोंबून राहणं. अरुंद फळकुटांवर आठ माणसांनी झोप घेणं, पावाच्या एका तुकड्यावर चार दिवस भागवणं, नग्न अस्तित्व घेऊन जगणं (!)... छळछावणीतल्या हिणकस वागणुकीला बळी पडून, मनानं खचून आणि शरीरानं थकून गलितगात्र झाल्यावर गॅस चेंबरकडे रवानगी होणं. व्हिक्टर फ्रँकेल गॅस चेंबरकडे गेला नाही याची कारणं दोन. एक – जगायचं असेल तर 'फिट' आहात हे 'दाखवा', हा अनुभवी छळछावणीवासियांनी दिलेला आणि फ्रँकेलनं कसोशीनं अमलात आणलेला सल्ला. यापायी हा डॉक्टर नाझींकडून इतर अशाच कैद्यांबरोबर एक कन्स्ट्रक्शन कंपनीला गुलाम म्हणून विकला गेला. या 'गुलामांनी' रेल्वे ट्रॅक्स टाकण्याचं प्रचंड शारीरिक दमणूक करणारं कार्य दीर्घकाळ केलं.

अधूनमधून आपल्या मृत सहकाऱ्यांची प्रेतं खड्डे खणून पुरण्याचंही! डॉक्टर फ्रँकेलला त्याच्या सुटकेपूर्वी फक्त काही आठवडे डॉक्टर म्हणून काम करण्याची संधी मिळाली– 'टायफस'च्या रुग्णांना पाहण्याची.

फ्रँकेलला गॅस चेंबरकडे जावं लागलं नाही त्याचं दुसरं कारण विशेष महत्त्वाचं आणि ते म्हणजे त्याची जन्मजात आशावादी वृत्ती. त्यानं पुन्हा पुन्हा याविषयी सांगितलं आहे. एकूणच माणूसजातीच्या आशावादाला त्यानं अधोरेखित केलं आहे. सारं काही हिरावून घेतलं जात असतानाही, माणूस परिस्थितीला कसं तोंड देतो याविषयीचं त्याचं स्वातंत्र्य मात्र कुणालाच हिरावून घेता येत नाही, हा त्याचा मंत्र आहे. परिस्थितीवर मात करता येत नसेल एकवेळ, मात्र आयुष्याचा अर्थ शोधता आला पाहिजे ही त्याची जिद्द. त्याच्या मते फ्रॉइड म्हणतो तसं मानवी आयुष्य हे 'प्लेझर' – उपभोगाची तहान नाही किंवा ॲडलर म्हणतो त्याप्रमाणे सत्तेची लालसाही नाही, तर आयुष्याचा अर्थ शोधण्याची आस ही सर्वात महत्त्वाची. हा अर्थ कसा शोधायचा? तर फ्रँकेलला याचे तीन मार्ग दिसले आहेत. धैर्य, कार्य आणि प्रेम. याची प्रचीती त्यानं छळछावण्यांतील वास्तव्यात दिलीच, त्याच्या उर्वरीत स्वतंत्र आयुष्यातही दिली आणि स्वत:बरोबरच इतरांनाही आयुष्याचा अर्थ शोधून काढण्यासाठी आपल्या लोगोथेरपीद्वारे हात दिला. छळछावण्यांतील अनन्वित अत्याचार त्यानं सोसलेच, पण ते सहन करताना तो विचार करत राहिला, नेमकं काय झालंय, नेमकं काय होतंय याचा. एक सायकियाट्रिस्ट म्हणून त्याच्या ध्यानात आले ते मानसिक प्रतिक्रियांचे टप्पे. त्या भयावह वातावरणातील पहिली प्रतिक्रिया म्हणजे घराची– आपल्या माणसांची तीव्र आठवण आणि पुढे येणारा आत्महत्येचा विचार. दुसऱ्या पायरीवरची प्रतिक्रिया म्हणजे विचित्र असंवेदनशीलता. प्रारंभी वाटणारं भय, तिटकारा, किळस हे सारं थिजून जाऊन उरणारी असंवेदनशीलता. आणि शेवटी उरणारी एक थंड उत्सुकता, विचित्र घटनाक्रम पाहताना परिस्थितीबद्दलची मूलभूत प्रतिक्रिया म्हणून येणारी थंड उत्सुकता. या उत्सुकतेनं, या विचार करण्यानं फ्रँकेलला परिस्थितीसमोर 'सरेंडर' न होता परिस्थितीबरोबर जगायला शिकवलं.

या सर्व स्तरांवर जगाताना व्हिक्टर फ्रँकेलच्या अपरिमित धैर्याची कसोटी लागलीच. त्याचं कार्य शारीरिक पातळीवरच नव्हे तर बौद्धिक पातळीवरही तेवढ्याच नेटानं चालू राहिलं, त्याबरोबरच 'प्रेम'. आयुष्याचा अर्थ शोधण्याचा तिसरा मार्ग प्रेम! छळछावण्यांतील भीषण आयुष्य जगताना फ्रँकेल एक खेळ खेळत राहिला 'मेकबिलिव्हचा' खेळ. प्रत्येक कसोटीच्या क्षणी, तुटून पडण्याच्या वेळी तो त्याच्या प्रिय पत्नीशी संवाद करत राहिला– छळछावणीत रवानगी होतानाच दूर झालेल्या, अन्य कुठल्याशा छळछावणीत पाठवल्या गेलेल्या, कदाचित तोपावेतो एखाद्या गॅस चेंबरमध्ये गुदमरून मरूनही गेलेल्या आपला जिवाभावाच्या पत्नीशी संवाद साधत राहिला. भ्रमिष्टपणे नव्हे, जाणीवपूर्वक सर्व विपरीत शक्यता लक्षात घेऊनच. या प्रेमानं फ्रँकेलला तारून नेलं.

'मॅन्स सर्च फॉर मिनिंग' फ्रँकेलच्या जगण्यातून अधोरेखित होत गेलं. हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर आणि त्याची अनेक भाषांतरं समोर आल्यानंतर यावर जगभरातून अनेक उत्तमोत्तम अभिप्राय आले. साहजिकच! कुणी याला 'timeless formula for survival' म्हटलं तर, कुणी 'Inspiring Document' न्यू यॉर्क टाइम्सनं याला 'An enduring work of survival litreature' म्हणून वाखाणलं. खरोखरच हे लिखाण चिरंतन स्वरूपाचं आहे. परिस्थितीवर आपल्या काबू नसेल एकवेळ; मात्र त्यामधील वेदना टिपत, हताश होत जाण्याऐवजी आशावाद तेवता ठेवणाराच खरा माणूस ठरतो, हे फ्रँकेल सिद्ध करून गेला.

आपले कविवर्य केशवसुत हेच सांगून गेले. त्यांचे शब्द असे :

'काय निराशा असे बरे?
बुजगबाहुले जगातले;
मूर्ख भिउनिया त्या गेले
सुज्ञ बघे तद्रुप खरे'

**– सुरेखा सबनीस**
भ्रमणध्वनी : ९००४१८८३५४
surekhass53@gamil.com

॥ग्रंथाली॥

मालवणी भाषेतील
वाक्प्रचार
आणि हुमाणी
विद्या प्रभू
मालवणी बोलीभाषेतील म्हणी
मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.







रति
विलास
मंजिरी पाटील
शृंगाररसपूर्ण
कविता, गीते, लावण्या
मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.

**‘ऋण’ या कादंबरीमधील नायिका ऋचा, जिनं वकील बनून तिच्याच वडिलांविरुद्ध एक अभूतपूर्व लढा दिला, जीवघेण्या संघर्षाचा सामना केला, प्राणपणानं लढली, ती खऱ्या आयुष्यामधील ऋचा नीला सत्यनारायण यांच्या संपर्कात होती. मॅडमनी तिला बरंच सहकार्य केलं होतं. ‘तुझ्याविना’ कादंबरीमधील नायिकेला तर त्यांनी स्वतः सांभाळलं. तिच्या मागे सर्व शक्तिनिशी उभ्या राहिल्या. असा कृतिशील लेखक मी आधी कधी पाहिला नाही.**



**समीर रमेश सुर्वे**

# अनेक प्रतिभांची एक प्रतिमा

आज नीला सत्यनारायण या माजी आयएएस अधिकारी, माजी महाराष्ट्र निवडणूक आयुक्त, लेखिका या आपल्यात नाहीत. २०१७ साली मी त्यांच्या संपर्कात आलो. मी चित्रपट दिग्दर्शक आहे. या आधी व. पु. काळे यांच्या ‘पार्टनर’ या सुप्रसिद्ध कादंबरीवर आधारित ‘श्री पार्टनर’ हा मराठी सिनेमा मी दिग्दर्शित केला होता. तो चित्रपट एका निर्मात्याला माहीत होता. त्यांना नवा चित्रपट तयार करायचा होता.

एके दिवशी त्यांनी मला फोन केला. मी भेटलो आणि त्यांनी माझ्या हातामध्ये एक पुस्तक ठेवलं आणि ते वाचायला सांगितलं. ती ‘तुझ्याविना’ नावाची कादंबरी होती. त्याच्या लेखिका नीला सत्यनारायण होत्या. मला आश्चर्य वाटलं. मी निर्मात्यांकडून खात्री करून घेतली की या नीला सत्यनारायण म्हणजे माजी महाराष्ट्र निवडणूक आयुक्त आहेत का ? तर निर्मात्यांनी होकार दिला. ते नुकतंच नीलामॅडम ना भेटून आले होते आणि मराठी चित्रपटासाठी त्यांनी ‘तुझ्याविना’ ही त्यांची कादंबरी निवडली होती. मी सुखावलो, कारण त्यात दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे मला पुन्हा एकदा कादंबरीवर आधारित मराठी चित्रपट दिग्दर्शित करायची संधी मिळाली होती आणि दुसरी, नीला सत्यनारायण यांची ती कादंबरी होती. मुळातच नीलामॅडम लेखिका आहेत हे मला तोपर्यंत माहीत नव्हतं. त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला निवडणूक आयुक्त होत्या, शिवाय राजकारण हा माझा नेहमीच आवडता विषय राहिलाय. त्यामुळे निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची कामगिरी मला माहीत होती आणि त्यांच्या कामगिरीमुळे मॅडमबद्दल मनात आदराची भावना होती. आता उत्सुकता होती त्यांच्या लिखाणाची. मी ताबडतोब त्यांची कादंबरी वाचायला घेतली.

कादंबरी वाचून झाल्यावर मी त्या गोष्टीनं प्रभावित झालो. निर्मात्यांशी बोलून मॅडमना भेटायचं ठरवलं. त्यांच्या घरी भेटायला गेलो तेव्हा एक लेखिका यापेक्षा त्यांची माजी आयएएस अधिकारी, निवडणूक आयुक्त, ही ओळखच मनावर जास्त दडपण आणत होती. त्यांच्या ऑफिसमध्ये वाट पाहत बसलो असताना ऑफिसच्या भिंतीकडे लक्ष गेलं तर फक्त पुस्तकं पुस्तकं आणि पुस्तकंच दिसत होती. आणि विशेष म्हणजे त्यातील बरीच पुस्तकं नीलामॅडमनी लिहिली होती. कविता, लघुकथा, कादंबरी, ललित अशा पुस्तकांचा संग्रह होता. ते पाहून तर मी अवाकच झालो आणि विचार करू लागलो की लिखाण हे या व्यक्तीचं वेड असल्याशिवाय एवढी पुस्तकं लिहिणं शक्य नाही. हळूहळू माझ्यावर असलेलं दडपण कमी होऊ लागलं. तेवढ्यात मॅडम आल्या. समोर त्यांच्या खुर्चीवर बसल्या आणि बोलू लागल्या. माझी दिग्दर्शकाची नजर नेहमीच समोर कॅरेक्टरशी शोधत असते. पहिल्यांदा मला इथे एक गंमत जाणवली ती म्हणजे समोर बसलेल्या नीला सत्यनारायण यांची देहबोली ही एका प्रशासकीय अधिकाऱ्याचीच होती पण त्यांच्या तोंडी एक संवेदनशील लेखिका बोलत होती. माझ्यासाठी तो साक्षात्कारच होता. पहिल्यांदाच मी अशी व्यक्ती अनुभवत होतो. एकाच वेळी मी दोन प्रतिमांना सामोरं जात होतो त्यामुळे थोड्या अवघडलेल्या स्थितीत होतो. पण त्या बोलू लागल्या तसा मनावरचा ताण कमी होऊ लागला. त्यांचं शांत आणि मृदू बोलणं माझ्या मनाचा ठाव घेत होतं. त्यांनी माझा पहिला चित्रपट पहिला होता आणि तो त्यांना आवडलाही होता. त्याबद्दल त्या बोलू लागल्या. मग पुढचं संभाषण माझ्यासाठी सोपं झालं. मी माझ्याबद्दल बोलत गेलो तशा त्याही त्यांच्याबद्दल मन मोकळेपणानं बोलू लागल्या.

कादंबरीवर सिनेमा करत असताना, एक दिग्दर्शक म्हणून मी माझी प्रामाणिक भूमिका स्पष्ट केली. ती त्यांना पटली. लगेच त्यांनी त्यांच्या ड्रॉवरमधून त्यांची एक अप्रकाशित कादंबरी काढली आणि माझ्या हातात सोपवत असताना त्या म्हणाल्या, या कादंबरीवरही उत्तम सिनेमा होऊ शकतो. तुम्ही वाचा आणि ठरवा. त्यांनी फक्त ती अप्रकाशित कादंबरी माझ्या हातात दिली नव्हती तर माझ्यावर

पहिल्याच भेटीत एक विश्वास दाखवला होता. मी ती अप्रकाशित कादंबरी वाचली, जिचं नाव होतं ‘ऋण’ आणि हादरून गेलो. त्यातील गोष्ट, घटना, पात्रं यांनी मी पुन्हा प्रभावित झालो आणि याच कादंबरीवर सिनेमा करायचा हे मनाशी ठरवलं. मी मॅडमना पुन्हा भेटलो आणि त्यांना तशी कल्पना दिली.. त्यांनीही लगेच होकार दिला. तेव्हा कळलं की ती कादंबरी एका सत्यघटनेवर आधारित आहे. किंबहुना त्यातलं बहुतांश लिखाण हे सत्यघटनांवर आधारितच आहे.

‘ऋण’ कादंबरीवर आधारित ‘जजमेंट’ हा मराठी सिनेमा तब्बल तीन वर्षांनी पडद्यावर साकारला गेला. नीलामॅडमची प्रतिक्रिया माझ्यासाठी महत्त्वाची होती. त्यांनी सिनेमा पाहिला आणि त्याचं भरभरून कौतुक केलं. तसं मीडियासमोरही सांगितलं. शिवाय खाजगीत त्यांनी त्यांच्या कादंबरीला, त्यातील पात्रांना सिनेमामध्ये न्याय मिळाल्याचं आवर्जून सांगितलं. या सिनेमाच्या संपूर्ण प्रवासात मी मॅडममधील कुटुंबाची काळजी करणारा पालक अनुभवला.... खऱ्या आयुष्यामध्येही त्या सर्वोत्तम होत्या. आयएएस ऑफिसर म्हणून त्यांची कारकीर्द स्वच्छ आणि निष्कलंक राहिली. त्या एक उत्तम पत्नी, आई, गृहिणी, लेखिका, संगीतकार, वक्त्या आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे माणूस म्हणून त्या सर्वोत्तम होत्या. अशा महान व्यक्तीचा सहवास लाभणं म्हणजे माझं भाग्यच मानतो.

नीला सत्यनारायण हे एक सामाजिक रसायन होतं. सरकारी पदावर काम करत असताना त्यांना आलेले चांगलेवाईट अनुभव, त्याबद्दलच्या त्यांच्या भावना, प्रतिक्रिया त्यांनी त्यांच्या लेखनात उतरवल्या होत्या. एवढंच नव्हे तर ज्या वास्तवातील व्यक्तींवर त्या लिखाण करायच्या, त्या व्यक्तिरेखा नीलामॅडमच्या व्यक्तिगत जीवनाचा भाग झाल्या होत्या. उदाहरणार्थ, ‘ऋण’ कादंबरीमधील नायिका ऋचा, जिनं वकील बनून तिच्याच वडिलांविरुद्ध एक अभूतपूर्व लढा दिला, जीवघेण्या संघर्षाचा सामना केला, प्राणपणानं लढली, ती खऱ्या आयुष्यामधील ऋचा त्यांच्या संपर्कात होती. मॅडमनी तिला बरंच सहकार्य केलं होतं. ‘तुझ्याविना’ कादंबरीमधील नायिकेला तर त्यांनी स्वतः सांभाळलं. तिच्या मागे सर्व शक्तीनिशी उभ्या राहिल्या. असा कृतिशील लेखक मी आधी कधी पाहिला नाही.

एक लेखक क्रांती घडवू शकत नाही तर त्याचे विचार किंवा लिखाण क्रांतीसाठी पोषक वातावरण तयार करू शकतात, पण एखादा लेखक स्वतःच क्रांतिकारी असेल तर काय? नीला सत्यनारायण या क्रांतिकारी लेखिका होत्या. समाजामध्ये सामाजिक क्रांती घडवून आणण्याची त्यांची क्षमता होती. याची प्रचीती लहान मुलांपासून त्यांच्या आईबाबांपर्यंत, तुरुंगातील कैद्यांचं प्रबोधन ते त्यांच्या परिवाराचं भविष्य, समाजातील शोषित-पीडितांसाठी त्यांना वाटणारी तळमळ ते प्रशासकीय अधिकारी, राजकारण आणि त्यातील भ्रष्टाचार, अशा वेगवेगळ्या विषयांवर त्या वेळोवेळी भाष्य करत आणि जमेल तेव्हा त्या संदर्भात प्रत्यक्षात कृतीही करत. सरकारी अधिकाऱ्याप्रमाणे त्या वेळ ठरवून लिखाणाला बसायच्या, ठरवून त्या लिहायच्या आणि





बसल्या की सुचलेलं आपोआप कागदावर उतरायचं. मग लघुकथा, कादंबरी, कविता, गाणी काहीही असो. लेखनाची प्रतिभा त्यांच्याकडे जन्मजातच होती असं वाटतं. त्यामुळे त्या पेशानं प्रशासकीय अधिकारी असल्या तरीही मुळात त्यांचा पिंड हा लेखकाचाच होता.

त्यांच्याशी माझं शेवटचं संभाषण नुकतंच ६ जुलै २०२० रोजी झालं होतं. या लॉकडाऊनच्या काळात त्या रोजनिशी लिहीत होत्या. तिचं त्यांनी ‘लॉकडाऊन डायरी’ नावानं पुस्तक लिहिल्याचं कळवलं होतं, शिवाय ते पुस्तक लवकरच ऑनलाइन प्रकाशित करणार असल्याचंही सांगितलं होतं. नेहमीच त्यांचं नवीन लिखाण किंवा पुस्तक प्रसिद्ध होणार असेल तर त्या मला कळवायच्या. मग मी त्यांचं अभिनंदन करायचो, हे नेहमीचंच ठरलेलं होतं. तसंच नेहमीप्रमाणे मी त्यांचं अभिनंदन केलं, पण आज कळतंय ते शेवटचं अभिनंदन होतं. एरवीच्या आणि या वेळेच्या अभिनंदनामधील फरक मी समजू शकलो नाही.... या कोरोना महामारीच्या काळात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे आणि प्रत्येक घटनेचे अर्थ, त्यांचे संकेत वेगळे आणि विचित्र आहेत, कदाचित आपल्या कल्पनेपलीकडचे आहेत.... त्या पातळीवर जेव्हा त्यांच्या ‘लॉकडाऊन डायरी’कडे पाहतो तेव्हा समजतं की यावेळचं त्यांचं लिखाण हेही नेहमीसारखं नव्हतं .... ही ‘लॉकडाऊन डायरी’ म्हणजे त्यांच्या मनातली ‘घुसमट’ आहे. त्या घुसमटीबद्दल मला थोडी कल्पना आहे... मनातली घुसमट कागदावर मांडून त्यांनी आज या जगाचा निरोप घेतलाय... म्हणून त्रास होतोय. मॅडम आयुष्याला घेऊन फार पॉझिटीव्ह होत्या. त्या संघर्ष करणाऱ्या योद्धा होत्या. कोरोना या महामारीविरुद्धची लढाईही त्या शेवटच्या श्वासापर्यंत लढल्या, पण शेवटी.... आज त्या आपल्यात नाहीत हेही सत्य आहे.... त्यांच्या जाण्यानं आज बऱ्याच जणांनी आपला आधार गमावला आहे.


नीला सत्यनारायण यांच्यासारखी व्यक्ती आपण गमावणं हे आपलं सामाजिक नुकसानच आहे म्हणूनच ही पोकळी नक्कीच भरून काढता येणार नाही, असं मला वाटतं.

**– समीर रमेश सुर्वे**
भ्रमणध्वनी : ९३२४०९७३३५
sameer111surve@gmail.com

**कोरोनाकाळात आल्यामुळे यंदा स्वातंत्र्यदिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यावर बंधनं आली आहेत. या पार्श्वभूमीवर काही मान्यवरांनी त्यांची स्वातंत्र्य आणि बंधनाविषयीची मते, स्वातंत्र्याविषयीची त्यांची संकल्पना आणि निरीक्षणे सांगितलेली आहेत. संयम, समानता, सत्कर्म आणि स्वातंत्र्यातली जबाबदारी हे महत्त्वाचे मुद्दे या मान्यवरांनी मांडलेले आहेत.**

# स्वातंत्र्यातील बंधनं

## संयमी स्वातंत्र्य हवेच!



**डॉ. गिरीश जाखोटिया**

'**स्वा**तंत्र्य' ही मानवाची मूलभूत ऊर्मी आणि गरज आहे, याबाबतीत दुमत होऊ नये. परंतु आज अमेरिकेतील कौटुंबिक जीवन व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अतिरेकाने दूषित झाले आहे आणि आखाती देशांमध्ये ते जवळपास नसल्याने तेथील सामाजिक व्यवस्था ही रोगट डबक्यासारखी झाली आहे. यास्तव स्वातंत्र्य आणि संयम या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे मान्य करावे लागेल. 'स्वयंसंयम' हा 'बाह्यबंधना'पेक्षा प्रगल्भतेच्या अंगाने केव्हाही चांगला कारण 'बाह्यबंधन' हे बऱ्याचदा जाचक वाटते. एखाद्या समाजाच्या किंवा देशाच्या एकूणच प्रगल्भतेच्या स्तरानुसार स्वयंसंयम आणि बाह्यबंधनाचे मिश्रण ठरत असते.

स्वातंत्र्य आणि बंधन यांचे संयमित मिश्रण आज कोरोनाच्या खडतर कालखंडात दिसत नाही. अर्थकारणासाठी चाकरमान्यांना बाहेर पडणे गरजेचे आहेच परंतु त्यासाठी शिस्त आणि प्रशासकीय आधाराची गरज आहे. लोकांनी स्वयंप्रेरणेने सरकारी यंत्रणेशी याबाबतीत सहकार्य करायला हवे. सरकारी घटकांमध्येही सुनियोजन पुरेसे दिसत नाही. यामुळे लॉकडाऊनचे व्यवस्थापन विस्कळित झाले आहे. स्वातंत्र्य आणि बंधन या कोरोनातील दोन गोष्टींची आपण नीटपणे काळजी घ्यायला हवी.

माझ्या लेखनात आणि भाषणात बाह्यबंधनांचा संदर्भ मला लक्षात ठेवावाच लागतो. एखाद्या समाजाचे किंवा अत्यंत आदरणीय अशा राजकीय वा धार्मिक नेत्याचे तार्किक मूल्यमापन करण्याचे भारतात आज तरी पूर्ण स्वातंत्र्य नाही. येथे लोकांच्या भावना सोयीनुसार लगेच दुखावतात. बदनामी आणि तार्किक मूल्यमापनातील फरक लोकांना राजकीय मंडळी सहसा सांगत नाहीत. याबाबतीत लोकांमधील संभ्रम त्यांना 'फोडा आणि झोडा' या राजनीतीसाठी हवाच असतो.

लेखन आणि भाषणातील स्वातंत्र्य हे साधारणपणे योग्य पुरावे देऊन उपभोगले पाहिजे हे मान्य. परंतु लोकांना पुरावेच स्वीकारायचे नसतील तर लेखकाची व वक्त्याची मोठी अडचण होते. बऱ्याच पश्चिमी लोकशाहीवादी देशांमध्ये तर्कनिष्ठ लेखनाचेही स्वागत केले जाते, जरी पुरेसे पुरावे नसले तरी. याचे साधे कारण असे की सत्यान्वेशी लेखन-भाषणाची सुरुवात ही नेहमी तर्कानेच होते.

भारतातील लेखन-भाषणस्वातंत्र्याबाबत आम्हाला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. एखादा गरीब शेतकरी आपल्या गावी जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध बोलून तेथेच सुखेनैव राहू शकला किंवा एखादी तरुण पीडिता जवळच्याच नातेवाईकांनी दिलेल्या त्रासाबद्दल धैर्याने बोलू शकली तर ते खरे स्वातंत्र्य. मुंबईत राहून उत्तर प्रदेशातील राजकीय गुंडगिरीबद्दल मी लिहू शकतो परंतु हेच लेखन मी त्या राज्यातील तालुक्यात राहून करू शकणार नाही. लेखन-भाषणाच्या स्वातंत्र्याबद्दल आपले मिथ्याकथन थांबले पाहिजे!

## संधींच्या समानतेच्या प्रतीक्षेत



**अच्युत गोडबोले**

अनेकदा आपण 'स्वातंत्र्य' या संकल्पनेला ठरावीक चौकटीत ठोकूनठाकून बसवायचा प्रयत्न करतो. मला वाटते की ते टाळून स्वातंत्र्य या संकल्पनेच्या अर्थाचा शोध घ्यायला हवा. भारतातल्या प्रत्येक व्यक्तीला, अगदी तळागाळातल्या प्रत्येकाला किमान सोईसुविधा मिळतील, तेव्हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळेल. या सोईसुविधा म्हणजे परवडणारा निवारा, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक अशा प्रत्येकाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी. शिक्षणाविना उदरनिर्वाहासाठी जगण्याचे साधन काय आणि त्यामुळे त्यांचा सध्याच्या जगात निभाव कसा लागणार? मुळात आपल्याकडे बेकारांची संख्या लक्षणीय आहे आणि करोनामुळे त्यात भरच पडते आहे, पडणार आहे. कोणत्याही पक्षाच्या किंवा सरकारच्या समर्थनार्थ किंवा विरोधात बोलायचे म्हणून मी बोलत नाही; पण १९९१ पासून आपण जे जागतिकीकरण स्वीकारले आहे, त्याचा लाभांश तळागाळातल्या लोकांपर्यंत पोचलेला नाही. त्यामुळे आर्थिक विषमता प्रचंड वाढलेली दिसते.

सध्याची बदललेली जीवनशैली आणि वाढत्या चंगळवादी वृत्तीमुळे पर्यावरणावर परिणाम होत असून ते प्रदूषित होत आहे. प्रदूषणाचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होत आहे, तसा तो चंगळवादामुळे निर्माण होणाऱ्या विषमतेमुळे लोकांच्या मानसिकतेवरही होतो आहे. हे टाळायचे असेल तर सगळ्यांना समान तऱ्हेने समान गोष्टी मिळणे गरजेचे आहे. वर्षानुवर्षे अस्तित्वात असणाऱ्या जातीद्वेषाला, स्त्रीभ्रूणहत्या, बलात्कार, घरगुती हिंसाचार अशा अद्यापही आपल्या आसपास उद्भवणाऱ्या प्रश्नांना उत्तरे मिळाली पाहिजेत. पाणीप्रश्न, वीजप्रश्न, बेकारी, आरोग्याचा प्रश्न असे काही प्रश्न कायमचे ठाण मांडून बसलेले आहेत. पाण्यासाठीची वणवण असो किंवा विजेच्या लपंडावाचा फटका दैनंदिन जीवनासह लघू आणि मध्यम स्तरांवरच्या उद्योगांना बसतो हे लक्षात घ्यायला हवे. या समस्यांच्या मुळाशी जाऊन त्या सोडवायला हव्यात. आपल्याला आत्मनिर्भर व्हायचे असेल तर आपली अर्थव्यवस्था सक्षम केली पाहिजे. चीन, दक्षिण कोरियासह अनेक देशांमध्ये रस्ते, पाणी, वीज, आरोग्यादी बाबींवर सर्वाधिक खर्च केला जातो. आपलाही या क्षेत्रांसाठी विशेषतः आरोग्यक्षेत्रासाठीचा खर्च वाढायला हवा. सर्वांना समान संधी उपलब्ध करून द्यावी लागेल, त्यामुळे मग मर्यादित प्रमाणात का होईना प्रगती होईल. त्यात कुणा हाती सायकल असेल तर कुणाकडे मर्सिडिज. हे घडले तर खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा संकल्पनेचा अर्थ प्रत्यक्षात येईल. आपली मते लोकांना ठामपणे मांडता येतील. लोकशाहीची संकल्पना असणाऱ्या स्वातंत्र्याचा हा पाया भक्कम असायला हवा.

## सत्कर्माचे स्वातंत्र्य



**कौस्तुभ विकास आमटे**

'स्वातंत्र्य' हा शब्द माझ्या मते सर्वस्वी आपल्या मनाशी निगडित आहे. जी व्यक्ती 'मनाचा राजा' ती स्वतंत्र. 'आपण आपल्या मनाचे राजे' हे संबोधन एखाद्याच्या मते अनियंत्रित कृतीकडे झुकू शकते, पण माझ्या मते मनाचा राजा म्हणजे अशी व्यक्ती जिने स्वतःचं तंत्र विकसित केले, स्वतःची व्यवस्था निर्माण केली आहे आणि स्वतःच्या कृतीवर जिचे बंधन आहे. पर्यायाने, अशी व्यक्ती ज्ञानमार्गी, शिस्तप्रिय, जबाबदारीने वागणारी आणि 'रॉयल' असणार हे आलेच!

स्वातंत्र्यास फक्त १५ ऑगस्टच्या परिप्रेक्ष्यात बसवणे, बघणे अपुरे आहे असे मला वाटते. 'का?' ते सांगतो. 'सर्च' या गडचिरोलीस्थित सामाजिक संस्थेत कार्यरत असलेला माझा मित्र डॉ. आनंद बंग सोमनाथच्या श्रम-संस्कार छावणीस वक्ता म्हणून आला होता. त्याला एका शिबिरार्थ्याने प्रश्न केला, ''सर, देशाच्या वाढत्या लोकसंख्येबद्दल आपलं मत काय?'' त्यावर डॉ. आनंद म्हणाला, ''माणसं 'किती' आहेत यापेक्षा माणसं 'कशी' आहेत हे अधिक महत्त्वाचं!'' हे वाक्य माझ्या मनात घर करून राहिले. माणसे 'कशी' आहेत यावर समाजाच्या स्वातंत्र्याचे भवितव्य ठरणार.

कोरोना हे जरी असाधारण संकट असले तरी यास समाजाच्या प्रत्येक स्तरातील व्यक्तींचा प्रतिसाद हा एरवीपेक्षा काही आगळा होता/आहे असे मला वाटत नाही. यात आपल्याला जसे हातावर पोट असणारे बहुजन 'पर्याय नाही' म्हणून बाहेर कामावर दिसले तसे घरी बसून करमत नाही म्हणून 'चलो घुमके आते है' म्हणत उंडरणारेही पोटभरू दिसले. सरकारचे लॉकडाऊनचे आदेश काटेकोरपणे पाळणारे

दिसले तसे इतरांनी निर्माण केलेल्या तर्कशून्य भयगंडाला बळी पडणारेही दिसले. कोरोना वॉर्डमध्ये पीपीई सूट्स घालून, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता अखंड कार्यरत असणारे डॉक्टर्स, नर्सेस दिसले तसे कोरोनावॉर्डमध्ये काम करतात म्हणून याच डॉक्टर्स, नर्सेसना त्यांच्याच सोसायटीत प्रवेश नाकारणारेही दिसले.


नाझींच्या छळछावणीतील कैदी असलेले प्रख्यात मानसरोगतज्ज्ञ डॉ.व्हिक्टर फ्रँकेल यांनी स्वानुभवावर आधारित 'मॅन्स सर्च फॉर मिनिंग' हे पुस्तक लिहिले. त्यात ते लिहितात, ''स्टॅच्यू ऑफ लिबर्टी ऑन द ईस्ट कोस्ट बी कॉम्प्लिमेंटेड बाय स्टॅच्यू ऑफ रिस्पॉन्सीबिलिटी ऑन द वेस्ट कोस्ट.'' अर्थात, स्वातंत्र्य हे जबाबदार वर्तनाविना अर्धसत्यच आहे. त्यामुळे कोरोनाकाळात जे घडले त्यात जेथे व्यक्तिस्वातंत्र्यास जबाबदार वर्तनाची जोड होती तेथे विवेक शाबूत असलेले दिसले, मानवतेचे पुजारी दिसले. तर बाकी ठिकाणी आत्मकेंद्री, बेमुर्वतखोर गणंगही दिसले. माझ्या मते स्वातंत्र्य आणि बंधन या बाबतीत हे असे एरवीही असतेच की! कोरोनाने यातले काही बदलले असे नाहीच.

डॉ. अनिल अवचटकाका एक गोष्ट फार छान सांगतात, ''एखादं कुकर्म करायचं असेल तर माणसाच्या मनात शंभर शंका आधीच डोकावतात- कुणी मला हे करताना पाहील का? हे सर्वांना कळलं तर काय? पोलीस मला पकडतील का? वगैरे... पण सत्कर्माचं मात्र याउलट असतं! सत्कर्म म्हणजे अमर्याद संधी! त्यात ना काही छोटं-मोठं, ना कसली भीड! लगे रहो'हा मंत्र जपत तुम्ही कार्यरत राहू शकता...'' 'सामाजिक कार्या'च्या क्षेत्रात गाडून घेऊन काम करणाऱ्या मंडळींना अभिप्रेत असलेला स्वातंत्र्याचा अर्थ यापेक्षा वेगळा तो काय असणार? येथे 'सत्कार्य'रूपी संधी अमर्याद आहेत. शिवाय आपली स्पर्धाही आपल्याशीच! बस पाऊल उचलायची देरी आहे!

## स्वतंत्रते भगवते

सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक अल्बर्टकामू याचे एक वाक्य आहे- 'Freedom is nothing but a chance to be better.' माझी स्वातंत्र्याची व्याख्या कामूच्या या विधानाशी मिळतीजुळती आहे. सम ाजातील प्रत्येकाला उत्कर्षाची संधी उपलब्ध असणे हे स्वातंत्र्य आहे.

स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या दोन बाजू आहेत. 'Freedom to' आणि 'Freedom from' या त्या दोन बाजू. काही गोष्टींचे स्वातंत्र्य मिळण्याआधी काही गोष्टींपासून स्वातंत्र्य मिळणे गरजेचे आहे - पूर्वग्रहापासून स्वातंत्र्य, गुलामी मनोवृत्तीपासून स्वातंत्र्य, अज्ञानापासून स्वातंत्र्य! आणि यात शिक्षण हा मला फार महत्त्वाचा दुवा वाटतो. भारताच्या प्राचीन विद्यापीठांच्या दरवाजावर लिहिलेले असायचे- 'सा विद्या या विमुक्तये' - जे मुक्त करतं ते शिक्षण! राजकीय व्यवस्था किंवा घटना यातून आपल्याला 'Freedom to' मिळते; पण शिक्षण आपल्याला- 'Freedom from' मिळवून देतं.



**कौशल इनामदार**

स्वातंत्र्य काय आहे हे पाहण्याकरता स्वातंत्र्य म्हणजे काय नाही हे पाहायला पाहिजे. अराजकता म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. मनमानी करणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. स्वातंत्र्याला चौकट हवी. ''तुला हात फिरवायचं पूर्ण स्वातंत्र्य आहे, परंतु जिथे माझं नाक सुरू होतं तिथे तुझं स्वातंत्र्य संपतं.'' ही स्वातंत्र्याची चौकट प्रत्येकाला समजायला हवी.

अतिसूक्ष्म, निर्गुण, निराकार आणि अदृश्य तरी अक्राळ-विक्राळ अशा शत्रूचं अस्तित्व ज्यांना झेपत नाही ते जात, धर्म यांच्या निकषांवर क्षुल्लक शत्रू निवडतात. परंतु साखळदंडांचा मनसोक्त खडखडाट करता येणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. आणि दुसरा धडा असा, की आपण निसर्गाशी आपल्या नात्याची बूज राखणे हे बंधन वाटले तरी ती आपल्या स्वातंत्र्याची गरज आहे. आपण आपली हद्द सोडून निसर्गाच्या हद्दीत अतिक्रमण केले तर निसर्गही आपल्या जीवनात हस्तक्षेप केल्याशिवाय राहणार नाही.

मी संगीतकार आहे म्हणून संगीतातून मिळालेला एक दृष्टांत सांगतो. 'बंदिश' असल्याशिवाय उपज करता येत नाही! स्वतंत्र समाज हा एका हिंदुस्थानी संगीतातल्या रागपद्धतीसारखा आहे. एखाद्या रागात तुम्ही वर्ज्य स्वर लावला तर ते स्वातंत्र्य नसून अज्ञानाचे द्योतक आहे. अज्ञानाच्या बेड्यांचा खडखडाट केल्याने स्वातंत्र्य सिद्ध होत नाही हे एका सुसंस्कृत समाजाने कायम ध्यानात ठेवायला हवे. भारताने स्वातंत्र्याची किंमत मोजलेली आहे. ते आपल्याला फुकट मिळालेले नाही, हे ज्या दिवशी विसरू त्या दिवशी पुन्हा पारतंत्र्याच्या अंधारात लोटले जाऊ. स्वातंत्र्य एकाच वेळी हक्कही आहे आणि जबाबदारीही. यात कायम जबाबदारीचेच पारडे जड राहील हे आपण नागरिक म्हणून पाहायला हवे.

संकलन
**राधिका कुंटे**
kunte.radhika@gmail.com

**सध्या टाळेबंदीतील भाषाशिक्षण, मुलांचं सहजशिक्षण यांसारख्या विषयांवरील वेबिनारमध्ये शिक्षक सहभागी होऊ लागले आहेत. शासनातर्फेही ऑनलाइन टीचिंग, पी.पी.टी. आणि व्हिडिओ मेकिंग याप्रमाणे टाळेबंदीच्या काळात मुलांवर व शिक्षकांवर येणाऱ्या ताणाचं व्यवस्थापन कसं करावं अशा विषयांवर प्रशिक्षणं आयोजित केली जात आहेत. यातील बरीचशी प्रशिक्षणं ही मोफत आहेत. या प्रशिक्षणांमुळे विविध अंगांनी शिक्षक समृद्ध होत आहेत.**



**सानिका जगदीश सावंत**

# लॉकडाऊनने दिली शिक्षणविचारांना गती

**घर १**
पंकज – बाबा, आज ताईंनी कोणती कृती दिलीय करायला?
बाबा – अरे थांब, अजून पाठवलं नाही काही.
**घर २**
सुरभि – आई, आधी मी घेणार मोबाइल. मला ऑनलाइन क्लास आहे.
तुषार – ए नाही हं, मला टीचरनं होमवर्क दिलाय. तो व्हिडिओ बघून क्राफ्ट करायचंय.
सुरभि – आई, सांग ना याला.
आई – झालं तुमचं सुरू? याच्यापेक्षा शाळा परवडली.
**घर ३**
बाबा – आज अशा वस्तू शोधायच्या आहेत ज्यांचं इंग्रजी नावच आपण वापरतो.
वरुण – चला शोधूया.

हे असे संवाद सध्या घराघरात सुरू आहेत. गोरेगाव, मुंबई येथील आमच्या डोसीबाई जीजीभॉय प्राथमिक शाळेतील मुलेसुद्धा पालकांसोबत वेगवेगळ्या कृतींचा आनंद घेत आहेत. सध्या टाळेबंदीमुळे शाळा बंद आहेत, पण प्रत्येक घरात मात्र आता शाळा सुरू झाली आहे. यानिमित्ताने आपल्या मुलाच्या शिकण्याकडे बघण्याची पालकांना आणि स्वत:च्या कामाकडे बघण्याची संधी शिक्षकांना मिळाली आहे.

खरं म्हणजे घर हीच मुलाची पहिली शाळा असते. मूल जन्माला आल्यापासूनच त्याची शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. रांगणं, चालणं, बोलणं, स्वतःच्या हातानं खाणं या सर्व गोष्टी मूल शिकतं ते अनुकरणातून. चुकत–माकत, पडत–धडपडत, अनुभव घेत घेत आजूबाजूला असणाऱ्या माणसांच्या मदतीनं. मग थोडं मोठं झाल्यावर निसर्गात घडणाऱ्या घटनांचा अर्थ लावत लावत मूल शिकतं. ही सगळी प्रक्रिया सहज–सुलभ असते. डोळ्यांनी बघणं, कानांनी ऐकणं, जिभेनं चव घेणं, नाकानं वास घेणं, हातानं स्पर्श करणं या पंचेंद्रियांच्या अनुभूतीसोबत अंदाज बांधणं, निरीक्षण करणं, प्रत्यक्ष करून बघणं अशा अनेक मार्गांनी मुलाचं शिक्षण सहजतेनं होत असतं.

हा प्रवास अतिशय सुरळीत सुरू असतो. तेव्हाच एक वळण येतं, जिथे असते शाळा. अनौपचारिकतेकडून औपचारिकतेकडे नेणारी. मुलाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचं वळण. सुरुवातीला सहज घडणारं शिक्षण हळुहळू शाळेच्या चौकटीत बंदिस्त होऊ लागतं. इथे कृत्रिमरीत्या चढत्या क्रमानं इयत्तांनुसार उभी आणि विषयांनुसार कप्पेबंद आडवी मांडणी केलेली असते. एका विषयाचा इतर विषयांशी संबंध लावला जात नाही. या मांडणीत वेगवेगळ्या क्षमतांच्या मुलांना एकत्र शिकावं लागतं. आपण नेहमी बघतो की एका वर्गात वेगवेगळ्या क्षमतांची मुलं असतात. एखाद्या मुलानं त्या इयत्तेच्या क्षमता पूर्ण केलेल्या असल्या आणि तो पुढच्या क्षमता प्राप्त करू शकत असला, तरीही त्याला पुढच्या इयत्तेत जाण्याची सोय आपल्या शिक्षणपद्धतीत नाही. कारण इथे इयत्तानिहाय व्यवस्था असते. त्या त्या इयत्तांची पाठ्यपुस्तकं अभ्यासणं आणि पाठांतर करून परीक्षा देणं अशी रचना असते. पाठ्यपुस्तकातील धड्यांवर आधारित केवळ स्मरण तपासणारी परीक्षापद्धती असते. यात क्षमता न तपासता केवळ प्रश्नांची उत्तरं बरोबर किंवा चूक ठरवली जातात. कोणत्या संकल्पनेचं कितपत आकलन झालं आहे हे फक्त लाल फुल्या देऊन समजू शकत नाही. मूल पास की नापास हे सांगितलं जातं, परंतु त्यानं कोणती कौशल्य आत्मसात केली आहेत व कोणती केली पाहिजेत ते सांगितलं जात नाही. संकल्पना समजून न घेता फक्त घोकंपट्टी करून मुलं पुढच्या इयत्तेत जातात.

या वळणावर एक अतिशय महत्त्वाचा निर्णय पालकांना घ्यावा लागतो, तो म्हणजे माध्यम निवडण्याचा. इथे नातेवाईक,





**पालकांचा सहभाग**

शेजारी-पाजारी, मित्र-मैत्रिणी यांनी कोणतं माध्यम निवडलं आहे हेही पाहिलं जातं. कोणत्या माध्यमाची शाळा निवडायची यावरून बऱ्याचदा आई-बाबांमध्येही मतभेद असतात. मुलाचं शिकण्याचं माध्यम हा पालकांसाठी एक प्रतिष्ठेचा मुद्दा असतो. दुर्दैवानं इंग्रजी माध्यमाचं अंधानुकरण होताना दिसत आहे. वेगवेगळ्या विषयाचं ज्ञान मिळवण्यासाठी इंग्रजी भाषा शिकणं हे खूपच गरजेचं आहेच, परंतु इंग्रजी भाषा शिकणं आणि इंग्रजी भाषेची शिकण्याचं माध्यम म्हणून निवड करणं या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. इंग्रजी भाषा किंवा कोणतीही भाषा शिकण्यासाठी प्रथम आपली मातृभाषा समृद्ध केली पाहिजे. मातृभाषेतून शिकणं ही नैसर्गिक गोष्ट आहे. मातृभाषेतूनच संकल्पनांचं दृढीकरण चांगल्या प्रकारे होऊ शकतं आणि मातृभाषा पक्की झाली की इतर भाषाही आपण शकू शकतो हे अनेक शिक्षणतज्ज्ञांचं मत आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षणच इंग्रजी माध्यमातून देण्याचा घाट घालणं हे शैक्षणिक दृष्ट्या चुकीचं ठरतं.

माध्यमाप्रमाणेच दुसरी एक महत्त्वाची निवड पालकांना करावी लागते. ती निवड करण्यासाठी सध्या पालकांकडे अनेक पर्यायही उपलब्ध आहेत. पूर्वी बरं होतं, एस.एस.सी. या बोर्डाशिवाय इतर काही पालकांना माहीतही नव्हतं. आता तर काय आय.सी.एस.ई., सी.बी.एस.सी. ही यादी अजूनही वाढू शकते. इथेसुद्धा इतरांचं अंधानुकरण करण्यापेक्षा आपल्या मुलाची आवड, क्षमता, कल लक्षात घेऊनच बोर्डाची निवड करावी असं वाटतं.


माध्यम आणि बोर्डाचं आव्हान पेलतानाच मुलांच्या समोर जीवघेणी स्पर्धा उभी ठाकलेली असते. दिवसच्या दिवस शाळेत घालवायचा, मग ट्युशन आणि घरी आल्यावर गृहपाठ करायचा. काय तर म्हणे सध्या स्पर्धेचं युग आहे. दुसऱ्या मुलानं आपल्यापुढे जाऊ नये म्हणून एकमेकांशी अभ्यासाविषयी न बोलणं, एकमेकांच्या वह्या न देणं किंवा याहीपेक्षा भयंकर म्हणजे वह्यांची पानं फाडणं, वह्या गहाळ करणं! इतका अट्टहास कशासाठी? शिक्षणामुळे एक विवेकी, बुद्धिनिष्ठ माणूस बनायला हवा. इथे तर माणुसकीच पायदळी तुडवण्याचं शिक्षण आपण मुलांना देतोय. 'माणसानं माणसाशी माणसासम वागणं' हे फक्त गाण्यापुरतंच शिकवायचं की आचरणातही आणायचं?

एकमेकांना सहकार्य करत, अनुभवांची, विचारांची देवाणघेवाण करत एकमेकांच्या संगतीनं करायच्या प्रवासात हे आपापसातील हेवेदावे का निर्माण होतात याचा विचार आपणच करायला हवा. पुढे येणाऱ्या स्पर्धात्मक युगाला सामोरं जाण्यासाठी आताच्या आनंदापासून का वंचित राहायचं मुलांनी? मी हे करू शकले नाही; पण माझ्या मुलीनं / मुलानं करावं अशी माझी इच्छा आहे. पण, मुलांच्या इच्छेचं काय? जगण्यासाठी आवश्यक कौशल्यं मुलांना शिकावीच लागतील, पण त्यासाठी मार्ग कोणता निवडायचा याचा विचार आपण कधी करणार?

निसर्गात भटकणं, पाण्यात डुंबणं, मातीत हात घालून खेळणं, सायकलीवरनं तासन् तास रपेट मारणं, रंगात हात बुडवून त्याचा स्पर्श अनुभवणं, विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेणं, कविता करणं, संगीत आणि नृत्यात तल्लीन होणं, निसर्गातील घटनांची कारणं समजून घेणं हे शिक्षण नाही का? की एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीजच्या नावाखाली त्याला बासनात गुंडाळून ठेवायचं. आपण सतत धावतोय कशाच्या तरी मागे आणि त्यासोबत आपल्या मुलालाही फरफटत नेतोय. मूल जे शिकतंय त्यात त्याला आनंद मिळतोय का, मजा येतेय का हे कधी विचारलं आहे का कोणी? की आपल्याला भीती वाटतेय, जर मुलानं नाही उत्तर दिलं तर?

मुलाच्या खेळण्या-बागडण्याच्या वयात सतत मान खाली घालून काहीतरी लिहीत बसणं हे शिक्षण आहे का? शिकणं ही अनंतकाळची आनंददायी अनुभूती बनण्याऐवजी नको वाटणारी यांत्रिक क्रिया बनू लागली आहे. स्मरणाला जास्त महत्त्व दिलं जाऊ लागलं आहे. शिक्षक अभ्यासक्रम पूर्ण करतात आणि मुलं पाठांतर करून परीक्षा देतात. ज्ञान आणि माहिती यात आपण गल्लत करतोय का? स्वत: अनुभव घेतल्याशिवाय ते ज्ञान आतपर्यंत झिरपणार तरी कसं? या आणि अशा अनेक प्रश्नांची मालिका डोक्यात काहूर माजवते. अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या नादात शिकण्याची खरी मजा मुलांना शाळेत घेता येत नाही. घोकंपट्टी करून भरघोस गुण मिळवले जातात. आपण जे शिकलो त्याचा दैनंदिन व्यवहाराशी काही संबंध असतो हे मुलांना जाणवतच नाही. यात चूक त्यांची नसते. आपणच तो संबंध त्यांना कधी दाखवलेला नसतो. त्यामुळे शाळेतील अभ्यास





**स्वयंअध्ययन**

आणि जीवनव्यवहार या दोन भिन्न गोष्टी मानल्या जातात. परीक्षांचा बागुलबुवा मुलांच्या मनात निर्माण केला जातो.

दिल्ली विद्यापीठात शिक्षण विभागात प्रोफेसर म्हणून काम करणारे, शिक्षणतज्ज्ञ व लेखक कृष्णकुमार यांच्या वर्षा सहस्रबुद्धे (प्रयोगशील शिक्षणात सक्रिय) यांनी अनुवादित केलेल्या 'मुलांची भाषा व शिक्षक' या पुस्तकात लेखक म्हणतात, 'दिवाळीसारखे सण हा जितका आपल्या संस्कृतीचा भाग आहे, तितकीच परीक्षांची भीती हीसुद्धा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. परीक्षेची भीतीच नसलेले भारतीय मूल कल्पनेतही आणणं कठीण जातं.' कृष्णकुमारांनी काही वर्षांपूर्वी लिहिलेले हे विचार भारतीय समाजासाठी आजही तंतोतंत लागू आहेत. ते पुढे म्हणतात, की 'श्रवण आणि संभाषण या कौशल्यांनाही मूल्यमापनात तितकेच महत्त्वाचं स्थान द्यायला हवं. प्रत्येक मुलाच्या दैनंदिन नोंदी करण्याच्या योग्य पद्धतींचा शोध आपल्याला घ्यावा लागेल.' अशाप्रकारचं मूल्यमापन घ्यायचं असेल तर शिकणं-शिकवणंही तसंच असायला पाहिजे. थोर शिक्षणतज्ज्ञ आणि आधुनिक बालशिक्षणाचे प्रवर्तक गिजुभाई बधेका यांच्या मते शाळेत मुलांना स्वतंत्रपणे कृती करू देणं आणि शिक्षकानं त्याचं अवलोकन करत राहणं हेच खरं शिक्षण होय.

या शिक्षणतज्ज्ञांनी आपल्याला दिशा दाखवण्याचं काम करून ठेवलेलं आहे. त्या मार्गाचा अवलंब करण्यासाठी शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल व्हायला हवा आहे. शासनानं ज्ञानरचनावादाचा व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनपद्धतीचा पुरस्कार केला खरा, पण जोपर्यंत शिक्षकांना त्याचा मूलभूत गाभा लक्षात येत नाही तोपर्यंत या पद्धतींची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होऊ शकत नाही. खरी गरज आहे ती आपला दृष्टिकोन आणि मानसिकता बदलण्याची!

पण आहे, थोडा दिलासा आहे. मला अशीही मुलं-मुली माहीत आहेत, ज्यांनी दहावीपर्यंत आपल्याला आवडेल ते सर्व करून, शिकण्याची मजा घेत घेत, स्वत:ला उसंत देत स्पर्धात्मक परीक्षेत तसंच दहावीच्या परीक्षेतसुद्धा उल्लेखनीय यश मिळवलं आहे. अपयश पचवण्याची ताकदसुद्धा मुलामध्ये निर्माण झाली पाहिजे. समाजाच्या प्रवाहासोबत न जाता फक्त आपल्या मुलाच्या आनंदाचा विचार करणारे, वेगळ्या वाटांनी जाणारे पालक तसेच मुलाच्या कृतिशीलतेला आणि सहज शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या शाळा व शिक्षकसुद्धा समाजात आहेतच.

असं म्हणतात की वाईटातून नेहमी चांगलंच शोधायचं असतं. कोविड १९ मुळे उद्भवलेली परिस्थिती निश्चितच वाईट आहे, परंतु यामुळे शिक्षणक्षेत्रात खूप उलथापालथ घडत आहे. शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, शिक्षक, पालक या सर्वांनाच पुन्हा एकदा शिकण्या-शिकवण्याबद्दल विचार करायला भाग पाडणारी सध्याची परिस्थिती आहे. शिक्षक हा नेहमी काळाच्या बरोबर चालणारा असावा लागतो. आता स्वत:च्या कामाकडे मागे वळून बघण्याची, आपल्या कामात बदल करण्याची एक नामी संधी शिक्षकांसाठी चालून आली आहे. कृतियुक्त शिक्षण, निरीक्षणातून शिक्षण यासारख्या अध्यापनाच्या ज्या पद्धती यापूर्वी शिक्षकांनी वापरल्या नव्हत्या, त्या वापरण्याचे प्रयोग शिक्षक करू लागले आहेत. काही शाळा, काही शिक्षक मुलांना योग्य प्रकारे व्यग्र ठेवण्यासाठी नावीन्यपूर्ण कृती शोधत आहेत. स्क्रीनशिवाय शिकणं घडण्यासाठी योग्य दिशा देणाऱ्या 'घरच्या घरी' http//.www.gharchyagharee.com यासारख्या वेबसाइट तयार केल्या जात आहेत. मुलाला अभिव्यक्तीची संधी देणारं, विचार करायला प्रवृत्त करणारं शिकणं घडू लागलं आहे. यामुळे सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे फक्त पाठांतर करून उत्तरं लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष करून बघण्याची, शोधण्याची, अभिव्यक्तीची आणि स्वयंअध्ययनाची संधी मुलांना मिळत आहे. गूगल क्लासरुम, झूम मीटिंग, ऑनलाइन टेस्ट यासारख्या तंत्रज्ञानाचा शिक्षक वापर करू लागले आहेत.

ऑनलाइन टीचिंग व व्हिडिओ पाहून शिकणं, असे वेगवेगळे मार्ग शोधून, वापरून पाहिले जात आहेत.

यानिमित्तानं शिक्षकांसाठी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकांना वेगवेगळ्या प्रशिक्षणात सहभागी होण्यास मिळत आहे. एरवीसुद्धा वेगवेगळ्या संस्थांमार्फत शिक्षकांसाठी प्रशिक्षणं आयोजित केली जातात. परंतु मुंबईसारख्या शहरांमध्ये सुट्टीच्या दिवशी प्रवासाची दगदग करून दोन तासांच्या प्रशिक्षणासाठी घरापासून लांब जाण्याची तसदी फारशी घेतली जात नाही. वेळ, शक्ती आणि पैसे याचं गणित जमवणं कठीण जातं. आता मात्र आपल्या हाती असलेल्या मोबाइलचा वापर करून, घरबसल्या ही प्रशिक्षणं वेबिनार व झूम मीटिंगमार्फत शिक्षकांना घेता येत आहेत. भाषाशिक्षण, साहित्य वापरून गणितातील संकल्पना प्रभावीपणे शिकवण्याच्या पद्धती, गोष्टी वाचण्याची योग्य पद्धत इत्यादी शिकण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण घेत आहेत. दूरदर्शनवर टिलीमिलीसारखे कार्यक्रम मुलांना दाखवले जात आहेत, त्यातूनही शिक्षकांना अध्यापनाच्या पद्धतींचं आकलन होत आहे.

या सगळ्या प्रशिक्षणांचा वापर मुलांबरोबरच्या देवाणघेवाणीत, संवादात शिक्षक करत आहेत. चांगलं साहित्य मुलांसाठी शिक्षक शोधू लागले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात का होईना पण सकारात्मक सुरुवात तर झाली आहे. एरवी फक्त कला-कार्यानुभवापुरती; फार फार तर विज्ञान या विषयांपुरती मर्यादित असणारी कृतियुक्त पद्धत भाषा, गणित, इतिहास, भूगोल या विषयातही शिक्षक वापरू लागले आहेत. शिक्षकानं शिकवायचं म्हणजे माहिती द्यायची आणि मुलाण ऐकायचं, लक्षात ठेवायचं आणि उत्तरं द्यायची या पारंपरिक चालणाऱ्या शिक्षणात अडकून न राहता शिक्षक नवनवीन कल्पना वापरताना दिसत आहेत.

मुलांच्या जडणघडणीत सगळ्यांत मोठा वाटा असतो तो कुटुंबीयांचा. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीत घरभर माणसं असत. शेजाऱ्यांकडे मुक्त वावर असे. त्यामुळे मोठ्या माणसांचं अनुकरण करत करत मुलांना वाचन-लेखनाची आपोआप गोडी लागत असे. भातुकली, मैदानी खेळ खेळत, हसत-बागडत कुटुंबीयांच्या छत्रछायेखाली विविध अनुभव घेत घेत मुलांचं आयुष्य समृद्ध होत असे. औद्योगिक क्रांतीमुळे कौटुंबिक व्यवसाय बंद पडले आणि नोकरी करण्याकरता स्त्री-पुरुष घराबाहेर पडले. तशी एकत्र कुटुंबपद्धतीसुद्धा मोडून गेली आणि आई-बाबा-मुलं हे नवं कुटुंब उदयास आलं. हळुहळू आई-बाबा दोघही आर्थिक सुरक्षिततेसाठी घराबाहेर पडले. शिक्षित व आर्थिक सुबत्ता असलेल्या पालकवर्गानं मराठी माध्यमाकडून आपला मोर्चा इंग्रजी माध्यमाकडे वळवला. त्यांचं अनुकरण करून मध्यमवर्ग आणि त्यानंतर गरीब पालकसुद्धा आपल्या पोटाला चिमटा काढून मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवू लागले आहेत. परंतु काही पालकांना वेळ नसल्यानं आणि काहींचे तेवढं शिक्षण न झाल्यानं मुलांच्या अभ्यासासाठी खाजगी शिकवण्यांवर अवलंबून राहावं लागलं.

सध्या लॉकडाऊनमुळे थोडी का होईना पालकांना उसंत आहे. पालकांना मुलाकडून प्रत्यक्ष काही गोष्टी करून घ्यायच्या आहेत. उदाहरणार्थ, घरात किती माणसं आहेत व त्यांना एका दिवसाला किती तांदूळ लागतो ते मोजणं, एका डब्यात बिया आणि दुसऱ्या डब्यात पेन्सिल पेरून त्याचं निरीक्षण करणं, स्वयंपाकघरातील वेगवेगळ्या प्रकारची भांडी मोजणं, मुलासोबत त्याच्या आवडत्या खेळण्याविषयी गप्पा करणं. या व अशासारख्या कृती करून घेण्यासाठी शिक्षणाची अट नाही. अगदी १० बाय १० किंवा त्याहूनही छोट्या घरात राहणारे पालकसुद्धा मुलाला त्याचा अवकाश मिळवून देण्यात आणि मुलांच्या वाढीमध्ये सक्रिय सहभाग घेताना दिसत आहेत. थोडी मोठी मुलं टीव्हीवर लागणाऱ्या जाहिरातींचं निरीक्षण करून स्वत: जाहिराती तयार करत आहेत. गणितातील कोन शिकताना घरात कोणकोणत्या जागी कोन झालेले दिसतात ते शोधत आहेत, भाषेतील पाठ व कवितांचा आशय समजून घेऊन त्या आशयावर आधारित छोट्या छोट्या कृती करत आहेत. पालकांसोबत मोबाइलवर पाठ्यक्रमाशी संबंधित योग्य माहिती शोधण्याचं नकळत प्रशिक्षण मुलांना मिळत आहे. आता मुलाच्या शिक्षणात पूर्णपणे पालकांचा सहभाग असल्यानं गरज पडल्यास मुलांना मार्गदर्शनही करावं लागत आहे. आपलं मूल कसं आहे, त्याच्या कोणत्या क्षमता विकसित आहेत, कोणत्या क्षमतांवर काम करण्याची गरज आहे, मुलासाठी शिकण्याची, समजून घेण्याची कोणती पद्धत चांगली व योग्य आहे या व यासारख्या अनेक बाबी समजून घेण्याची संधी पालकांना मिळाली आहे. पालकांचा मुलांसोबतचा क्वालिटी टाइम खऱ्या अर्थानं वाढताना दिसतोय.

काही महिन्यांनी सर्व काही सुरळीत सुरू होईल, शाळाही सुरू होतील. टाळेबंदीच्या काळात आपल्या कामाकडे बघण्याची, त्यात चांगले बदल करण्याची संधी शिक्षकांना मिळाली आहे. ते बदल, ते प्रयोग यापुढे रोजच्या कामाचा भाग बनले पाहिजेत. शाळा सुरू झाल्यानंतरही अनुभवावर आधारित, कृतिशील, विचारांना चालना देणारं शिक्षण घडलं पाहिजे. दैनंदिन व्यवहार आणि अभ्यासक्रम हे एकमेकांत मिसळलेले आहे हा विचार दृढ होऊन त्याचं प्रतिबिंब शिक्षणात दिसलं पाहिजे. तरंच ज्ञानरचनावाद, सातत्यपूर्ण शिक्षण या संकल्पना प्रत्यक्षात उतरतील. शिकणं-शिकवणं हे जर इतक्या आनंदात घडलं तर मुलांचे प्रतिसादही तितकेच उत्स्फूर्त असतील. त्यांनी केलेलं निरीक्षण, बांधलेला अंदाज, मांडलेलं मत, त्यांची अभिव्यक्ती या सगळ्यांच्या नोंदींकडे मूल्यमापन म्हणून कसं बघता येईल, याचाही विचार केला पाहिजे. एकूणच टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर शिक्षण पद्धती, मूल्यमापन पद्धती याचा पुनर्विचार करण्याची संधी निर्माण झाली आहे. या कठीण परिस्थितीत मुलांच्या मानसिक ताणाबद्दलही बोललं जात आहे. त्याची दखल घेतली जात आहे. काही शाळा, काही शैक्षणिक संस्था आपापल्या परिघातील मुलांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधत आहेत. ही एका सकारात्मक बदलाची संधी मिळाली आहे, ती आपण घेऊया.

**– सानिका जगदीश सावंत**
भ्रमणध्वनी : ९९८७५९९२१९
sanikajsawant@gmail.com

**फ्रान्झ काफ्का या प्रागमध्ये जन्मलेल्या, जर्मन भाषेत लिहिणाऱ्या लेखकाला उणपुरं चाळीस वर्षांचं आयुष्य मिळालं. जिवंत असेपर्यंत फक्त आठ-दहा कथा प्रसिद्ध झाल्या. त्यांची कोणी साधी दखलही घेतली नाही. आपण कधी चांगलं लिहूच शकत नाही, अशा समजताच त्यांचा मृत्यू झाला. त्याच काफ्कांनी जे-जे लिहून ठेवलं, तो प्रत्येक शब्द आज एक विचार ठरलाय. जगाच्या कानाकोपऱ्यात त्यांच्या लिखाणाला डोक्यावर उचलून घेतलं गेलं. ही गोष्ट खुद्द काफ्कांनी कशी लिहिली असती...**



**अपर्णा पाटील**

# समकालीन

**फ्रान्झ काफ्का**
म्हटलं
आज गादीला जरा
ऊन खाऊ दे.
गच्चीवर टाकली न टाकली तो
पसाभर ढेकूण
जीव घेऊन
सैरावैरा ढुंगणाला पाय
लावून धूम पळत सुटलेले.
तरी तीनचार पायाखाली आलेच.
त्यांच्या कुळथीच्या रंगाचे
रक्ताळ धूमकेतू
जमिनीवर गोंदणासारखे
उतरत्या सूर्याला साक्षी
ठेवून मी स्वत:शीच पुटपुटलो,
देवा, त्यांच्या आत्म्यांना शांती दे
त्यातला चुकून एखादा असायचा फ्रान्झ काफ्का!

- सदानंद रेगे (वसंत आबाजी डहाके संपादित- निवडक सदानंद रेगे)

मराठीतल्या कित्येक लेखकांना फ्रान्झ काफ्कांच्या लिखाणानं खुणावलंय. अनुवाद, स्वैर अनुवाद, नाटक, संहिता, समीक्षा, कथा-कविता असं बरंच काही त्यांच्या लिखाणावर बेतलेलं साहित्य सापडतं. फक्त मराठीतच नाही तर जगातल्या प्रत्येक भाषेतल्या साहित्यात काफ्का सापडतातच. नुसतं साहित्यच नाहीतर सिनेमा, नाटकं, लघुपट, माहितीपट, संगीत अशा प्रत्येक माध्यमांत काफ्कांच्या साहित्यांच्या खाणाखुणा उमटल्याचं दिसतं.

काफ्कांनी आपल्या चाळीस वर्षांच्या आयुष्यात लिहून ठेवलेलं साहित्य किती आहे, हे संख्येत मोजणं त्यांच्यावर अन्याय करणारं आहे. कादंबरी, दीर्घकथा त्यांनी लिहिल्या. इतकंच नाही तर त्यांनी वडील, बहीण आणि प्रेयसीला लिहिलेली पत्रं हे सगळं आता साहित्यकृती म्हणून नोंदवलं गेलंय. त्यांनी लिहिलेली 'द मेटामॉर्फिसिस' ही कथा त्यांच्या जिवंतपणी प्रसिद्ध झाली खरी, पण त्याचं मोल त्यांच्या हयातीत कधी कोणाला समजलंच नाही. त्यांच्या मृत्यूनंतर 'द मेटामॉर्फिसिस'चा जितका बोलबाला झालाय, तितका खचितच दुसऱ्या कोणत्या साहित्यकृतीचा झाला असेल. इतकी रूपांतरणं या कलाकृतीची झाली आहेत, आजही होत आहेत.

प्रत्येक लेखकाला आपल्या लिखाणाला रसिकांचा आश्रय मिळावा, अशी अपेक्षा असते. काफ्कांच्या वाट्याला ते भाग्य आलंच नाही. त्यामुळे आपण काही फार चांगलं लिहीत नसणार, असा स्वतःबाबतचा समज त्यांना दूर करणं जमलंच नाही. त्यांनी जिवंत असतानाच स्वतःच बरंच लिखाण नष्ट केलं. जे काही राहिलं आणि जगापुढे आलं ते त्यांच्या मृत्यूनंतर.

फ्रान्झ काफ्का यांचा जन्म ३ जुलै, १८८३ रोजी प्रागमध्ये झाला. प्राग त्यावेळी बोहेमिया राज्याची राजधानी होती. जो ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचा भाग होता. आता ते झेक प्रजासत्ताकाची राजधानी आहे. हरमन आणि ज्युली काफ्का यांचं फ्रान्झ हे पहिलं अपत्य. काफ्का दाम्पत्याला सहा मुलं झाली. दुर्दैवानं त्यातलं एकही मूल आपली चाळीशीही पार करू शकलं नाही. फ्रान्झ सात वर्षांचे होईपर्यंत त्यांची दोन्ही भावंडं मरण पावली. तीनही बहिणींचा शेवट नाझी छळछावण्यांमध्ये झाला.

हरमन काफ्का कपड्याच्या व्यवसायात होते. ते त्यांच्या स्टोअरमध्ये तयार झालेल्या कपड्यांवर जॅकडॉ याचं (कावळ्याच्या प्रजातीतील पक्षी) चित्र लोगो म्हणून वापरत. ज्याचा झेकमध्ये उच्चार कावका असा होतो. त्याच शब्दाच्या अपभ्रंशातून तयार झालेलं

आडनाव होतं काफ्का. हे सांगण्याचं कारण इतकंच, की काफ्का आणि त्यांच्या प्रभावातून निर्माण झालेल्या कलाकृतींमध्ये काफ्का या आडनावातलं आद्याक्षर के आणि तो कावळा एक मूक भूमिका बजावतो.



फ्रान्झ काफ्का

हरमन अंगानं  धट्टेकट्टे आणि एकदम तापट होते. अर्थात हा राग त्यांच्या स्वभावात असण्याची वेगवेगळी कारणं होती. त्यापैकी एक म्हणजे ते स्वकर्तृत्वानं मोठे झाले होते, याचा त्यांना प्रचंड अभिमान होता. त्यामुळे आपल्या मुलानंही आपल्याप्रमाणे दणकट, साहसी आणि व्यवसायिक व्हावं, असं त्यांना वाटतं होतं. पण फ्रान्झ एकदम बारकुळे  आणि आजारानं  चिरचिरलेलं मूल होतं. हे त्यांना सहनच होत नसे. मग विनाकारण त्यांच्यावर राग काढला जायचा. एकदा प्यायला पाणी मागितलं म्हणून थंडीच्या दिवसांत रात्रभर घराच्या बाल्कनीत उभं राहण्याची शिक्षा त्यांनी दिली होती. वडिलांच्या या वागणुकीचं कारण त्या वयात कळत नव्हतं, पण त्याच्या खोल जखमा त्यांच्या हृदयावर झाल्या.

फ्रान्झ काफ्का लेखक म्हणून कसे घडले, हे समजून घेताना त्यांचं वडिलांशी असलेलं हे नातं जास्त समजून घ्यावं लागतं. वडिलांच्या प्रचंड दहशतीखाली वाढलेल्या काफ्कांना कधीच आत्मविश्वासानं वावरणं जमलं नाही. आयुष्यात काही आव्हानात्मक करावं, अशी मानसिकता राहिली नाही. ते वडिलांशी कधी मोकळेपणानं बोलूही शकले नाहीत. त्या भावना त्यांनी पत्रात व्यक्त केल्या. ती पत्रं थेटपणे वडिलांना देण्याचं धाडसही त्यांच्यात नव्हतं. अर्थात त्यांच्या मृत्यूनंतर त्याच पत्रांचं जवळपास शंभरेक पानांचं पुस्तक मात्र झालं. ज्याची लाखोंनी पारायणं आजही होतात.

वडिलांच्या इच्छेखातर त्यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं. पण कोर्टात जाऊन अशिलांची प्रकरणं सोडवण्याचं आव्हान स्वीकारणं, त्यांना मानवणारं नव्हतंच. विमा कंपनीतला डेस्क जॉब करणं त्यांना अधिक सोयीचं वाटलं. त्याचे दोन फायदे होते.  फावल्या वेळेत त्यांना लिखाण करणं शक्य होतं आणि नोकरी करत असल्यानं वडिलांच्याही नाराजीचा प्रश्न येणार नव्हता.

१ नोव्हेंबर १९०७ रोजी ते विमा कंपनीतल्या नोकरीत रूजू झाले. तिथल्या कामाच्या वेळानं ते कातावले आणि आठ महिन्यांतच त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर दोनच आठवड्यांनी त्यांनी सरकारी विमा कंपनीत नोकरी स्वीकारली. कामगारांच्या अपघाताच्या विम्याची प्रकरणं हातावेगळी करण्याचं काम त्यांचा विभाग करत असे. हे सांगण्याचं कारण इतकंच की, या काळात त्यावेळी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षेची सुविधा पुरवली जात नसे. अशावेळी बोटं किंवा पाय कापले गेलेल्या गरीब कामगारांना विम्याच्या छोट्याशा रकमेसाठी किती चकरा माराव्या लागतात, हे पाहावं लागलं. याच सगळ्या व्यवस्थेतून आलेल्या बोथटपणाचं प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात दिसतं. कायदेशीर कामकाज हा त्यांच्या नोकरीचा भाग होता तर लिखाण ही  त्याची नैसर्गिक ओढ होती.

काफ्का यांनी साहित्यात रस असणारे चारेक मित्र जोडले. त्यापैकी एक होते मॅक्स ब्रॉड. मित्रांसोबत असताना ते कमालीचे वेगळे वागत. त्यांच्यात जात्याच एक विनोदबुद्धी होती. जी त्यांच्या लिखाणातही आढळते. ब्रॉडशी जमलेलं मैत्र चिरंतन ठरलं. काफ्कांच्या अफाट वाचनाचं ब्रॉडना कौतुक होतंच, त्याहीपेक्षा काफ्कांच्या लिखाणात असामान्यत्व आहे, ते त्यांना जाणवलं होतं.

मैत्री जमवता आली होती, पण नात्यांत गुंतवून घेणं जमलं नव्हतं. आई आपली बाजू घेत नाही. वडील समजून घेत नाहीत. अशा दुहेरी मनस्तापात काफ्कांचं बालपण एकाकी गेलं. आयुष्याच्या पुढच्या काळात त्यांना कोणत्याही नात्यात शिरता न येण्याचं तेही एक कारण असावं.  त्यांची किमान सात प्रेमप्रकरणं झाल्याचे उल्लेख आढळतात. ते एका मुलाचे बाप झाल्याचंही सांगितलं गेलंय. पण त्यातलं तथ्य समोर आलेलं नाही. लग्न मात्र कधी होऊ शकलं नाही. तीन वेळा ठरलेलं लग्न मोडलं. अनेकदा शारीरिक गरजांपोटी वेगवेगळ्या कुंटणखान्यात ते जात. लैंगिक इच्छेच्या तीव्रतेपोटी त्यांना पॉर्नोग्राफीचं वेड लागलं होतं. त्यांचं लैंगिक आयुष्य खोदून काढण्याचा प्रयत्न होतो. कारण त्यांच्या लिखाणात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू प्रतिबिंबित होतात. त्यांच्या कथांच्या नायकांत




**विविध माध्यमेही प्रभावित**

जे क्रेप्स यांनी विकसित केलेल्या सॉफ्टवेअरला अपाची काफ्का असं नाव दिलंय. जे क्रेप्स यांनी हे सॉफ्टवेअर हे लेखनासाठी अनुकूल अशा प्रणालीसाठी विकसित केलं. त्यांना स्वतःला काफ्का यांचं लिखाण आवडत असल्यानं  त्यांनी त्याला अपाची काफ्का असं नाव दिलंय. काफ्का यांच्यावर लिहिलेल्या कविता, गाणी, लेख, पुस्तकं, समीक्षा, चित्रपट यांची गणतीच नाही. प्राग शहरात त्यांचा पुतळा हे जगातलं अद्भुत असं शिल्प मानलं जातं. त्यांच्या द मेटामॉर्फोसिसवरून प्रेरणा घेऊन हे शिल्प तयार केलं. काफ्कांच्या कल्पनाशक्तीचं ते वस्तूरूप आहे, असं म्हणता येईल.

लैंगिक संबंधाविषयीची वेगळीच आकृष्टता दिसून येते. कदाचित त्यांच्या लैंगिक घुसमटीतून ते आलं असावं, असं मनोविश्लेषणही केलं जातं.

पहिल्या महायुद्धाचं संकट गडद झाल्यावर, दोन्ही बहिणींचे नवरे लष्करात गेले. दोन बहिणी मुलांसह सगळ्या कुटुंबानं एकत्र राहावं, म्हणून प्रागला आल्या. त्यावेळी काफ्का धाकट्या आणि त्यांच्या लाडक्या बहिणीकडे गेले. आयुष्यात पहिल्यांदाच त्यांनी मोकळेपणानं श्वास घेतला. ते वर्ष होतं, १९१४. नोकरी सोडून त्यांनी पूर्णवेळ लिखाण करायचं ठरवलं याकाळात त्यांनी लिहिलेल्या डायऱ्या आणि पत्रं हा पुढील काळातला साहित्यातील मौल्यवान ठेवा ठरला.




१९१७ साली त्यांना क्षयरोग झाल्याचं निदान झालं. त्यावेळी त्यावर कोणताच इलाज नव्हता. १९२४ या सालात दुसरंही दुखणं बळावलं. त्यावेळी त्यांच्या अन्ननलिकाला आलेली सूज त्यांना अन्नही गिळू देत नव्हती. त्यांना उपचारासाठी व्हिएन्नाला धाडलं. त्याच काळात ते आपली 'द हंगर आर्टिस्ट' लिहून पूर्ण करण्याच्या गर्क होते. ही कथा एका अशा माणसाची आहे, जो उपवास करण्याचा मनोरंजक शो सादर करत असतो. सुरुवातीला त्याच्या उपाशी राहण्याच्या आव्हानाचं लोकांना कौतुक करतात. हळूहळू लोक त्याच्या उपाशी राहण्याच्या आव्हानाची अवहेलना करतात. ही कथा त्यांच्या स्वतःच्या आयुष्याशी जोडणारी होती. अन्न गिळता येत नसल्यानं उपासमारीनं त्यांचा मृत्यू झाला. काफ्काचं निधन झालं तेव्हा त्याची दखल घ्यावी, असं कोणालाही वाटलं नाही.

३ जून १९२४ रोजी त्यांचं निधन झालं होतं. मृत्यूपूर्वी त्यांनी आपला मित्र मॅक्स ब्रॉड यांच्यासाठी एक पत्र लिहून ठेवलं होतं. मी लिहिलेल्या डायऱ्या, हस्तलिखितं, पत्रं तू स्वतःही न वाचता जाळून टाक असं त्यात म्हटलं होतं. काफ्का यांनी 'द मेटामॉर्फिसिस' आणि 'द जजमेंट' या कथा खरं ते जिवंत असतानाच प्रसिद्ध झाल्या होत्या. परंतु लिखाण काळाच्या खूप पुढचं आहे, ते समजण्याची ताकद प्रागमधल्या त्या काळातल्या छोट्याशा साहित्यवर्तुळात नसावी. 'कंटेम्प्लेशन', 'अ कंट्री डॉक्टर' आणि काही कथा त्यावेळी तिथल्या साहित्यिक मासिकांमध्ये प्रसिद्ध झाल्या. पण त्याचीही दखल घेतली नाही. म्हणूनच आपलं अर्धवट राहिलेलं लिखाण 'द ट्रायल', 'अमेरिका', 'द मॅन हू डिसअपिअर्ड' या कादंबऱ्या आपल्या मृत्यूनंतर नष्ट करून टाक, असं त्यांनी ब्रॉडना सांगितलं होतं. ब्रॉड यांनी तसं केलं असतं तर जग कोणत्या गोष्टीला मुकलं असतं हे लक्षात घ्या. ब्रॉड यांनी त्यांचं लिखाण समजून घेत, त्यावर योग्य ते संस्कार करत प्रसिद्ध केलं. आज आपण काफ्कांनी लिहिलेलं जे जे उपलब्ध आहे, त्यासाठी ब्रॉड यांचे आभार मानावे तितके कमीच आहेत.

असं काय आहे नेमकं काफ्कांच्या लिखाणात, की फ्रान्झ काफ्कांना आधुनिक विचारवंतांच्या रांगेत बसवलं जातं. त्याचं सगळ्यात महत्त्वाचं उदाहरण म्हणजे 'द मेटामॉर्फिसिस'. 'द मेटामॉर्फिसिस' हे काफ्काच्या चाहत्यांना कोळून प्यायलं तरी सगळं समजून घेतलं आहे, असं सांगता येत नाही. ग्रेगर स्मसा नावाचा कारकून एका सकाळी झोपेतून उठतो. तेव्हा आपण एका भयंकर अशा किटकात रूपांतरित झाल्याचं समजतं. त्यानंतर त्याच्या घरात जे घडतं, ते आपल्याला आपलंच रूप असल्यासारखं जाणवतं. आपल्या घरातल्यांच्या लेखी आपण काय आहोत, हे ते पाहतो. या दीर्घकथेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रेगरीला आपण कीटक झालो, याचं आश्चर्य वाटत नाही. उलट आता आपण या घरात कसं जमवून घ्यायचं, या चिंतेनं हालचाली करत राहतो.

त्यांच्या त्या कथेतली पात्रं समजून घेताना आपण स्वतःला नकळत त्यांच्याशी ताडून पाहायला लागतो. मग काफ्का कमी आणि स्वतःला जास्त जाणून घेतो. म्हणूनच काफ्का यांचं साहित्य वाचणं म्हणजे स्वतःच्याच कसोटीवर स्वतःची परीक्षा घेणं असं म्हटलं जातं.


काफ्कांची आणखी एक कादंबरी आहे, 'द ट्रायल'. के नावाच्या व्यक्तीच्या (के म्हणजे अशरक्षः कुणीही असू शकतं) घरी सकाळी-सकाळी दोन पोलिस येतात. त्याच्या घराची झाडाझडती घेतात. त्याची चौकशी करतात. त्यानंतर तो आपल्यावर नेमका कसला गुन्हा दाखल झालाय, कसली चौकशी होतेय, यासाठी कोर्टाचे उंबरे झिजवतो. पण त्याला अखेरपर्यंत ते कळत नाही. कथेत त्याला मारण्यात येतं. ते का तेही वाचकाला कळत नाही. काफ्कानं ते आपल्या वाचकानं शोधावं असं म्हणून सोडून दिलंय. सध्याच्या परिस्थितीत इतकं आजच वाटावं असं लिखाण काफ्कांनी एक शतकाभरापूर्वी केलंय, याचं आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. ही कादंबरी विसाव्या शतकातील हुकूमशाही व्यवस्थेचं प्रतीक मानली जाते. (ब्रॉड यांना या कांदबरीची सुसंसगती न लागल्यानं त्याचा फॉर्म समजणं हेदेखील वाचकांसाठी आव्हान ठरतं.)

माणसाच्या हातात आलेली सत्ता माणसाचं माणूसपण हिरावून घेते. त्यामुळे कोणावर तरी सत्ता गाजवणारी मूठभर माणसं मणभर माणसांचं आयुष्य नकोसं करून टाकतात. त्यातून सत्ताधारी व्यक्तींची संवेदनशून्यता सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात भीती, अनिश्चिता आणि दुःख निर्माण करणारी असते. काफ्का हे सहजपणे लिहू शकले. कोणत्याही प्रतीक, प्रतिमा,

**काफ्काआस्क**

काफ्काआस्क (kafkaesque) अशी नवी संज्ञा काफ्का यांच्या लिखाणामुळे जन्माला आली. अतिशय गोंधळलेला, इतरांपासून विलग असलेला, अतिशय निर्जीव वाटावा असा, किंवा अत्याचार, मृत्यू याविषयी ठोस निर्णयाप्रत येऊ शकणारा, संभ्रमित किंवा ज्या भावनेबाबत कोणतंही स्पष्टीकरण देता येत नाही, अशा भावनेला काफ्काआस्क असं म्हटलं जातं. जेव्हा परिस्थिती गूढ आणि प्रतिकूल असते आणि त्यातून बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग दिसत नाही, ती स्थिती म्हणजे काफ्काआस्क असंही म्हटलं जातं.

अलंकार, विशेषणांशिवाय. कारण नोकरशाहीतल्या अन्यायी व्यवस्थेतल्या शोषणाचे ते साक्षीदार, पीडित होते. ते स्वतः आठ ते दहा तासांच्या नोकरीतला रूक्षपणाशी, त्यातल्या कामांच्या पद्धतींशी कधी जुळवून घेऊ शकले नव्हते. लक्षात घ्या, किमान सत्तर ते ऐंशी वर्षांपूर्वी नोकरशाही, सत्ताधारी हुकूमशहा, पोखरलेली न्यायव्यवस्था हे माणसाच्या जगण्याचा रस शोषून घेणारं आहे, असं काफ्कांनी सांगून ठेवलंय. हे सगळं आजही तसंच्या तसंच कायम आहे.




हे सगळंच काफ्का यांनी जितक्या मनोविश्लेषणात्मकरीतीनं मांडलंय ते इतर कोण्या लेखकाला जम लेलं नाही. पण काफ्कांचा प्रभाव बहुतांश साहित्यिकांवर आहे, तो त्यांनी खुलेपणानं मान्यही केलाय.

अगदीच सांगायचं तर, मराठी साहित्यिक विलास सारंग यांच्या लिखाणावर काफ्कांचा प्रचंड प्रभाव होता. त्यांनी, आजचं वर्तमानपत्र वाचता-वाचता आपण काफ्का वाचतो आहोत, असं जोपर्यंत वाटू शकतं, तोपर्यंत काफ्का ताजाच राहणार, असं म्हणून ठेवलं आहे. जगभरातील त्यांचा प्रभाव हा कल्पनेपलीकडचा आहे. ग्रॅबिएल गार्सिया मार्कोज, डब्ल्यू. एच. ऑडेन, व्लादिमीर नाबोकोव्ह, थॉमस मन आणि जॉर्ज ऑर्वेल या प्रतिभावंतांनी त्यांच्या साहित्यावर काफ्कांचा प्रभाव मान्य केला. नोबेल विजेत्या मार्कोस यांनी तर आपण लिखाणाकडे वळलो तेच मुळी काफ्का यांच्यामुळे, असं जाहीरपणे सांगितलं होतं. हारूकी मुराकामी हे अलीकडच्या काळातील प्रचंड लोकप्रिय साहित्यकार. त्यांच्यावर काफ्कांचा इतका प्रभाव आहे, की त्यांच्या एका कादंबरीचं नाव 'काफ्का ऑन द शोअर' असं आहे. त्यातल्या नायकाचं नावही कावळा आणि काफ्का असं आहे. नोबेलविजेते लेखक काझुओ इशिगुरो यांनीही, काफ्का हाच त्यांच्या लिखाणाचा अंतस्थ स्रोत आहे, असं जाहीर केलंय. विसाव्या शतकातील डांटे असा उल्लेख डब्ल्यू. ए. ऑडिट या पुलित्झर पुरस्कारविजेत्या कवीनं केलाय.

काफ्का यांचं व्यक्तिगत आयुष्य एकाकीपणा आणि आजारांनी ग्रासलेलं होतं. दमन आणि निराशा या भावनांचं प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात दिसतं. अर्थात या भावना नकारात्मक आहेत, यात शंकाच नाही; पण त्यांच्या लिखाणातून त्या निराशात्मक असण्यापेक्षा सृजनात्मक अधिक असल्याचं आढळतं. त्याची तुलना थेट चार्ली चॅप्लिन यांच्या सिनेमातल्या दुःख, शोषणाकडे ज्या विनोदीवृत्तीनं पाहिलं जातं, त्याच्याशी होते.

फ्रान्झ काफ्का कुठे कुठे सांडलेले आहेत. लिखाणात, बोलण्यात. माणूस ज्या शब्दांत आपली हतबलता, निराशा व्यक्त करतो, ती भाषा काफ्कांची असते. कारण त्या आगतिकतेचा शेवट कशात होणार हे आपल्याला माहीत नसतं. काफ्काचं अत्यल्प लिखाण महनीय का ठरलं त्याची कारणं समजून घ्यायला हवी. त्यांच्या लिखाणात प्रचारकी, बोधप्रद असं काही नसतं. असतं ते नुसतं आणि नुसतं सत्य. तेही धक्कादायक तरीही अपेक्षित. काफ्काच्या कथेतली माणसं ही कुटुंबाशी जुळवून घेऊ न शकणारी, स्वतः बद्दल ठाम नसलेली, निराशेनं ग्रासलेली आहेत. त्यांच्या आयुष्यातली घटनाही अतर्क्य आणि कल्पनेपलीकडच्या आहेत. ती पात्रं समाजापासून तुटलेली आहेत. तरीही 'सत्य हे अविभाज्य आहे, त्याची स्वतःशीही पुरेशी ओळख झालेली नाही. ज्याला सत्य जाणून घ्यायचं आहे, त्यासाठी सत्यालाही कधीतरी असत्य व्हावं लागेल,' असं सांगत काफ्का यांनी नवसाहित्य प्रवाह निर्माण केला. तेही प्रचलित असलेल्या इंग्रजी नव्हे तर जर्मन भाषेतून.

जर्मन भाषेची संरचना, म्हणी किंवा व्यक्तिसाक्षेप वैचारिकता मांडण्याची हातोटी काफ्कांकडे होती. त्यामुळेच त्यांच्या लिखाण अनुवादित करणंही मोठं कठीण काम आणि ते समजून घेणं तर आव्हानात्मक ठरतं. तरीही जगभरातील बहुतांश भाषांमध्ये त्यांचं साहित्य अनुवादित झालं आहे. अर्थात त्याचं श्रेय काफ्कांचे मित्र मॅक्स ब्रॉड यांना द्यावं लागेल.

मॅक्स ब्रॉड यांनी काफ्कांचं साहित्य जगभर पोहोचवलं. त्यासाठी ते वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्यानंही देतं. एकदा आपला प्रिय मित्र फ्रान्झ काफ्का यांच्यावर भाषण देण्यासाठी उभे होते. अचानक तरुण जोरात ओरडला, हे शतक काफ्काचं आहे... त्यानंतर सभागृहात प्रचंड गोंधळ झाला. ब्रॉड त्या व्यक्तीला पाहू शकले नाहीत. नंतर तो माणूस त्यांना कधी भेटलाही नाही... त्याची खंत ब्रॉड यांना आयुष्यभर राहिली. कारण त्या एका वाक्यानं ब्रॉड यांना आपल्या आयुष्याचं साथर्क झाल्याचं समाधान दिलं होतं. त्यासाठी त्याचे आभार मानायचे राहून गेले होते. तशीच खंत काफ्कांना त्यांच्या हयातीत प्रसिद्धी मिळू शकली नाही याचीही आहेच.

### दोन पिढ्यांमधली तगमग

प्राग हा भाग झेक साम्राज्याचा भाग होता. प्राग शहरात त्याकाळी ज्यू लोकांची संख्या फक्त सहा टक्के इतकी होती. त्यामुळे प्रागसारख्या शहरी तोंडवळा लाभलेल्या नगरातील अल्पसंख्याक ज्यू समाज स्वतःला असुरक्षित मानत होता. विशेषतः तिथला तरुण. प्राग हे जर्मनीलगतचं शहर होतं. त्यामुळे जर्मन भाषेचा प्रभाव त्यांच्यावर होऊ लागला होता. शिवाय बाजूच्या ऑस्ट्रियातही जर्मन हीच बोलीभाषा होती. त्यामुळे चेक भाषेपेक्षाही ज्यूंनी जर्मन भाषा आत्मसात केली. मुलांना जर्मन भाषा शिकायची आहे, तर बाप त्याला मान्यता देत होता. पण मुलांनी ज्यू प्रथापरंपराही विसरू नये, अशी भावनाही बापाच्या मनात असायची. अशीच दोन पिढ्यांतील तगमग फ्रान्झ काफ्का यांच्या लिखाणाची प्रेरणा ठरली. काफ्कांनी जर्मनमधून लिखाण केलं तरी त्यांचं ज्यू भाषा आणि नाटकांवरचं प्रेम आणि त्यांचं झाओनिस्ट असणं या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगळ्याच बाजू होत्या.

**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com

**ग्रामीण भारतीय व्यापारपद्धतीमधला बलुतेदारी, अलुतेदारी, फिरस्ते यांच्यावर आधारलेला; जात, व्यवसाय, कुटुंब, गाव आणि शेती यावर आधारलेला, गावोगावी ग्रामीण व तळागाळातील अर्थकारणाचे चक्र असणारा आठवडी बाजार पुन्हा उभारी धरेल की नाही माहीत नाही. नोटाबंदीनंतर आठवडी बाजारावर झालेला हा दुसरा आणि सर्वात मोठा आघात आहे. अनेक वस्तू व सेवा आणि यांच्यावर आधारित सहजीवन व आत्मनिर्भरता यांचा वारसा असणारा आठवडी बाजार कायमस्वरूपी नष्ट होईल काय?**



**राज कुलकर्णी**

# टाळेबंदीने उद्‌ध्वस्त झाला आठवडी बाजार...

**को**रोनासाथीमुळे लावलेली टाळेबंदी उठवण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. ही टाळेबंदी कोरोनाची साथ आटोक्यात आणण्यासाठी कितपत यशस्वी झाली याचे उत्तर आताच मिळणे कठीण आहे. परंतु टाळेबंदीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला मात्र मोठेच टाळे लागण्याची शक्यता खूपच बळावली आहे हे वास्तव आहे. नोटाबंदी आणि जीएसटी यांच्या तडाख्याने आधीच डबघाईला आलेल्या छोट्या आणि मध्यम उद्योगधंद्यांचे कंबरडे या टाळेबंदीमुळे पुरते मोडले आहे. यामुळे त्यांवर अवलंबून असणारे लाखो कामगार व मजूर बेरोजगार झाले आहेत. लहान व्यापारी व व्यावसायिक यांचेसुद्धा नुकसान झाले आहे. याचबरोबर या सर्वांवर अवलंबून असणारा गावोगावचा आठवडी बाजारसुद्धा पूर्णतः कोलमडून गेला आहे. आठवडी बाजारातील विक्रेते आणि खरेदीदार जणू अचानक गायबच झाले आहेत, अशी भयाण अवस्था आज केवळ उस्मानाबादच्या नव्हे तर अनेक तालुका व जिल्ह्यांतील आठवडी बाजारांमध्ये दिसून येत आहे.

उस्मानाबाद येथे यावर्षी झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ग्रंथालीने उस्मानाबादच्या आठवडी बाजारावर मी लिहिलेले 'आठवडी बाजार आणि समाजजीवन' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाची प्रेरणाच मुळी २०१६ साली भारत सरकारने केलेल्या नोटाबंदीमुळे आठवडी बाजारावर कोसळलेले संकट ही होती! माझे पुस्तक उस्मानाबादच्या आठवडी बाजारावर असले तरी गावोगावी असणारा आठवडी बाजार जवळपास सारखाच असतो. आठवडी बाजाराचा सर्वांगीण मागोवा घेण्याचा प्रयत्न मी केला होता. नोटाबंदीनंतर आज या आठवडी बाजाराची पुन्हा आठवण येण्याचे कारण म्हणजे दुसरी एक बंदी - टाळेबंदी! नोटाबंदी आणि जीएसटीवेळी जशी छोटे व मध्यम उद्योग आणि कामगार-मजूर यांची जशी दुर्दशा झाली तशीच या टाळेबंदीने केली आहे. मग आठवडी बाजारसुद्धा या दुर्दशेला अपवाद कसा राहील? आठवडी बाजार ही संकल्पनाच टाळेबंदीमुळे मोडीत निघणार की काय अशी शंका येते.

बऱ्याचदा कॅलेंडरवरील काळात एकाच पानावर असलेले मानवी समाज सामाजिक, आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या बरोबरच चालत असतील असे नाही. एकाच वेळी एकाच गावात एक समूह एकविसाव्या शतकात तर एक समूह विसाव्या शतकाच्या मध्यात असतो, तर एखादा समूह नव्वदमधील उदारीकरण अनुभवत असतो. त्यामुळे प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. तळागाळातील आणि असंघटित क्षेत्रातील लोकांची गरज भागवण्याचे मुख्य काम आठवडी बाजार करत असतो. टाळेबंदीच्या काळातसुद्धा हाच वर्ग सर्वात जास्त पीडित होता म्हणून आठवडी बाजारावर याचे मोठे परिणाम दिसून आले.

मेट्रो शहरांतील उच्चमध्यमवर्गीय समाज आठवड्याचे कामाचे संपूर्ण दिवस बहुधा कार्यालयीन कामातच व्यतीत करतो. महिन्यातून एकदाच महिन्याचे सारे आवश्यक जिन्नस तसेच काही वेळा अनावश्यक गोष्टीसुद्धा मॉलमधून खरेदी करतो. मध्यमवर्गीय समाज आवश्यकतेहून अधिक खरेदी न करता खरेदीची सांगड उपलब्धतेपेक्षा गरजांशी अधिक जोडणारा असतो. हा वर्ग जवळच्या किराणा भुसार दुकानातून महिन्याची एकदम खरेदी करतो. हाच समाज मोठ्या शहरांऐवजी लहान शहरे, गावे यांतून राहत असेल तर उलट पीककाढणीनंतर म्हणजे दिवाळीनंतर वर्षभराचे धान्य भरून ठेवण्याकडे त्याचा कल असतो. तर दैनंदिन अथवा आठवडी रोजगारावर काम करणारा श्रमजीवी त्या आठवड्याचे वेतन पदरी पडले की पुढील आठवड्याची तजवीज करण्यासाठी आठवडी बाजाराची वाट धरतो. माणसांचे हे प्राधान्यक्रम नकळत त्यांच्या आर्थिक स्तरांचे, भौगोलिक ठिकाणांचे आणि मागणी-पुरवठा व्यवस्थेचे निदर्शक ठरत असतात. ही संपूर्ण व्यवस्था टाळेबंदीमुळे कोसळून पडली आहे.

टाळेबंदीच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे २३ मार्च ते १४ एप्रिल



कवडीमोल विकावा लागला किंवा वाटून टाकावा लागला.

मार्च, एप्रिल आणि मे हे तीन महिने म्हणजे लग्नसराईचा काळ! आठवडी बाजारातील अनेक विक्रेत्यांनी त्यांचा पैसा गुंतवून या लग्नसराईसाठी माल खरेदी केला होता. यात प्रामुख्याने कपड्याचे व्यापारी, पितळी तथा तांब्याची दागिने विकणारे परदेशी सोनार, काचेच्या बांगड्या विकणारे कासार आणि इतर दुकानदार, शिवाय बंजारा समाजाच्या लग्नात वापरले जाणारे कपडे विकणारे लोक होते. पण कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे लग्नसमारंभच रद्द झाले.

२०२० या काळात दळणवळण पूर्ण बंद होते. त्यामुळे आठवडी बाजारात उलाढाल करणारे लोक पंचक्रोशीत असणाऱ्या प्रमुख गावांमधे आठवड्यातील एकेक वार ठरवून या गावात सोमवारी, त्या गावात मंगळवारी, असे आठवडी बाजाराचे चक्र ठरवले जात असे. प्रत्येक विक्रेता प्रत्येक बाजारात जातो असे नव्हे अनेक जण केवळ तीन-चार बाजारांत जाणारे असतात. आठवड्याभराच्या किंवा पंधरवड्याच्या उधारीवर माल खरेदी करतात आणि आठवडभर विक्री करून, पहिल्या मालाचे पैसे देऊन पुन्हा दुसऱ्या आठवड्याचा माल खरेदी करतात! परस्परांच्या विश्वासावर बाजारातील हे व्यवहार गेल्या शेकडो वर्षांपासून चालत आले आहेत. टाळेबंदीच्या काळात सर्व कांही अनिश्चित असल्यामुळे विश्वास कोणी आणि कशाच्या आधारे ठेवायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला.

जुन्या काळात आठवडी बाजारातील व्यवहार हे वस्तुविनिमय पद्धतीने होत असत. त्यामुळे गावातील विविध सेवा देणारे-घेणारे, वस्तू उत्पादन करणारे-खरेदी करणारे लोक आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी आणि चरितार्थासाठी अशा बाजारांवर अवलंबून असत. वस्तुविनिमय असल्यामुळे परंपरागत व्यवसाय करणारे लोक इथे खरेदीदार आणि विक्रेतेसुद्धा असतात. त्यामुळे प्रत्येक जातीचा प्रतिनिधी या बाजारात आढळतो. जुने कपडे विकणारा काशीकापडे समाज, झाडू विकणारा मातंग समाज, फुटाणे विकणारा भोई समाज, कुलूप दुरुस्ती करणारा जोरी समाज किंवा लोखंडी वस्तू निर्माण करून विकणारा घिसाडी समाज, अशी विविध जातींची आणि जातीनिहाय व्यवसायांची उपलब्धता आठवडी बाजारात असते, म्हणजे होती असे म्हणावे लागेल! व्यवसाय आणि जाती यांचा संबंध आता राहिलेला नाही, कारण बाजारात मागणी कशाला आहे हे पाहून सध्या लोक व्यवसाय निवडतात.

टाळेबंदीच्या काळात दळणवळण बंद असल्याने परगावाहून आठवडी बाजारात येणारे विक्रेते आपल्या गावीच बंदिस्त झाले. ज्यांचा विक्रीचा माल नाशवंत नव्हता त्यांचे नुकसान झाले नाही. मात्र पैसे मालात गुंतून पडले. नाशवंत माल तर विक्रेत्यांना अखेर अक्षरशः


त्यामुळे अनेकांचे पैसे मालात गुंतले आणि नवीन रोजगार करावा तर तोही बंद झाला.

टाळेबंदीच्या ऐन मध्यात म्हणजे मे महिन्यात शासनाने कांही बाबी शिथिल केल्या, परंतु ही शिथिलता जीवनाव्यशव्यक वस्तूंबाबत होती. आठवडी बाजारातील ज्या विक्रेत्यांच्या वस्तू जीवनावश्यक नव्हत्या त्यांना मात्र काहीच करता आले नाही. आठवडी बाजारात इतर वस्तूंसोबत भाजीची दुकानेही असतात, पण जीवनावश्यक वस्तू म्हणून मिळणारी भाजी मूळ भाजी मार्केटमध्ये सुरुवातीपासूनच मिळत असल्यामुळे लोकांना भाजी खरेदीसाठी आठवडी बाजारात जाण्याची गरजच उरली नाही. पण इतर दुकानांना अडचण निर्माण झाली. बाजारात पाव विकणारा, फुटाणे, लाह्या, भजी विकणारा भोई समाज यांचा व्यवसाय पूर्णपणे बंद झाला. अखेरीस महामार्गावरील हॉटेलांना परवानगी मिळाली तेव्हा याच लोकांनी महामार्गावर लहान हॉटेले चालू करण्याचा प्रयत्न केला, मात्र तोही प्रत्येकाकडे भांडवल नसल्यामुळे शक्य झाले नाही.

टाळेबंदीचा काळ खरे तर सणांचा व यात्रांचा काळ होता. सण व यात्रा साजऱ्या कराव्या की नाही, त्यात श्रद्धा वा अंधश्रद्धा किती, त्यातील प्रथा-परंपरा योग्य की अयोग्य हा विषय वेगळा आहे. पण याच सण, समारंभ, यात्रा, जत्रा यावंर तळागाळातील अनेक लोकांचे पोट अवलंबून असते. गुढीपाडवा, अक्षयतृतीया, बुद्धपौर्णिमा, रमजान ईद असे अनेक प्रमुख सण या काळात होते. आमच्या भागात तुळजापूर, तेर, येरमाळा, हिंगळजवाडी या गावच्या यात्राही होत्या. आठवडी बाजारातील विक्रेत्यांसाठी या यात्रा म्हणजे पर्वणीच असतात. शिवाय सण असेल तर धंदा तेजीत असतो. या काळात दरवर्षी विक्री होऊन पैसे सुटायचे ते यावर्षी मिळूच शकले नाहीत. हीच कहाणी आठवडी बाजारातील प्रत्येक विक्रेत्याची आहे.

गावरान कोंबड्या विकणाऱ्या विक्रेत्यांकडे गावातून नवीन कोंबड्या आल्याच नाहीत. कारण खेडेगावांशी संपर्कच तुटला होता. अनेकांनी आपल्याकडील अन्नसाठ्याची विक्री करण्याऐवजी पुढील काळासाठी राखून ठेवणे योग्य समजले. ग्रामीण भागातील

लोक हे या बाजारातील ग्राहकांचे पुरवठादार! पण अनेक गावांनी गावाचे रस्ते बंद करून खंदक खोदले होते. म्हणजे टाळेबंदीबरोबर गावबंदीसुद्धा होती. गावातून कोणीही बाहेर जायचे नाही आणि गावात कोणी यायचे नाही असा शिरस्ता कांही गावांनी केला होता. त्यामुळे प्रत्येक गावातील गरजा गावातच भागवणे आणि गावाबाहेरील लोकांना प्रवेश नाकारणे ही उपाययोजना केली गेली. गावांना आपल्या गरजा गावातच भागवाव्या लागल्याम ुळे बलुतेदारीसारखी स्थिती पुन्हा निर्माण झाली. त्यातून गावात राहणाऱ्या अनेक विक्रेत्यांना मालातून नफा मिळवण्यापेक्षा कसेही करून पैसे रिकामे करणे ही प्राथमिकता ठरली. कारण धंदा बंद, पैसा नाही, रोजगार नाही, मग उपाशी राहण्यापेक्षा जसा जमेल तसा गावातच माल विकून इतर खर्चासाठी पैसा मोकळा करण्यात अनेकांचे धंदे बुडाले! जसे दगडी जाते, पाटा, वरवंटा विकणाऱ्या पाथ्रुड-पाथरवट समाजाकडे गेली अनेक महिने ग्राहक फिरकलेलाच नाही. त्यामुळे उपजीविकेसाठी या समाजाने बांधकाम व्यवसायातील मजूरीकडे आपला मोर्चा वळवला आहे. टाळेबंदी उठवण्याची प्रक्रिया सुरू झाल्यावर बांधकाम व्यवसाय आणि शेतीकामे यांना प्रथम शिथिल केले होते. त्यामुळे अनेक दुकानदार शेतीत मजुरी करण्यास निघून गेले तर ज्यांना शेतकाम जमत नाही ते बांधकामात मजुरी करू लागले आहेत. भोई समाज दरवर्षी गाठी वा साखरेचे हार पाडव्याच्या निमित्ताने बनवतो, यावर्षी ऐन पाडव्याच्या वेळी टाळेबंदी लागल्यामुळे हे हार विकलेच गेले नाहीत. हे हार पुढील वर्षी विक्रीयोग्य राहणार नाहीत. त्यामुळे त्यांनी यात गुंतवलेले पैसे हे कायमस्वरूपी बुडाले असेच म्हणावे लागते. पाडव्याच्या निमित्ताने लोक फडा आणि केरसुणी विकत घेतात. परंतु यावर्षी याची विक्री झालीच नाही. आता हे फडे-केरसुण्या तयार करणारा मातंग समाज हे सामान वर्षभर कसे सांभाळणार? बुरुड समाजाच देखील अशीच अवस्था! लग्नाच्या रुखवतात देण्यासाठी लागणारे साहित्य या वर्षी लग्नसराई नसल्यामुळे न्यायला कोणी आलेच नाही. ना दुरडी विकली गेली ना सूप!



तंबाखू विक्रेते मात्र या टाळेबंदीत घरातून गुपचूप तंबाखू विकत होते. त्यामुळे टाळेबंदी शिथिल झाली तेव्हा बाजारात तंबाखू खूपच कमी होता. टाळेबंदीत पानदुकाने बंद असल्यामुळे अनेक लोकांनी त्यांची विविध सुपाऱ्या, पाने आणि गुटखा खाण्याची तल्लफ याच तंबाखूवर भागवली. विशेष म्हणजे दळणवळण बंद असल्यामुळे त्यामुळे यावर्षी नवीन माल बाजारात आलाच नाही. जुना माल कमी पडला म्हणून चढ्या भावाने तंबाखूची विक्री झाली.

जून महिन्यात छत्री, कुलूप आणि स्टोव्ह दुरुस्त करणाऱ्या झोरी समाजाने मात्र आठवडी बाजारात बाजार नसतानाही दुकान थाटले होते. त्यांच्याकडे अनेक स्टोव्ह आणि छत्र्या दुरुस्तीस आल्या होत्या. पण जूनच्या दुसऱ्याच आठवड्यात झोरी गल्लीतील दोन लोकांना कोरोनाची लागण झाली आणि सर्वांनाच क्वारंटाइन व्हावे लागले! व्यवसाय बंद!

चुनखडी विकणाऱ्या लोणारी समाजाची अवस्था अगदी सुरुवातीला अशीच बिकट होती. पण बांधकाम व्यवसायाला सुरुवात झाल्यावर काही प्रमाणात ग्राहक येऊ लागले. जुने कपडे विकणाऱ्या काशीकापडे समाजाचा व्यवसाय मात्र पूर्णतः बंद आहे. यावर्षी पोळादेखील कसा होईल हे माहीत नाही. त्यामुळे पोळ्याच्या बाजाराची अवस्था बिकट असणार आहे. सुकट मासे विकणाऱ्या विक्रेत्यांची घरेच आठवडी बाजाराच्या जागीच असल्यामुळे अनेक ग्राहकांनी टाळेबंदीतही त्यांच्या घरी जाऊन सुके मासे घेतले अशी माहिती या विक्रेत्यांनी दिली.

माणसाच्या गरजा भागवण्यासाठी प्राचीन काळीच श्रम विभागणीतून व्यवस्था निर्माण झाल्या तर काही भागात त्या गरज पाहून आवर्जून निर्माण केल्या गेल्या. जीवन जगण्यासाठी पारंपरिक जातनिहाय, गावनिहाय व्यवसाय सोडून मग उपलब्ध असेल तो व्यवसाय लोक करू लागले. यापैकीच एक म्हणजे

बलुतेदारी ही एक व्यवस्था आपल्या देशात बराच काळ बळकट होती. आठवडी बाजारात हीच परस्परअवलंबित्व असणारी व्यवस्था वेगळ्या रूपात अस्तित्वात होती. आज जागतिकीकरणामुळे उत्पादन



आणि उपभोगाचे वर्तुळ कमालीचे व्यापक झाल्याने ही व्यवस्था हळूहळू नामशेष होत जात असली तरी तिचे बरे-वाईट अवशेष आठवडी बाजारातील व्यवसायांतून दिसतात.

मूळ बारा बलुतेदार, कारू आणि नारू यांच्या पलिकडेही काही कामे ही विशिष्ट जात, विशिष्ट समाज वंशपरंपरागत पद्धतीने आपल्या पिढीजात कौशल्याच्या आधारे करत येताना दिसतात. या सर्व व्यवस्थेवर झालेला हा टाळेबंदीचा आघात आजवरचा सर्वात मोठा आहे.

ग्रामीण भारतीय व्यापारपद्धतीमधला बलुतेदारी, अलुतेदारी, फिरस्ते यांच्यावर आधारलेला; जात, व्यवसाय, कुटुंब, गाव आणि शेती यावर आधारलेला, गावोगावी ग्रामीण व तळागाळातील अर्थकारणाचे चक्र असणारा आठवडी बाजार पुन्हा उभारी धरेल की नाही माहीत नाही. नोटाबंदीनंतर आठवडी बाजारावर झालेला हा दुसरा आणि सर्वात मोठा आघात आहे. अनेक वस्तू व सेवा आणि यांच्यावर आधारित सहजीवन व आत्मनिर्भरता यांचा वारसा असणारा आठवडी बाजार कायमस्वरूपी नष्ट होईल काय? नेमके काय होईल हे सांगता येत नाही.

आठवडी बाजारात टाळेबंदीनंतर पाहिले असता पूर्वीचे अनेक विक्रेते गायबच झाले होते जणू! सर्वकाही विरळ विरळ दिसत होते. पण जे विक्रेते आले नव्हते त्यांच्या जागा मात्र तशाच रिक्त ठेवल्या होत्या. त्यावर कोणीही वेगळे वस्तूचे दुकान थाटले नव्हते! जणू त्या जागेचे अनभिषिक्त सम्राट ते विक्रेतेच होते!

मात्र एक बाब पाहून जरा समाधान वाटले. आठवडी बाजारात एक नवीन वस्तू विकणाऱ्या तीन दुकानांनी बाजाराच्या प्रवेशद्वाराजवळच जागा पटकावली आहे! ती म्हणजे सध्या हवा, अन्न, पाणी यांच्यासारखीच तुम्हा आम्हासाठी जीवनावश्यक बनलेली वस्तू अर्थात् 'कापडी मास्क'! कोरोनानंतरच्या नव्या युगाची ही नांदी म्हणावे काय?

**– राज कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ८२७५७६००२२
rajkulkarniji@gmail.com

ग्रंथाली


## राज कुलकर्णी यांची तीन पुस्तके




वेताळ
पंचविशी

डायलेक्टिकल मांडणीतून सत्याचा, वास्तवाचा वेध.


**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




आठवडीबाजार
आणि समाज जीवन

राजकीय-सांस्कृतिक इतिहास जीवनशैलीपासून होणारा परिचय

**मूल्य १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**




दक्षिणेची मथुरा
तेर

हे पुस्तक गेल्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाची सैरच जणू!

**मूल्य १६० रु.**
**सवलतीत १०० रु.**

**नरहर कुरुंदकर (१५ जुलै १९३२-१० फेब्रुवारी १९८२) यांची नुकतीच १५ जुलै रोजी जयंती साजरी झाली. त्यानिमित्त त्यांचा वैचारिक वारसा आणि एकूणच उदारमतवाद याबद्दल ऊहापोह झाला. याच अनुषंगानं पाश्चात्त्य उदारमतवादी वैचारिक विश्वात सध्या काय चाललंय याचा हा छोटासा धांडोळा.**



**धनंजय गांगल**

# अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि उदारमतवाद

**पु**ढील काही नावं बघूया. भाषाशास्त्रज्ञ नोम चॉम्स्की; राजकीय विश्लेषक फरीद झकारिया; स्त्रीवादी आणि मानवाधिकार कार्यकर्ते ग्लोरिया स्टीनेम; लेखक सलमान रश्दी; विख्यात 'हॅरी पॉटर'ची लेखिका जे के. रोलिंग; पत्रकार आणि इतिहासकार ॲन अपलबम, 'द एंड ऑफ हिस्टरी अँड द लास्ट मॅन' (१९९२) या पुस्तकासाठी प्रसिद्ध असणारे अमेरिकन राजकीय विश्लेषक, अर्थशास्त्रज्ञ, लेखक फ्रान्सिस फुकुयामा; आंतरराष्ट्रीय संबंधातील भारतीय अमेरिकनतज्ज्ञ पराग खन्ना, पत्रकार डेक्स्टर फिलकिन्स ज्यांनी, राणा अयुबबरोबर काश्मीरमध्ये जाऊन 'न्यू यॉर्कर'साठी लेख लिहिला; भारतीय अमेरिकन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सर्जन अतुल गावंडे; आंतरराष्ट्रीय बुद्धिबळविजेता आणि नंतर पुतिन यांच्या एकाधिकारशाहीला विरोध करणारे गॅरी किमोविच कास्परोव्ह. या व्यक्तिमत्त्वांना जोडणारा समान धागा आहे तो उदारमतवादाचा. अशा कमीअधिक उदारमतवादी छटा बाळगणाऱ्या जवळपास दीडशे कृतिशील व्यक्तींनी उदारमतवादाचा आशय स्पष्ट करणारं एक पत्र 'हार्पर मॅगझीन'साठी लिहिलं, पण त्याआधी त्याला सार्वजनिक प्रसिद्धीही दिली. काय म्हटलंय या पत्रात? आम्ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं समर्थन करत आहोत कारण मत व्यक्त करणं म्हणजे इतरांवर ते लादणं, असं नाही. मतभिन्नतेचा आदर केला पाहिजे असे नेहमीचे मुद्दे त्यात आहेत. आता हे पत्र कोणाकरता लिहिलंय? नाही पत्र ट्रम्पला उद्देशून नाही की 'उजव्या' शक्तींना उद्देशून नाही. ते लिहिलं आहे आपल्याच भाऊबंदकीतील इतर काही 'तथाकथित उदारमतवाद्यांना' उद्देशून!! असं काय घडलं? गेल्या काही महिन्यांतल्या या घटना पाहूया

जूनच्या पहिल्या आठवड्यात जेम्स बेनेट या न्यू यॉर्क टाइम्सच्या संपादकाला (ओपिनियन एडिटर) आपल्या संपादकपदाचा राजीनामा द्यावा लागला. काय कारण घडलं? मे महिन्याच्या २५ तारखेला जॉर्ज फ्लॉईड या कृष्णवर्णीयाची, एका गौरवर्णीय पोलिसानं, मानेवर गुडघा दाबून हत्या केली. ही घटना घडली मिनिसोटा राज्यात. त्यानंतर अमेरिकेत एकच वादळ उठलं. सर्व थरांतून या घटनेचा निषेध झाला. कोविडला न जुमानता अनेक राज्यांत निषेधमोर्चे निघाले. काही ठिकाणी निषेधाचं पर्यवसान दंगली-सदृश परिस्थितीत झालं. 'ब्लॅक लाइव्हज मॅटर' (#BlackLivesMatter) नावानं चालणारी २०१३ ची चळवळ पुनरुज्जीवित झाली. दुसरीकडे ट्रम्प आणि त्यांच्या पाठीराख्यानी संधीचा राजकीय फायदा उचलत कृष्णवर्णीयांच्या विरुद्ध आणि गौरवर्णीयांच्या बाजूनं अनेक प्रक्षोभक विधानं करत आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न केला. याचे पडसाद अर्थातच वृत्तपत्रातून उमटत होते. त्यातच जेम्स बेनेट संपादित ओप-एड (ओपिनियन एडिटर) पानावर ३ जून रोजी एक लेख प्रसिद्ध झाला. तो होता रिपब्लिकन सिनेटर टॉम कॉटन यांचा. त्याचं शीर्षक होतं 'सेंड इन द ट्रूप्स.' अमेरिकेत हे शीर्षक प्रक्षोभक आहे. सिनेटर टॉम कॉटन अरकन्सास राज्याचे आहेत आणि ते डोनाल्ड ट्रम्प यांचे खंदे पाठिराखे आहेत. या लेखातला साधारण युक्तिवाद होता, की कृष्णवर्णीय निषेधाच्या निमित्तानं दंगली घडवून अमेरिकेत बेदिली माजवण्याचा कट आहे. परिस्थिती गंभीर आहे. त्यावर उपाय म्हणून ट्रम्प यांनी 'दि इन्सरेक्शन एक्ट' या १८०७ च्या कायद्याचा उपयोग करून लष्कराला पाचारण करावं आणि या गंभीर परिस्थितीवर लष्करी बळाचा वापर करून नियंत्रण मिळवावं. लष्कराला पाचारण करण्याबाबत भारत आणि अमेरिकेत महत्त्वाचा फरक आहे. भारतात 'नैसर्गिक आपत्ती' किंवा 'सामाजिक अशांतता' या दोन कारणांसाठी लष्कराला पाचारण करण्यात येतं. अगदी बाबा राम रहीमला अटक करण्यासाठी खबरदारी म्हणून लष्कराला पाचारण करण्यात आलं होतं. आपल्याला त्यात काही वावगं वाटत नाही. अमेरिकेत तसं नाही. लष्कराला अंतर्गत सुरक्षिततेसाठी बोलावणं म्हणजे एकप्रकारे परिस्थिती 'अत्यंत गंभीर' असून ती अंतर्गत सुरक्षादलाच्या हाताबाहेर आहे अशी ग्वाही राष्ट्रपतींनी

देणं. शेवटची लष्कराला बोलावण्याची वेळ १९९२ साली आली होती. कॅलिफोर्नियाचे तत्कालीन गव्हर्नर पीटर विल्सन यांच्या विनंतीवरून राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश यांनी ती ऑर्डर काढली होती. तेव्हाही रॉडनी किंग या कृष्णवर्णीय तरुणाला लॉस अँजेल्स पोलिसांकडून मारहाण झाली होती आणि त्यात त्याचा दुर्दैवी अंत झाला. पण, पुढे पुरेशा पुराव्याअभावी त्या चार पोलिस अधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता झाली आणि एकाच दंगल उसळली होती. या पार्श्वभूमीवर, रिपब्लिकन सिनेटर टॉम कॉटन यांचा 'लष्कराला पाचारण करा' हा लेख अनेकांना प्रक्षोभक, जाणीवपूर्वक आगीत तेल ओतण्याचं काम करतोय असं वाटलं. सध्या आपल्याकडे सरकारला विरोध करणाऱ्या बुद्धिवंतांचा उल्लेख 'अर्बन नक्षल्स' आणि देशद्रोही' म्हणून करण्याचा प्रघात आहे. सिनेटर टॉम कॉटन तेवढ्या टोकाला गेले नाहीत, पण एकूणच ट्रम्प यांना विरोध करणाऱ्या बुद्धिवंतांबद्दल त्यांनी साधारण त्या अर्थाची छद्मी विधानं केली. या लेखाला प्रसिद्धी देणारे न्यू यॉर्क टाइम्सचे ओप-एड संपादक जेम्स बेनेट यांची अशी भूमिका होती की हे रिपब्लिकन सिनेटर टॉम कॉटन यांचं व्यक्तिगत मत आहे आणि ते व्यक्त करण्याचा त्यांचा अधिकार आहे. पण याबाबत जेम्स बेनेट यांच्याविरुद्ध वाचकांकडून आणि मुख्य म्हणजे न्यू यॉर्क टाइम्समधील त्यांच्या सहकाऱ्यांकडून कमालीची टीका होऊ लागली. सेवेल चॅन या पूर्वसंपादकानं, निकोल हानाह जोन्स या न्यू यॉर्क टाइम्सच्या कृष्णवर्णीय लेखिकेनं, अशा अनेकांनी कडाडून निषेध केला. जवळपास आठशे ते हजार सहकाऱ्यांनी टीकेचं आणि निषेधाचं एक लिखित पत्रच सादर केलं. हे प्रकरण गाजू लागलं तसे सिनेटर टॉम कॉटन वेगवेगळी विधानं करू लागले. आपल्या लेखाचा चुकीच्या पद्धतीनं अर्थ लावला जातोय याबद्दल तक्रार केली. ''जर पोलीस परिस्थिती आटोक्यात आणण्यात कमी पडले तर बॅकअप म्हणून लष्कराला पाचारण करावं'' असं आपण म्हटलंय अशी सारवासारव केली. मग त्यांनी न्यू यॉर्क टाइम्सवर आपल्याच वृत्तपत्रातील लेखाबद्दल बोटचेपी भूमिका घेण्यावरून टीका केली. न्यू यॉर्क टाइम्सला 'फेक न्यूज' संबोधणाऱ्या ट्रम्प यांनीही याची दखल घेऊन यासंबंधी टीकात्मक ट्विट्स केली. न्यू यॉर्क टाइम्स व्यवस्थापनानं संपादक जेमस बेनेट यांची पाठराखण करणं किंवा या 'अभिव्यक्तिस्वातंत्र्याचं' समर्थन करण्यास पूर्ण नकार दिला. त्याचं पर्यवसान जेम्स बेनेट यांच्या राजीनाम्यात झालं. नवल म्हणजे सहा महिन्यांपूर्वी तालिबानच्या एका नेत्याचा 'आम्हाला (तालिबानला) काय हवं आहे?' हा लेखही 'ऑप-एड'मध्ये छापला गेला होता. तेव्हा कोणालाही त्यात काहीच वावगं वाटलं नाही! टाइम्सच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला धरूनच ते आहे असं समाधान बहुतेकांनी करून घेतलं असावं.

त्याच सुमारास स्टॅन विचनोवस्की या 'फिलाडेल्फिया एन्क्वायरर'च्या संपादकालाही अशाच एका कारणासाठी राजीनामा द्यावा लागला. पुलित्झर पुरस्कार विजेती आर्किटेक्चर समीक्षक इंगा सॅफरॉननं या दंगलीत काही प्राचीन इमारतींचं आणि मालमत्तेचं नुकसान होत आहे याविषयी चिंता व्यक्त केली आणि त्याला मथळा दिला गेला 'बिल्डिंग्स मॅटर, टू'! आता ही 'ब्लॅक लाइव्हज मॅटर'ची (#BlackLivesMatter) थट्टा उडवली जात्ये असं अनेकांचं मत झालं. चोहोबाजूंनी टीका होऊ लागली. शेवटी स्टॅन विचनोवस्की यांना या लेखाची जबाबदारी घेऊन पायउतार व्हावं लागलं. जवळपास याच धर्तीवर 'ऑल लाइव्हज मॅटर' असं ट्वीट केल्याबद्दल ग्रॅन्ट नेपियर याला त्याच्या रेडिओ स्टेशनद्वारा काढून टाकण्यात आलं! यूनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस – यूसीएलएचे प्राध्यापक गॉर्डन क्लाईन यांना जॉर्ज फ्लॉईडच्या मृत्यूनंतर अंतिम परीक्षा रद्द करण्यास नकार दिल्याबद्दल सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे.

दुसरीकडे 'दि नॅशनल बुक क्रिटिक्स सर्कल'च्या (NBCC) बोर्डानं 'ब्लॅक लाइव्हज मॅटर'ला पूर्ण पाठिंबा दिला. तरी वांशिक भेदभावाच्या आरोपावरून जवळपास अर्ध्या बोर्डाला राजीनामा द्यावा लागला. का तर अंतर्गत इमेल-चर्चेत एका सदस्यानं, रोमानो यानं 'ब्लॅक लाइव्हज मॅटर'ला पाठिंबा देण्याबाबत काही शंका आणि मतभेद व्यक्त केले. कृष्णवर्णीय असलेल्या होप वाबुके या दुसऱ्या लेखिकेला ही इमेल्स मिळाली आणि याबद्दल चीड येऊन तिनं ती सार्वजनिक केली. झालं, एकाच गदारोळ मजला. ज्याचं पर्यवसान राजीनामानाट्यात झालं. दुसरीकडे पोएट्री फाऊंडेशनच्या डेव्हिड शोर यानं एक लेख ट्वीट केला. १९६८ साली झालेल्या अशाच दंगलीमुळे गौरवर्णीय मतं निक्सन यांना कशी मिळाली याचं अभ्यासपूर्ण विवेचन त्यात होतं. पण हा 'ब्लॅक लाइव्हज मॅटर'ला विरोध समजून त्याला राजीनामा देण्यास सांगण्यात आलं.

न्यू यॉर्क टाइम्समध्ये बरेच ओपिनियन एडिटर असतात. वेगवेगळे मतप्रवाह या वृत्तपत्रात यावेत यासाठी ते प्रयत्नशील असतात. गेल्या तीनहून अधिक वर्षांत त्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले आणि त्यालाही कारण घडलं. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनपेक्षित विजयानंतर जनमताचा कानोसा घेण्यात आपण पूर्ण अपयशी ठरलो (हॉरिबली रॉन्ग) याबद्दलचा खल न्यू यॉर्क टाइम्समध्ये झाला. एकाच पठडीतील विचारसरणी अनुसरून आपण भाकितं वर्तवतो याची जाणीव झाली. जनमताचे वेगवेगळे आवाज आणि वैचारिक छटा याचं टाइम्समध्ये प्रतिबिंब पडावं म्हणून काही नेमणुका करण्यात आल्या. त्यातील बारी वेस ही या टीममधील एक महिला ओपिनियन एडिटर. ती उजवी नाही पण डावी निश्चित नाही. अर्थात इस्राएलबद्दल ती संवेदनशील आहे आणि इस्राएलविरुद्ध असलेलं मत ती शक्यतो टाळते, हा तिच्यावर आरोप आहेच. असो. तिनं समन्वयी भूमिका घेऊन डाव्या-उजव्या दोन्ही मतांना ऑप-एडमध्ये स्थान द्यायला सुरुवात केली. ती आणि वर उल्लेखलेले ऑप-एडचे दुसरे संपादक जेम्स बेनेट वगैरेंच्या या नव्या 'समन्वयी' भूमिकेबद्दल न्यू यॉर्क टाइम्समधेच अनेकांना राग होता. जेम्स बेनेटच्या राजीनाम्यानंतर असं म्हणतात की टाइम्सनं 'रेड फ्लॅग' नावाची नवी कार्यप्रणाली आणली. या प्रणालीयोगे जर कनिष्ठ संपादकांना आपल्या वरिष्ठ संपादकानं निवडलेला लेख किंवा विषय 'विवादास्पद' वाटला तर ते पुनरावलोकनाची मागणी करू शकतात किंवा अगदी 'व्हेटो' आणू शकतात. बारी वेसच्या बाबतीत या 'रेड फ्लॅग'चा (गैर)उपयोग करून तिला काम करणं अशक्य करण्यात आलं. शेवटी कंटाळून तिनं राजीनामा दिला.

''अत्यंत प्रतिकूल आणि दादागिरीचे व्यावसायिक वातावरण (बुल्लिंग होस्टाईल वर्क एन्व्हायर्नमेंट)'' असा उल्लेख तिनं राजीनामापत्रात केला. पत्रात पुढे म्हटलं आहे की प्रसारमाध्यमांमध्ये, आणि खासकरून या वर्तमानपत्रात एक नवी सहमती निर्माण झाली आहे, सत्य ही सामूहिक शोधाची प्रक्रिया राहिली नाहीये. काही ज्ञानी लोकांना आधीच माहीत असलेली एक सनातनी परंपरा आहे जे इतरांना परत परत सांगणं एवढाच उद्योग वर्तमानपत्रांना उरला आहे. तिनं आपल्या राजीनामापत्रात पुढे न्यूयॉर्क टाइम्सचे आद्य-पुरुष ॲडॉल्फ ओच यांच्या वचनाची आठवण करून दिली. ते वाक्य होतं, ''हे वृत्तपत्र नेहमीच सर्व मतांच्या छटा दाखवून बुद्धिमान चर्चेला आमंत्रित करेल.'' पुढे ती म्हणते, ''ट्विटरच्या तालावर येथील संपादकीय धोरण ठरतं.'' अशाच संदर्भात, संज्ञानात्मक मानसशास्त्र (कॉग्निटिव्ह सायकलॉजी) या विषयात सखोल अभ्यास असणारे स्टीव्हन पिंकर तर पुढे जाऊन म्हणाले, की ट्विटर हे साक्षर मानवतेचं काही भव्य, अनुकरणीय उदाहरण नाही. ट्विटर, फेसबुक, व्हाट्सअप यांसारखे सोशल प्लॅटफॉर्म, त्यांच्या पारंपरिक माध्यमांच्या संपादकीय धोरणांवर होत असेलेला अतिशोयोक्त प्रभाव याकडे अनेकांनी लक्ष वेधलं.

दैवदुर्विलास म्हणजे जनमताचे वेगवेगळे आवाज आणि वैचारिक छटा याचं टाइम्समध्ये प्रतिबिंब पडावं म्हणून तीन वर्षांपूर्वी जी वेगळी वाट टाइम्सनं चोखाळण्याचा प्रयत्न केला ती गिरकी घेऊन पुन्हा मूळ जागीच आली. वरील उदाहरणं नमुन्यादाखल. अशी अनेक उदाहरणं घडत आहेत. आता नोम चॉम्स्की; फरीद झकारिया; सलमान रश्दी; जे.के. रोलिंग; फ्रान्सिस फुकुयामा, अतुल गावंडे; गॅरी कास्परोव्ह अशा दीडशे उदारमतवादी व्यक्तिमत्त्वांनी लिहिलेल्या मूळ पत्राकडे येऊया. त्या पत्राचे सार असं आहे की वरील घटनेतील अनेकांशी तुमचे तीव्र मतभेद असू शकतात. ते तुम्ही व्यक्त करा - त्यांना विरोध करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे, पण त्यांची कारकीर्द न गमावता ते सांगण्याच्या त्यांच्या हक्काचंही तुम्ही समर्थन केलं पाहिजे. पटलं नाही की राजीनामा मागून त्याला बहिष्कृत करणं ('कॅन्सल कल्चर') ही उजव्या फॅसिस्टांची 'नर-भक्षक' प्रवृत्ती आहे. तिची लागण आता उदारमतवादी' या गोंडस नावाखाली होऊ लागली आहे. मग आपल्यात आणि 'उजव्या फॅसिस्ट' प्रवृत्तीत फरक तो काय?


अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि उदारमतवाद याला अनेक आयाम आहेत. व्होल्टेअरच्या ''तुझे मत मला पूर्ण अमान्य आहे, परंतु माझ्या मृत्यूच्या क्षणापर्यंत तुझ्या मत मांडण्याच्या अधिकाराचा मी बचाव करीन'' या वाचनापासून जॉर्ज ऑरवेलच्या ''स्वातंत्र्य म्हणजे इतरांना न आवडणाऱ्या गोष्टी सांगण्याचा अधिकार'' या वाक्यापर्यंत त्याला अनेक छटा आहेत. किंबहुना दुसऱ्याला न दुखावता अभिव्यक्तिस्वातंत्र्य असूच शकत नाही!

बघूया ही चर्चा पुढे काय वळणं घेत्ये!

**- धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

ग्रंथाली

## लाल माती
शब्दांकन
**विश्वास पाटील**




दीनानाथ सिंह यांच्या आयुष्याचा पट

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## जातिव्यवस्था
आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती
**सुनिल सांगळे**




जातिव्यवस्थेचा शोध घेणारा मौलिक ग्रंथ

**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

वयाच्या सेहेचाळीसाव्या वर्षी दोनवेळा त्यांच्या मेंदूतील रक्तस्राव थांबवावा लागला. पहिल्या बायकोचा व मुलीचा अपघाती मृत्यू झाला. त्यांचा ज्येष्ठ मुलगा मेंदूत गाठ सापडल्यामुळे कालवश झाला. त्याची शेवटची इच्छा होती की वडिलांनी अध्यक्षपदासाठी पुन्हा उभं राहावं. पूर्वीचे दोन प्रयत्न फसल्यावरही ज्यो बायडन आता ट्रम्पना हरवून अध्यक्ष होण्याची स्वप्नं तिसऱ्यांदा बघत आहेत. तो घास हाताशी आला आहे. परंतु ओठांत आणि हातात बरंच अंतर असतं, असं इतिहास सांगतो.



डॉ. अनंत पां लाभसेटवार

# अध्यक्षपदाचे ट्रम्पचे प्रतिस्पर्धी ज्यो बायडन

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण अध्यक्षीय निवडणुकीसाठी पुन्हा उभं राहणार हे केव्हाच जाहीर केलं होतं, पण त्यांच्याविरुद्ध डेमॉक्रेटिक पक्षाचा कुठला दावेदार लढणार हे आतापर्यंत अनिश्चित होतं. परवा त्यांचा सामना करणारा जो एकमेव दावेदार (सिनेटर बर्नी सँडर्स) उभा होता त्यानं माघार घेतली आणि ज्यो बायडन यांना आपोआप त्या पक्षाचं नामांकन मिळालं. त्यांचा रीतसर अभिषेक कोरोनामुळे पुढे ढकललेल्या अधिवेशनात या महिन्यात होईलच.

आता दोन कुठले वीर अध्यक्षपदाचा सामना खेळणार हे जगाला कळलं. त्यांच्यामधील लढाईच्या रूपरेखा अगोदरच क्षितिजावर दिसू लागल्या. या वादात कोरोनाकहर आणि चीन केंद्रस्थानी असणार हे उघड झालं. ट्रम्पनी अगोदर बंधनं घातली असती तर कोरोनामुळे एवढी हानी झाली नसती असा ज्यो बायडन व डेमॉक्रेटिक पक्षाचा दावा, तर ओबामा-ज्यो बायडननी चीनविरुद्ध कठोर भूमिका घेतली नाही म्हणून तो देश उन्मत्त होऊन त्याला विस्तारगंडाची नशा चढली आहे असा प्रतिटोला ट्रम्प मारताहेत. दक्षिण चीन समुद्रात चीननं अनेक बेटं ताब्यात घेऊन तिथे लष्करी छावण्या बांधल्या. त्याला ओबामा-बायडन या जोडीनं मुळीच विरोध केला नाही. आता हा बोका अमेरिकेच्या मानेवर बसून त्या महासत्ताक राष्ट्राची परीक्षा बघत आहे. नुकतंच त्या मार्क्सवादी देशानं जगाचं लक्ष कोरोनावरून हटवण्यासाठी व्हिएतनामची एक बोट बुडवली. मलेशियाच्या समुद्रात तेलउत्खनन करणाऱ्या जहाजाला धाक दिला. इंडोनेशियाच्या जवळील समुद्रात घुसखोरी केली, जपानच्या नौदलाला टक्कर दिली आणि पश्चिमेला काठावर असलेल्या स्वायत्त कझाकिस्तान या उभ्या देशावर आपल्या अरुणाचलप्रदेशाप्रमाणे मालकी हक्क जाहीर करून भारताच्या गलवान खोऱ्यात आक्रमण केलं.


याप्रमाणे अमेरिका कोरोनानिवारण करण्यात गुंतलेली असताना चीननं व्यूहात्मक वर्चस्व शक्तिप्रदर्शन केलं. त्यामुळे ही अध्यक्षीय चुरस चांगली रंगणार यात वाद नाही. पण ट्रम्पचे प्रतिस्पर्धी ज्यो बायडन आठ वर्षं उपाध्यक्ष (२००९-१६) म्हणून ओबामांच्या छायेत वावरले. तरीही जगाला त्यांचा फारसा परिचय नाही.

### नामांकनामागचं रहस्य

बायडन जेव्हा आखाड्यात उतरले तेव्हा त्यांच्याबरोबर अन्य दोन डझन लहा-नमोठे, गरीब-श्रीमंत व स्त्रीपुरुष दावेदार होते. त्यावेळी बायडनना कुणी महत्त्व दिलं नाही. यापूर्वी डेलावेअर या नकाशात बघण्यास भिंग लागणाऱ्या टिंबसदृश राज्याचे (लोकसंख्या १० लाख) सिनेटर असताना दोनदा अध्यक्षपदासाठी त्यांनी शंख फुंकले होते. १०८८ मध्ये एका प्रचारसभेत त्यांनी ब्रिटिश राजकारणाच्या भाषणाचा उतारा श्रेय न देता जसाच्या तसा वापरला व चौर्यकर्माचा आरोप विरोधकांनी करताच गाशा गुंडाळला. मग २००८ मध्ये ते ओबामांविरुद्ध उभे राहिले आणि पडले. त्यावेळी ओबामांनी त्यांना उपाध्यपदासाठी निवडलं.

२०१६ मध्ये त्यांना तिसऱ्या प्रयत्नासाठी काही लोकांनी आग्रह केला, पण आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या मृत्यूच्या शोकामुळे लढाईत उतरू शकत नाही हे निमित्त सांगून प्रचारासाठी जीभ उचलण्याऐवजी हातात लेखणी घेतली आणि प्रॉमिसेस टू कीप (Promises to Keep) नावाचे पुस्तक लिहिलं. त्यापासून त्यांना जे मानधन मिळालं व भाषणं ठोकण्यासाठी जी आमंत्रणं आली त्यातून ते प्रथमच लक्षाधीश झाले. त्यांच्या प्रत्येक भाषणाची फी एक लाख डॉलर होती. याप्रमाणे त्यांचे थेंब मोठे असल्यामुळे तळं साचण्यास वेळ लागला नाही. नाहीतर वॉशिंग्टनमध्ये १०० सिनेटर्सचा जो लक्षाधीशांचा क्लब आहे त्यात ज्यो बायडन दुसऱ्या नंबरचे गरीब होते. आता त्यांची निव्वळ संपत्ती ९ दशलक्ष डॉलर (६७ कोटी रुपये) आहे. तरीही ते उद्धव ठाकरेंपेक्षा गरीबच आहेत.

त्यांनी २०१९ मध्ये जेव्हा दावेदारीची घोषणा केली तेव्हा लोकांनी जांभया दिल्या. फार कमी चाहत्यांनी त्यांना पाठिंबा दिला. त्यामुळे निवडणुकीसाठी पैसा उभा करणं कठीण झालं. त्यांच्याविरुद्ध दोन अब्जाधीश आखाड्यात उतरले होते. बायडनजवळ फक्त एक संपत्ती होती, ती म्हणजे नाव. सगळं आयुष्य राजकारणात घालवल्यामुळे व शेवटची ८ वर्षं उपाध्यक्षपद भूषवल्यामुळे बायडन अधिकांश लोकांना परिचित होते. पण त्यांनी कुठली कामगिरी केली हे लोकांना ठाऊक नाही. आता त्याभोवती कृष्णवलयं पसरली आहेत.



ज्यो बायडन

एक म्हणजे त्यांचं वय. ७७ वर्षीय बायडनची गाडी केव्हाच निघून गेली असं लोक म्हणू लागले. ते नव्या दमाच्या अंगात ऊर्जा सळसळत असलेल्या नेत्याला प्राधान्य देतात. एवढंच नव्हे तर बायडन वृद्धपकाळाची चिन्ह दाखवत आहेत. त्यांची बौद्धिक संपदा झिजली आहे हे त्यांच्या भाषणावरून सिद्ध झालं. मुळातच त्यांना चुका करण्याची सवय असल्यानं लोक त्यांना 'गॅफी मशिन' संबोधू लागले. आता २०२० मध्ये हा रोग अधिकच बळावला होता. त्यांच्या चुका मामुली म्हणून दुर्लक्षित करण्यासारख्या नाहीत.

आता त्यात बुद्धिभ्रंशाची भर पडली आहे. ते स्थलकालाचं भान विसरू लागले. त्यांना आपल्या उपाध्यक्षाच्या कारकिर्दीचा काळ आठवेना. म्हणून त्यांच्या सल्लागारांनी त्यांचं टीव्हीवर मुलाखती देणं बंद केलं. भाषणं ७ मिनिटांपुरती मर्यादित करण्यात आली आणि तीसुद्धा लिहून दिलेली वाचण्यापुरती. त्यामुळे चुका कमी झाल्या. याप्रमाणे बाटलीत बंद केलेला दावेदार यापूर्वी कधी मैदानात उतरला नव्हता. प्रत्येक भाषणानंतर प्रश्नोत्तराचा काळ असतो. त्यावेळी वार्ताहार चिकित्सक प्रश्न विचारून दावेदाराची भूमिका समजून घेतात. त्यावर बहिष्कार टाकण्यात आला. अशा परिस्थितीत कुठला शहाणा या घोड्यावर पैसे लावणार? पण अलिकडे ट्रम्पद्वेष्ट्यांनी तसं केलं हे विशेष.

फेब्रुवारी २०२०च्या महिन्यात प्राथमिक चाचण्या (Primaries) सुरू झाल्या. त्यापूर्वी अनेक चर्चासत्रं आखण्यात आली. दोन डझन दावेदार टीव्हीच्या भिंगात व व्यासपीठावर मावत नसल्यामुळे त्यांची दोन गटांत विभागणी करण्यात आली. त्यावेळी बायडननी अनेक चुका केल्या व नापसंती वाढली. महासत्ताक राष्ट्राचं अध्यक्षपद भूषवणाऱ्याला अनेक निर्णय घ्यावे लागतात. त्याचा अमेरिकन लोकांवरच नव्हे तर सर्व जगावर परिणाम होतो. त्यानं लाल कळ दाबली की तिसरं महासंहारक युद्ध सुरू होऊ शकतं. म्हणून अशा जबाबदारीच्या पदावर बुद्धिभ्रंशग्रस्त माणूस कसा आरूढ होऊ शकेल असा लोकांना प्रश्न पडला. त्यामुळे पहिल्या तीन राज्यांत ज्या चाचण्या झाल्यात त्यात बायडन आपटले. त्यांना फारशी मतं मिळाली नाहीत. याचं समर्थन करण्यासाठी ते म्हणाले, की या ३ राज्यांमध्ये तोंडी लावण्यापुरतेदेखील कृष्णवर्णीय मतदार नव्हते. जे त्यांची पाठराखण करणारे हे सर्वेक्षणात आढळलं होतं. चौथं राज्य होतं साऊथ कॅरोलयना. तिथले ६५% डेमॉक्रेटिक मतदार कृष्णवर्णीय. तो आपला बालेकिल्ला असं बायडननी जाहीर केलं. तिथे आपली डाळ शिजली नाही तर आपण घरी परत जाऊ असं त्यांना अभिप्रेत होतं. त्या प्रांतातले जिम क्लायबर्न नावाचे मुरलेले कृष्णवर्णीय नेते बायडनच्या पाठिशी होते. त्यांनी सर्व कृष्णवर्णीयांनी बायडनच्या पाठीशी उभं रहावं म्हणून दोन दिवस अगोदर भाषण दिलं. एव्हाना दैनिकांनी बायडनविषयी राजकीय मृत्युपत्र लिहूनदेखील ठेवलं होतं. ते फक्त प्रसिद्ध करायचं राहिलं होतं. त्यांच्याविषयी एवढी निराशा पसरली होती.

फेब्रुवारी २०२० च्या २९ तारखेला मतदान झालं आणि चमत्कार घडला. बायडननी दुसऱ्या नंबरवर असलेल्या सिनेटर बर्नी सँडर्सला २८.९ टक्क्यांनी हरवून निर्णायक यश कमावलं. एकदम त्यांची मूर्छितावस्थेत असलेली प्रचारयंत्रणा (Campaign) ऊर्जितावस्थेत आली. दैनिकांनी गौरवपत्र प्रसिद्ध केलं. त्यांच्या प्रचाराला एवढी गती (Momentrm) आली की त्यानंतरची अनेक राज्यं त्यांनी जिंकली व बर्नी सँडर्सला मागे टाकलं. या अनेक प्रांतांत त्यांनी जाहिराती केल्या नव्हत्या, भाषणं ठोकली नव्हती की प्रचारसभा भरवल्या नव्हत्या. एवढंच कशाला तिथे पायही ठेवला नव्हता. कारण या सर्व गोष्टी करण्यासाठी पैसा लागतो. तोच त्यांच्याजवळ नव्हता. पण यशाबरोबर लक्ष्मीही आली. चाहत्यांनी पैसे पाठवण्यास सुरुवात केली. मग एकामागून एक नामवंत डेमॉक्रेटिक पक्षाच्या पुढाऱ्यांनी बायडनना पाठिंबा दिला. प्रतिकूल भविष्य ओळखून दुसऱ्या नंबरवर असलेल्या बर्नी सँडर्सनी माघार घेतली व रणांगणात एकच वीर उरला. १४ एप्रिल २०२० रोजी डेमॉक्रेटिक पक्षात देवासमान आदर असलेल्या ओबामांनीदेखील प्रथमच आपल्या उपाध्यक्षांना जाहीरपणे मत दिलं आणि बायडनना नामांकनासाठी रस्ता मोकळा केला.

हे यशाचं फळ कुठलीही आशा नसताना बायडनच्या पदरात कसं पडलं? ते आपल्या कर्तृत्वामुळे नक्कीच यशस्वी झाले नाहीत. बर्नी सँडर्सच्या भूमिका एवढ्या टोकाच्या, की त्यामुळे मध्यममार्गी डावे बायडनकडे वळले. बर्नीला विद्यार्थ्यांचं एकूण १.६ लाख कोटी डॉलरचं कर्ज रद्द करून शिक्षण मोफत द्यायचं होतं. अब्जाधीशांवर कर लादून त्यांची जात नष्ट करायची होती. वॉल स्ट्रीट, मोठ्या बँका व औषध कंपन्यांवर त्यांचा खास रोष. त्यांचं विघटन करून काही राष्ट्रीयीकृत करण्याचा यांचा विचार होता. सिलिकॉन व्हॅलीतल्या जगप्रसिद्ध तंत्रज्ञान कंपन्यांचं विघटन करण्याचं त्यांनी घोषित केलं होतं.

त्यांच्या सर्वात मोठ्या दोन योजना म्हणजे १५-२० दशलक्ष

अवैधांसह सर्वांना आरोग्यविमा उपलब्ध करून देणं व जीवाष्म युक्त इंधनावर बहिष्कार घालून वाहनबंदी व विमानबंदी करणं. या आरोग्य विमाविस्तारासाठी सरकारजवळ पैसे नसल्यामुळे त्यांनी अब्जाधीशांचे खिसे कापण्याचं ठरवलं. त्यांचे उत्पन्नकर गगनचुंबी करून त्यांची अधिकृत लूटमार होणार होती. पण, एवढे बकरे कापले तरी पुरेसे पैसे उभे होणार नसल्यामुळे शेवटी सर्वसामान्यांवर कर भार पडणार हे उघडकीस येताच बर्नीच्या लोकप्रियतेला ग्रहण लागलं आणि कुठलेच कष्ट न करता बायडनना नामांकन मिळालं. सर्व अमेरिका समाजवादी करून आर्थिक विषमता नष्ट करण्याचं बर्नीचं उदात्त उद्दिष्ट बघून अतिडावे सोडून सर्व घाबरले व दुसरा पर्याय नसल्यामुळे बायडनकडे पळाले. हे त्यांच्या यशाचं गमक आहे.

**राजकीय वाटचाल**

बायडननी सर्व आयुष्य राजकारणात घालवलं व चांगलं नाव कमावलं. ते तीन दशकांहून अधिक डेलावेअर राज्याचे सिनेटर होते. त्या काळात त्यांनी आपलं निवासस्थान वॉशिंग्टनमध्ये हलवलं नाही. ते रोज सकाळी रेल्वेनं ९० मैलांचा प्रवास करून वॉशिंग्टनला जात व संध्याकाळी परतत. या दीड तासाच्या प्रवासात ते बरचसं ऑफिसचं काम उरकून टाकत. आगगाडीत त्यांचं टेबल ठरलेलं. तिथं दुसरं कुणी बसत नसे. वॉशिंग्टनच्या सत्तेच्या भोवऱ्यात ते कधीच अडकले नाहीत. त्यांना पिण्यात किंवा तिथल्या कधीच न संपणाऱ्या पार्ट्यांना हजेरी लावण्यात मुळीच रस नसे. त्यामुळे ते तिथल्या राजकीय गाळापासू दूर राहिले. याचा अर्थ भ्रष्टाचार त्यांना शिवला नाही असं नव्हे.

बायडनचं राजकारण मध्याच्या डावीकडचं व उदारमतवादी, तर बर्नी टोकाच्या मताचे. त्यांचे चाहते आकर्षित करण्यासाठी बायडनला अधिकच डाव्या भूमिका घ्याव्या लागल्या. यात बराच धोका होता. कारण डावीकडे जास्त वळलं तर मध्यावरील मतदार मिळवणं कठीण. त्यात समतोल गाठण्यास बरीच राजकीय कसरत त्यांना करावी लागली. तरीही बर्नीच्या अनेक चाहत्यांनी आपण या डेलावेअरच्या दावेदाराला कधीच मतं देणार नाही अशा घोषणा केल्या. ते एकतर घरी बसतील नाही तर ट्रम्पला मतं देतील असं म्हणतात.

१९६८ मध्ये सिरक्युज युनिव्हर्सिटी, सिरॅकूज, न्यू यॉर्क राज्य या सुमार विद्यापीठातून विधि पदवी मिळवल्यावर ते वकिली करण्यासाठी डेलावेअरमध्ये परतले. बर्हिमुख व स्वागतशील स्वभाव असल्यामुळे त्यांना मित्र जोडणं सोपं गेलं. म्हणून दोनएक वर्षं स्थानिक राजकारणात उलाढाली केल्यावर ते सिनेटरच्या जागेसाठी उभे राहिले आणि १९७२ मध्ये रिचर्ड निक्सन अध्यक्ष असताना वयाच्या तिसाव्या वर्षी निवडून आले. त्यानंतर दर ६ वर्षांच्या मुदतीनंतर सहाव्यांदा यशस्वी झाले. १९७४ साली 'टाईम' या प्रसिद्ध साप्ताहिकानं त्यांचा उज्वल भविष्य असलेल्या दोनशे लोकांच्या यादीत समावेश केला व त्यांच्या शिरपेचात पहिला मानाचा तुरा रोवला. त्यावेळी वर्णभेद अमेरिकेत बोकाळला होता. तो नष्ट करण्यासाठी काही वर्षांपूर्वी अध्यक्ष केनेडींनी शाळेतील वर्णीय विलगीकरणावर बंदी घालून कृष्णवर्णीयांना गोऱ्यांच्या शाळा मोकळ्या केल्या. परंतु डेलावेअर हे प्रामुख्यानं श्वेतवर्णीयांचं राज्य. त्यांना खुश ठेवून निवडून येण्यासाठी बायडननी शाळेतल्या वांशिक एकीकरणाला विरोध केला. ही भूमिका त्यांना २०२०च्या प्रचारात भोवली. आता कृष्णवर्णीय मतदार त्यांना बहुमतानं पाठिंबा देणार हे बघून त्यांनी मत बदललं. ते विलगीकरणाविरुद्ध झाले. म्हणजे कृष्णवर्णीय व गोऱ्या विद्यार्थ्यांना एकत्रित शिकणं शक्य झालं. यापूर्वी ते शक्य नव्हतं.

सिनेटमध्ये सेवाज्येष्ठतेमुळे वाढती सत्ता हाती येते. २००७ मध्ये त्यांची सिनेट परराष्ट्र संबंध समितीच्या चेअरमन या पदावर नेमणूक झाली. त्यावेळी ज्येष्ठ बुश अध्यक्षपदी होते. त्यांनी सद्दाम हुसेनविरुद्ध युद्ध सुरू केलं. त्याला बायडनचा विरोध होता. या समितीचं महत्त्वाचं काम अमेरिका दरवर्षी जी अब्जावधी डॉलरची परदेशी मदत वाटते ती ठरवणं. या समितीवर त्यांनी दोन वर्षं काम केलं ते महत्त्वाचं ठरलं. २००८ मध्ये ओबामा अध्यक्षपदासाठी उभे राहिले तेव्हा त्यांना परराष्ट्र संबंधांविषयी फारशी माहिती नव्हती. ही उणीव भरून काढण्यासाठी त्यांनी ज्यो बायडनना उपाध्यक्षपदासाठी निवडलं. पण पदारूढ झाल्यावर त्यांनी जो सल्ला दिला तो सर्वस्वी चुकीचा होता असं तत्कालीन संरक्षणमंत्री बॉब गेट्स आपल्या पुस्तकात म्हणतात.

त्यापूर्वी १९८७ ते १९९५ दरम्यान बायडन सिनेटच्या न्यायिक समितीचे चेअरमन होते. हे बलशाली व सत्ताधारी ऑफिस समजण्यात येतं. कारण सर्वोच्च न्यायाधीश व इतर उच्चपदस्थ अधिकारी, सगळे सचिव (म्हणजे मंत्री), हेरगिरी संस्थांचे (CIA वगैरे) संचालक हे अध्यक्ष पुरस्कृत असले तरी सिनेटसंमत असतात. म्हणजे चेअरमनच्या आशीर्वादाशिवाय कुणी पदस्थ होऊ शकत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला अनुमती देण्याची संधी फार विरळ. पण ज्यो बायडनना १९९१ मध्ये ती चालून आली. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या व सनातनी मताच्या क्लेरेन्स थॉमस नावाच्या कृष्णवर्णीय वकिलाचं नाव तत्कालीन अध्यक्ष ज्येष्ठ बुशनी सुचवलं. ते संमतीसाठी बायडनच्या न्यायिक समितीपुढे आलं. बायडननी त्यांना खोदून खोदून प्रश्न विचारले. त्याचा क्लरेन्सना राग आला. पण मग नवीनच प्रकार घडला. अनिता हिल नावाच्या कृष्णवर्णीय वकिलानं थॉमसवर लैंगिक छळाचा आरोप केला. त्यावेळी #MeToo! ची चळवळ अस्तित्वात आली नव्हती आणि अशा आरोपांकडे कुणी गांभीर्यानं बघत नसे. आता महिला मतदारांची मतं हवी असल्यामुळे बायडननी २०१९ मध्ये अनिता हिलला न्याय्य वागणूक दिली नाही म्हणून क्षमा मागितली. शेवटी पूर्ण सिनेटनं थॉमसला मतं देऊन संमती दिली. आज ते कार्टावर असून अनिता हिल ओकलाहोमा या राज्यात विधि प्रोफेसर आहे. आपल्याला बायडननी जी वागणूक दिली त्यामुळे आजही कमालीचे असंतुष्ट आहोत असं ती म्हणते.

उपाध्यक्ष म्हणून बायडन ओबामांच्या छायेत वावरले व त्यांची कामगिरी पडद्याआड राहिली. शस्त्रनियंत्रणासाठी (Gun Control) त्यांनी बरेच प्रयत्न केले. पण या काळातली दोन प्रकरणं त्यांना भोवली.

**भ्रष्टाचाराचा भस्मासूर**

दोन्हीमध्ये आपल्या मुलाच्या हितासाठी उपाध्यक्षपदाचा दुरुपयोग केलेला आढळतो. युक्रेन या रशियाच्या सरहद्दीवर असलेल्या दोस्त राष्ट्रासाठी संसदेनं ४०० दशलक्ष डॉलरची लष्करी मदत २०१६ मध्ये मंजूर केली. त्यावेळी त्यांचा पुत्र हंटर बायडन, २०१४ मध्ये युक्रेनच्या बरिष्मा (Bruirma) नावाच्या खनिजवायू कंपनीच्या संचालक मंडळाचा सदस्य म्हणून काम करत होता. त्याला स्थानिक भाषा व वायूतेल कंपन्यांविषयी काहीही माहीत नसूनही दर महिना ५०,००० डॉलरचं वेतन मिळत होतं. यात काहीतरी काळंबेरं आहे या संशयामुळे युक्रेनच्या तत्कालीन अध्यक्षांनी तपासणीसाठी खास वकील नेमला. त्या तपासवकिलाला कामावरून काढून टाका नाहीतर मदत मिळणार नाही अशी बायडनने मागणी केली. युक्रेनला तसं करावं लागलं. आपला प्रभाव जगाला दाखवण्यासाठी बायडननी ही गोष्ट दूरदर्शनवर मोठ्या अभिमानानं सांगितली. हे कुत्र हाकलून देण्यामागे काय उद्दिष्ट होतं याची चौकशी करण्यासाठी अध्यक्ष ट्रम्पनी २०१९ मध्ये ३९१ दशलक्ष डॉलरची अतिरिक्त लष्करी मदत देण्यापूर्वी नव्यानंच निवडून आलेल्या त्या देशाच्या अध्यक्षांना (व्होलोडिमर झेलेनास्की Volodymyr Zelensky) या प्रकारणाची चौकशी करा अशी विनंती केली. त्या देशात भारतापेक्षा कितीतरी जास्त भ्रष्टाचार सापडतो. तो आपण नष्ट करूया आश्वासनावर झेलेनास्की निवडून आले होते. या विनंतीमुळे डेमॉक्रेटिक पक्षाचं आधिक्य असलेल्या लोकसभेनं ऑक्टोबर २०१९ मध्ये ट्रम्पविरुद्ध महाभियोगाची प्रक्रिया सुरू केली पण नंतर सिनेटनं तो आरोप नगण्य आहे म्हणून धुडकावून दिलं. ते काही असलं तरी आजपावेतो त्या तपासवकिलाला कामावरून का काढून टाकण्यात आलं याची चौकशी झालेली नाही. दुसरं म्हणजे ऑफिसमध्ये त्यांनी मुलांचा केलेला शारीरिक छळ. हा आरोप सिद्ध झाला नाही.

**वैयक्तिक जीवन**

एका साध्या विद्यापीठातून पदवीधर झालेल्या आणि बुटुकल्या राज्यातून आलेल्या माणसानं अमेरिकेतल्या उपाध्यक्षाचं पद पटकावावं ही काही मामुली गोष्ट नाही. याला कुणीही यशस्वी जीवनच म्हणेल. परंतु राजकीय जीवनात शाबासक्या मिळवल्या तरी ज्योचं कौटुंबिक जीवन अतियातनामय होतं असंच म्हणावं लागेल. या फटकाऱ्यामुळे अजूनही त्यांच्या हास्याला खिन्नतेची सूक्ष्म किनार लागलेली दिसते. त्याला अनेक कारणं आहेत. सुखदुःखाच्या निर्बुद्ध खेळाला बायडननी यशस्वीपणे तोंड दिलं यावरून त्यांच्या मनाची जी जडणघडण झाली ती जगाला दिसून येते.

ज्योचा जन्म २० नोव्हेंबर १९४२ चा. म्हणजे दुसरं महायुद्ध पेटलं असताना. वडील त्यावेळी पेनसिल्वेनियाची राजधानी स्क्रँटन येथे तेलउद्योजक होते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली होती. या जन्मस्थळाचं महत्त्व असं, की आजही ज्यो बायडन पेनसिल्वेनिया हे आपलं राज्य समजतात कारण ते मोठं आहे. वडिलांची श्रीमंती अल्पजीवी ठरली. उद्योग बुडाला व त्यांनी कुटुंब विलमिंगटन, डेलावेअर येथे स्थलांतरित केलं. ज्योनी सर्व आयुष्य मात्र डेलावेअर राज्यात घालवलं. उद्योग नामशेष झाल्यामुळे कुटुंबावर हलाखीचे दिवस ओढवले. एवढे की ज्योला पालनपोषणासाठी आपल्या आजीआजोबांकडे पाठवण्यात आलं.

नंतर वडिलांची स्थिती सुधारली व ज्यो मध्यमवर्गीय कुटुंबात वाढला. शाळेत ज्यो एक गुणहीन विद्यार्थी होता. तो तोतरं बोले म्हणून त्याला मुलं हिणवत. आरशासमोर उभं राहून त्यानं स्वच्छ बोलण्याची तालीम केली आणि ही आत्मसन्मानाला धक्का देणारी सवय दूर केली. असं असूनही शाळेत असताना त्यानं नेतृत्वगुण दाखवले.

शेवटी त्यानं युनिव्हर्सिटी ऑफ डेलावेअर, विलमिंगटन येथे प्रवेश मिळवून इतिहास व राज्यशास्त्रात १९६५ साली पदवी मिळवली. अध्ययन ही ज्योची आवडती सवय नव्हती. त्याला मुली, क्रीडा व पार्ट्यात जास्त रस.

१९६४ मध्ये तो सुट्टीत बहामाला गेला आणि तिथे नेनी नावाच्या मुलीच्या प्रेमात पडला. तिच्या आग्रहामुळे त्यानं अभ्यासात लक्ष घालून सिरॅकुज युनिव्हर्सिटीमध्ये विधि अभ्यासक्रमात नोंदणी केली. वकील होण्यापूर्वीच त्यानं १९६६ मध्ये नेलीशी लग्न केलं. त्या कॉलेजात त्यानं चोरी करून पेपर दिले असा आरोप करण्यात आला. नंतर १९८७ मध्ये अध्यक्षीय निवडणुकीत उतरलं असताना बायडनवर तसाच आरोप झाला होता. एका भाषणात बायडन म्हणाले की तीन पदव्या प्राप्त करून राज्यशास्त्रात प्रावीण्य मिळवलं. पण ते साफ खोटं आहे असं नंतर उघडीकस आलं. अशी खोटी विधानं करण्याची त्यांना सवयच झालेली दिसते. जानेवारी २०२० मध्ये ते म्हणाले की लादेनला मारण्यासाठी आपण ओबामांशी सहमत होतो. परंतु वास्तवात ते त्या विरोधात होते असं आढळून आलं.

नोव्हेंबर १९७२ मध्ये बायडन सिनेटर म्हणून निवडून आले. पण तो हर्षोत्सव फार काळ टिकला नाही. ख्रिसमसचं शॉपिंग करायला ड्रायव्हरनं नेलीला मुलांसह बाजारात नेलं असताना अपघात झाला आणि त्यात आई व तान्हुली मुलगी गेली. दोन मुलं (ब्यू व हंटर) यांना गंभीर जखमा झाल्या. ज्योनी पदाचा त्याग करण्याचं ठरवलं. पण सिनेटचे मुख्य सिनेटर माईक मान्सफिल्ड यांनी त्यांना परावृत्त केलं.

त्यांनी १९७७ मध्ये जिल जेकब्स नावाच्या शिक्षिकेशी लग्न केलं. या संसारातही विधात्यानं विष पेरलं. १९८८ मध्ये बायडन मानेत दुखत असल्यामुळे दवाखान्यात भरती झाले व चाचण्यांनंतर मेंदूमध्ये रक्तस्राव करणारी व फुगलेली रक्तवाहिनी आहे असं आढळून आलं. त्यावर डॉक्टरांना जोखमीची शस्त्रक्रिया करावी लागली. मग त्याच वर्षी काही महिन्यांनी मेंदूतली दुसरी वाहिनी फुगलेली आढळली. पुन्हा शस्त्रक्रिया करावी लागली. पण तिच्या पश्चात त्यांच्या फुप्फुसाच्या वाहिनीत रक्ताची गुठळी (Pulmonary Embolism) झाल्याचं आढळलं. ती प्राणघातक ठरली असती, पण सुदैवानं औषधांनी गुण आला आणि ते वाचले. पुनर्वसनासाठी ७ महिने लागले. या दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या कारण त्यानंतर

आपल्याला कुठलाच मेंदूविकार झाला नाही असा निर्वाळा ते देतात. ज्या डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली ते आता म्हणतात की ज्यो बायडन अध्यक्षपद भूषवण्यास समर्थ आहेत. कारण मी त्यांचा मेंदू प्रत्यक्ष बघितला.

मग २०१३ मध्ये दुसरं शुक्लकाष्ट आलं. त्यांचा जेष्ठ मुलगा ब्यू बायडन डेलावेअर राज्याचा मुख्य विधि अधिकारी (Attorney General) म्हणून निवडून आला होता. त्याचं भविष्य उज्ज्वल होतं. पण काळानं मध्येच झडप घातली. त्याच्या मेंदूत कर्करोगाची गाठ आहे असं आढळून आलं. त्यानं दोन वर्षं त्याच्याशी लढा दिला ,पण २०१५ मध्ये तो हरला व वडिलांना कुटुंबातल्या तिसऱ्या प्राणहानीचं दु:ख सोसावं लागलं. पण प्राण सोडण्यापूर्वी त्यानं वडिलांकडून एक वचन मागितलं की ते पुन्हा अध्यक्षपदासाठी उभं राहतील. ज्योनं अर्थातच 'हो' म्हटलं. २०१६ मध्ये पुत्रशोकाचं दु:ख असह्य झालं म्हणून आपण रिंगणात उतरलो नाही असं त्यांनी आपल्या पुस्तकात (Promies to Keep) म्हटलं. या वचनपूर्तीसाठी त्यामुळे २०२० मध्ये वय झालं तरी निवडणूक लढणं त्यांना भाग पडलं असं म्हणावं लागेल. आपल्याला नामांकन मिळेल याची निश्चिती त्यांच्या मनात नसावी. त्यामुळे ते फळ पदरात पडण्याची शक्यता दिसताच ते चकित झाले तर नवल कसलं?

**नामांकनसोहळा**


कोरोनामुळे डेमॉक्रेटिक पक्षाचं नामांकन अधिवेशन जुलैमधून ऑगस्टमध्ये ढकलण्यात आलं. बायडन सध्या आपल्या तळघरात बंदिस्त झालेले आहेत. प्रचारसभेसाठी ते बाहेर पडू शकत नव्हते. आता चाहत्यांनी त्यांना पैसे पाठवण्यास सुरुवात केली. बाहेरून डेमॉक्रेटिक पक्षाचे सर्व पदाधिकारी जरी ज्योच्या पाठीशी असले तरी आतून ते चिंताग्रस्त झालेले आहेत. दिवसेंदिवस बौद्धिक स्वास्थ्य अंशत: का होईना खालावत असल्यामुळे ट्रम्पपुढे ते वादचर्चेत टिकणार नाहीत अशी त्यांना काळजी पडली आहे. असं असूनही जुलै २०२०च्या सगळ्या सर्वेक्षणात ते ट्रम्पच्या पुढे आहेत. अध्यक्षपदाचा घास तोंडासमोर आला, पण त्यात व ओठांत बरंच अंतर असतं असं इतिहास सांगतो. ३ नोव्हेंबर २०२० रोजी ते कळेलच. कारण खरा डाव आता सुरू झाला असून लंबक कुणीकडे वळेल हे सांगणं कठीण.

**– डॉ. अनंत लाभसेटवार**
(फर्स्ट नॅशनल बँक व ट्रस्ट कंपनीचे
१४ वर्षे चेअरमन ऑफ दि बोर्ड होते.)
anantlabh@gmail.com

ग्रंथाली

## भगवान इंगळे यांची आगामी तीन पुस्तके!

ढोर




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

भिडू




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

उभारणी




मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

||ग्रंथाली||

# आनंदयात्री
# पोलीस अधिकाऱ्याची डायरी

**जयंत नाईकनवरे, आय.पी.एस.**




सतरंगी आठवणींच्या
गंधकोशातला आनंदयात्री

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

||ग्रंथाली||

# सॅल्यूट

**यशवंत व्हटकर**





एका पोलीस अधिकाऱ्याच्या सेवाकालाचे
अंतिम पर्व

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# पोलीसनभोमंडळातील
# २१ आयपीएस नक्षत्रं

**प्रतिभा बिस्वास**




२१ आयपीएस नक्षत्रांची
संघर्षगाथा

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

**मला माझ्या चाकोरीच्या बाहेरची माणसं सापडत गेली. हे काही महिनेच चाललं, कारण मला एक नवीन प्रोजेक्ट द्यायचं ठरलं. ते एन.सी.पी.ए.च्या इतिहासातलं सर्वात महत्त्वाकांक्षी नाटक ठरणार होतं. दीपानं मला फार शांतपणे माझी जबाबदारी समजावली आणि आम्ही कामाला लागलो. 'मुगल-ए-आजम' ह्या चित्रपटावर आधारित हे नाटक असणार होतं.**



**विपुल विलास महागांवकर**

# एनसीपीए आणि मी

**ए**खाद्या वास्तूचा आणि तिथल्या माणसांचा आपल्यावर किती परिणाम होत असतो हे मला माझं राजभवनचं घर सोडलं तेव्हा प्रकर्षानं जाणवलं. तोपर्यंत कुठल्याही घटनेनं मला थांबून विचार करायला भाग पाडलं नव्हतं. तसंच काहीसं एन.सी.पी.ए. सोडताना मला जाणवलं. चांगल्या-वाईट अनुभवांची सरमिसळ होती आणि शिक्षण तर दोन्हीमध्ये होतं. मी तिथून हे अनुभव आणि माणसं घेऊन बाहेर पडलो.

माझे एक नातेवाईक एन.सी.पी.ए.मध्ये काम करायचे, तेव्हा एन.सी.पी.ए. म्हणजे नरीमन पॉईंटची शेवटची बिल्डिंग एवढंच मला माहीत होतं. एकदा मी त्यांना भेटायला तिथे गेलो होतो हे मला अंधुकसं आठवतंय. माझ्या आई-वडिलांची एक आठवण म्हणजे त्यांनी अमोल पालेकरचं कुठलंसं एक नाटक तिथे पाहिलं होतं, एवढंच. नंतर कॉलेजला गेलो, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लागलो तसं एन.सी.पी.ए. हे नाव कानावर सतत पडत राहिलं. एकदा तालीम संपल्यावर आमचे एक डिरेक्टर म्हणाले, ''फिल्म आणि नाटकांवर जितकी पुस्तकं एन.सी.पी.ए.च्या रेफरन्स लायब्ररीमध्ये आहेत तितकी तुला सेन्ट्रल लायब्ररीमध्येसुद्धा मिळणार नाहीत. तिथेच म्युझिक लायब्ररीही आहे. शास्त्रीय आणि लोकसंगीताचं खूप मोठं कलेक्शन आहे.'' मी दुसऱ्या दिवशी तिथे पोहोचलो. ते वातावरण अणि तिथली पुस्तकं बघून मी भारावून गेलो. त्या दिवसापासून ती लायब्ररी माझं अनधिकृत ऑफिस बनली.

अनेक वर्षं एकांकिका, नाटकं आणि फिल्म-टी.व्ही.साठी असोसिएट डिरेक्टर म्हणून काम पाहत असतानाही मला एका आर्ट ऑर्गनायझेशनमध्ये काम कराण्याची इच्छा होती, ती २०१६ मध्ये पूर्ण झाली आणि एन.सी.पी.ए. माझं अधिकृत ऑफिस झालं. दीपा गहलोत ह्या राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त समीक्षक, लेखक तेव्हा तिथे थिएटर अँड फिल्म्स डिपार्टमेंटच्या प्रमुख होत्या. त्यांच्यासोबत कामाला सुरुवात केली. पहिले काही दिवस तर सगळ्यांशी ओळख करून घेण्यात गेले. लायब्ररीमध्ये गेलो तेव्हा पटेलना वाटलं की मी माझं मेंबरशिप कार्ड रिन्यू करायला आलोय. सर्वांशी अधिकृत परिचय झाल्यावर मी शांत बसलो तेव्हा एक गोष्ट जाणवली, की प्रत्येक डिपार्टमेंटचे हेड हे आपापल्या क्षेत्रातली साधारण चाळीस-पन्नास वर्षांचा अनुभव हाताशी बाळगणारी मंडळी आहेत आणि ही सगळी मंडळी एका छताखाली काम करत आहेत आणि मला दर दिवशी नवीन काहीतरी शिकण्याची संधी मिळणार आहे.

काम करण्याची पद्धत लक्षात यावी म्हणून आधी काही चालू असलेल्या नाटकांचं काम पाहू लागलो. ही सगळी नाटकं फार वेगळ्या फॉर्मची होती, सचित पुराणिकचं डॉक्युमेंटरी थिएटरच्या फॉर्ममधलं 'लॉयटरिंग' आणि दिव्या जगदाळेचं 'द वे आय सी इट'. मी ह्या नाटकांच्या प्रयोगांना जाऊ लागलो. इंग्लिश थिएटरमधल्या काही लोकांशी माझी इथे ओळख झाली. थिएटरच्या खूप गप्पा होऊ लागल्या. मला माझ्या चाकोरीच्या बाहेरची माणसं सापडत गेली. हे काही महिनेच चाललं, कारण मला एक नवीन प्रोजेक्ट द्यायचं ठरलं. ते एन.सी.पी.ए.च्या इतिहासातलं सर्वात महत्त्वाकांक्षी नाटक ठरणार होतं. दीपानं मला फार शांतपणे माझी जबाबदारी समजावली आणि आम्ही कामाला लागलो. 'मुगल-ए-आजम' ह्या चित्रपटावर आधारित हे नाटक असणार होतं. पूर्णपणे ब्रॉडवे म्युझिकल स्टाईल. एन.सी.पी.ए. आणि शापूरजी-पालनजी ह्यांची प्रस्तुती होती. ह्या नाटकाची व्याप्ती आधी माझ्या लक्षात आली नाही, पण हळूहळू काम वाढत गेलं तसं जाणवलं की हे नाटक काहीतरी भव्य आहे. मुगल-ए-आजम' चित्रपटाची भव्यता रंगमंचावर उतरवणं हे आमच्या समोरचं आव्हान होतं. भारतातून साधारण चाळीसएक कथक डान्सर आणि अभिनेता आणि अभिनेत्रींची निवड केली गेली. म्युझिकल असल्यामुळे गाणं येणं ही अट होतीच. 'मुगल-ए-आजम'चं दिग्दर्शन फ़िरोज़

अब्बास खान यांचं होतं, कॉस्च्युम साठी मनीष मल्होत्रा, नृत्यदिग्दर्शनासाठी मयूरी उपाध्याय, लायटिंग डिझाईनसाठी टोनी ॲवॉर्ड नामांकित डेव्हिड लँडर, सिनिक डिझाईनसाठी नील पटेल, प्रोजेक्शन डिझाईनसाठी जॉन नॅरून, टेक्निकल हेड म्हणून रोहिंटन फ्रेज़र, अशी सगळी मंडळी 'मुगल-ए-आजम' स्टेजवर साकार करायला सज्ज होती. एन.सी.पी.ए.कडून दीपा गहलोट आणि शापूरजी-पालनजीकडून दीपेश सालगिया ह्या प्रोजेक्टचं नेतृत्व करत होते. तब्बल साडेतीनशे जणांचा ताफा एकत्र काम करत होता. जवळपास सहा महिन्यांचं काम अडीच महिन्यांत पूर्ण करायचं होतं. माझं काम एन.सी.पी.ए.मधल्या टेक्निकल, लीगल, अकाऊंट्स, सिक्युरिटी, स्टेशनरी, मार्केटिंग ह्या डिपार्टमेंट्सशी समन्वय साधून आवश्यक त्या सगळ्या गोष्टी ह्या टीमला उपलब्ध करून देणं हे होतं. साधारण सत्तर अग्रीमेंट्सचे ड्राफ्ट करायचे होते. लीगल हेड प्रशांत करकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ड्राफ्टिंग सुरू केलं. त्यात इंटरनॅशनल अग्रीमेंट्सची तर तऱ्हाच वेगळी होती. तिथे प्रत्येकाच्या वेगवेगळ्या एजन्सी असतात. त्यांचं जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत अग्रीमेंट्समध्ये अनेक बदल होत राहायचे. इमेल्सवर इमेल्स जायचे. सगळं दुपारपासून सुरू व्हायचं. जसजशा टेक्निकल रिहर्सल्सच्या तारखा जवळ येत होत्या आंतरराष्ट्रीय डिझायनर्सची अग्रीमेंट्स पूर्ण करण्याचं दडपण वाढत चाललं होतं. आणि सही झाल्याशिवाय तिकडचं कुणीही विमानात बसणार नव्हतं. अचानक मी लेखन-दिग्दर्शन सोडून हे कशात आलोय हेच मला कळेना. खूप इंटेन्स होत चाललं होतं सगळं. ह्या सगळ्यात एक फायदा नक्की झाला. मला इन्टलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स आणि अग्रीमेंटच्या ड्राफ्टिंगबद्दल खूप माहिती मिळाली. दुसरीकडे मार्केटिंगच्या मीटिंग जोरात चालल्या होत्या. बारा-बारा तास रिहर्सल्स होत होत्या. युद्धपातळीवर सगळे काम करत होते.

ह्या नाटकाचे सगळे प्रयोग एन.सी.पी.ए.च्या जमशेद भाभा थिएटरमध्ये (जे.बी.टी.) होणार होते. हे सगळ्याच बाबतीत खऱ्या अर्थानं एक आंतरराष्ट्रीय नाट्यगृह आहे. हे भारतातलं एकमेव नाट्यगृह आहे जे 'मुगल-ए-आजम'च्या आणि ह्यासारख्या अनेक नाटकांच्या सगळ्या गरजा पूर्ण करू शकत होतं. टेक्निकल सेटअपच्या पहिल्या दिवशी ह्याचा प्रत्यय मला आला. लाईट्स सेटअप, सेट सेटअप, प्रोजेक्टर स्क्रीन आणि प्रोजेक्टर सेटअपसाठी ट्रकच्या ट्रक भरून सामान आत येत होतं. इथून पुढे माझं सहानंतर जे.बी.टी.मध्ये थांबणं; थोडक्यात पडीक राहणं चालू झालं. रोज दुपारी ऑफिसमधलं काम आटपून माझी जे.बी.टी.मध्ये कार्यशाळा चालू झाली. बारा ते तेरा दिवसांच्या सेटअपनंतर मार्किंगला सुरुवात झाली. तेव्हा लक्षात आलं, की नाटक अजूनही हातात आलेलं नाहीये. फिरोजसर, दीपा



मुगल-ए-आजम' नाटकातील दृश्य

यांच्या चेहऱ्यावर ते स्पष्ट दिसत होतं. देशातलं सर्वात महागडं आणि भव्य नाटक होतं. एन.सी.पी.ए. आणि शापूरजी-पालनजी यांच्या अर्थातच अपेक्षा शिगेला पोहोचल्या होत्या आणि त्या अपेक्षांचं दडपण सगळ्यांच्याच चेहऱ्यावर प्रकर्षानं जाणवत होतं. एक अनुभव सांगतो, लायटिंग डिझायनर डेव्हिड लँडरचा पहिला दिवस होता. तो ठरलेल्या वेळेत हॉटेलमधून जे.बी.टी.मध्ये पोहोचला. पण त्याच्या कामाच्या वेळेत तिथे साऊंड चेक चालू होतं. डेव्हिड थांबला. त्यानं सगळे लायटिंग कॉन्सोल चेक केले आणि त्याची जायची वेळ झाली तेव्हा त्याला दिलेली गाडी मागवून तो हॉटेलवर निघून गेला. सगळेच अवाक झाले. दुसऱ्या दिवशी डेव्हिड त्याच्या दिलेल्या वेळेत आला तेव्हा सगळे तयार होते. त्याचं काम चालू झालं आणि दोन दिवसांचं काम त्यानं त्याला दिलेल्या तेवढ्याच वेळेत पूर्ण केलं. नुसतं त्याच्या मागे बसलं तरी बरंच काही शिकायला मिळायचं.

'मुगल-ए-आजम'चा झीरो शो बघायला एन.सी.पी.ए. आणि शापूरजी-पालनजीचा सगळा स्टाफ आणि परिवार आणि काही मान्यवर उपस्थित होते. त्या दिवशी खरी परीक्षा होती. सगळ्यांनी पहिल्यांदा सलग प्रयोग पाहिला आणि अवाक झाले. सगळ्यांच्या चेहऱ्यावरचं दडपण त्या तीन तासांत नाहीसं झालं होतं. नाटक उत्तम झालं होतं. तेव्हा मुख्य आकर्षण ठरलं प्रियांका बर्वे आणि नेहा सरगम ह्यांनी सदर केलेलं 'प्यार किया तो डरना क्या' हे गाणं. ह्या दोघी एक एक प्रयोग करायच्या. दर प्रयोगाला हे गाण्याचं सादरीकरण प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडायचं. ह्याचं श्रेय जितकं ह्या दोघींचं आहे तितकच सगळ्या टेक्निकल टीमचं सुद्धा आहे. मग पुढे मुंबईमध्ये चार आणि दिल्लीमध्ये एक सीझन झाला. सगळेच प्रयोग हाऊसफुल. ही ड्रीम रन होती. हा माझ्या आयुष्यातला एक महत्त्वाचा अनुभव ठरला. एन.सी.पी.ए.मधले सगळे डिपार्टमेंट ह्या नाटकासाठी एकत्र येऊन काम करत होते. इतक्या मोठ्या प्रमाणावर टीम वर्क मी पहिल्यांदा अनुभवलं. वेगवेगळ्या स्तरांवर काम करणारी माणसं वेगवेगळ्या टप्प्यावर जोडली गेली. एन.सी.पी.ए.च्या सगळ्या डिपार्टमेंटच्या हेड्सपासून गेट कीपर्स



**रंगमंचावरील भव्य आविष्कार**

तेव्हा तर ते लहान मुलाच्या उत्साहानं कॅमेऱ्याचा इतिहासच सांगायला लागले. हा माणूस भन्नाट आहे.

एन.सी.पी.ए. सोडण्याच्या काही महिने आधी मी डान्स डिपार्टमेंटमध्ये काम करायला लागलो. स्वप्नोकल्पा दासगुप्ता डान्स डिपार्टमेंटची हेड म्हणून डान्स प्रोग्रामिंग करायचीच, शिवाय शाळांमध्ये जाऊन ओडिसी नृत्यप्रकाराविषयी मुलांमध्ये आवडसुद्धा निर्माण करायची. अजूनही करते. मी तिच्यासोबत शाळांमध्ये जाऊ लागलो. नाटकांमध्ये भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांचा उपयोग कसा करता येईल यावर ती आवर्जून बोलायची.

आणि सिक्युरिटी गार्ड्सपर्यंत सगळ्यांनी ह्या नाटकावर खूप प्रेम केलं आणि हेच माझ्या मते ह्या नाटकाचं यश आहे.

पुढे एन.सी.पी.ए.मध्ये अनेक प्रोजेक्टर काम केलं. लहान मुलांसाठीचं समरफियास्टा, फिल्म रेट्रोस्पेक्टिव्हअंतर्गत फिल्म स्क्रीनिंग, दोन स्पेशल नाटकाच्या प्रयोगासाठी केलेला इंग्लिश सरटायटल्सचा प्रयोग असे अनेक प्रयोग केले. एन.सी.पी.ए.मध्ये फोटोग्राफी डिपार्टमेंटसुद्धा आहे. माझे वडील फोटोग्राफर होते आणि मी जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून फोटोग्राफी पूर्ण केलं तेव्हापासून मुकेश पर्पियानी यांचं नाव ऐकून होतो. हे डिपार्टमेंट म्हणजे पर्पियानी यांचं एक्झिबिशन रूमवजा छोटीशी कार्यशाळा आहे. पहिल्यांदा मी तिथे गेलो तेव्हा बबल फोटोग्राफीचं त्यांच्याच छायाचित्रांचं प्रदर्शन होतं. त्यांनी शाम्पू, साबण, डिटर्जंट, ह्यांच्यातून येणाऱ्या बुडबुड्यांची मायक्रो फोटोग्राफी केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रत्येक कॉम्पोनंटमधून निघणारा बबल वेगळा असतो. मी त्यांना माझ्या वडिलांचा निकॉनचा स्टील बॉडी एस.एल.आर. कॅमेरा दाखवला

काही महिन्यांनंतर मला माझा एन.सी.पी.ए.मधला प्रवास संपल्यासारखा वाटला. मी राजीनामा दिला. इथल्या वाटचालीला विराम देत आधीची वाटचाल नव्यानं सुरू केली. पुन्हा एकदा नाटकांकडे आणि फिल्म्सकडे वळलो. एन.सी.पी.ए.मधल्या प्रत्येक माणसानं मला समृद्ध केलं आहे हे खरं आहे. आजही जेव्हा मी लायब्ररीमध्ये जातो तेव्हा ही सगळी माणसं मला पुन्हा भेटतात, पुन्हा ती ऊर्जा मिळते. माझ्या प्रवासात एन.सी.पी.ए.चं योगदान खूप मोलाचं ठरलं आहे. भारतीय कलासंस्कृतीची जोपासना आणि तिच्या विकासासाठी उभारलेल्या एन.सी.पी.ए.चं हे पन्नासावं वर्ष आहे. ह्या महत्त्वाच्या कामासाठी ह्या महत्त्वाच्या वास्तूला आणि इथे काम करत असलेल्या प्रत्येकाला माझ्या खूप खूप शुभेच्छा.

**– विपुल विलास महागांवकर**
भ्रमणध्वनी : ९९६७७४९५३६
vipul.mahagaonkar@gmail.com

ग्रंथाली

**शिल्पा जितेंद्र खेर यांची तीन पुस्तके**


## यश म्हणजे काय? भाग १ व भाग २ आणि राम-आयन



**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**




**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**

भारतानं आपलं रूप बदललं तर ते सुंदरीला आवडेल. तिचा त्याच्याबद्दलचा आदर वाढेल. तिला आपण आवडत नाही म्हणजे तिच्यातच काहीतरी दोष आहे असं म्हणणं म्हणजे स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखं आहे. इतिहास सांगतो, की ती गुणग्राही आहे. जगातील असंख्य गुणवंतांनी तिचा आसरा घेतलेला आहे. भारतही काही कमी नाही.



डॉ. मोहन द्रविड

# नच सुंदरी करू कोपा

एखाद्या गर्विष्ठ स्वरूपसुंदरीच्या मागे तिच्यावर भुरळ पडलेल्या तरुणानं लागावं आणि तिनं त्याला पदोपदी झिडकारावं असं काहीसं नातं अमेरिका आणि भारत यांच्यामधलं झालं आहे. अमेरिकेला भारताचा कंटाळा आला आहे हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षानं वेगवेगळ्या पद्धतींनी सांगायचा प्रयत्न केला, पण ते काही भारत लक्षात घेत नाही किंवा ते त्याच्या लक्षात येत नाही. अमेरिकेशी मिलनोन्मुख अशा भारताच्या वाटेवर २०१७ साली राष्ट्राध्यक्षानं खलनायकासारखे अनेक अडथळे निर्माण केले. भारतानं ते सर्व पार पाडलेच आणि दोन वर्षांच्या आत भारताच्या पंतप्रधानांनी टेक्ससमध्ये जाऊन अमेरिकेच्या गळ्यात गळा घालून उज्ज्वल भवितव्याची स्वप्नं रंगवली. त्यापुढे काही महिन्यांतच अहमदाबादमध्ये राष्ट्राध्यक्षांना दहा लाख भारतीयांनी भावपूर्ण नमस्ते केलं.

भारताला वाटलं आता ही सुंदरी नक्की आपल्यावर भाळली. मात्र तीन महिन्यांच्या आतच तिनं आपली नखं बाहेर काढली. जून २०२० पासून हे उर्वरित वर्ष सर्व परकीयांच्या सर्व प्रकारच्या व्हिसावर तिनं स्थगिती आणली. कोरोना वर्षाअखेरही चालू असेल तर नंतरसुद्धा! कोरोनाचं राज्य मार्चपासून चालू झालं असल्यानं अमेरिकेतील सरकारी बाबूंचा कामाचा उत्साह तेव्हापासूनच ढेपाळला होता. म्हणजे शनीची पीडा स्थलांतरितांवर कमीत कमी एका वर्षाची असणार आहे. त्यात पुन्हा गुरू वक्री जावा त्याप्रमाणे जे कोणी शिष्य फक्त ऑनलाइन शिक्षण घेणार असतील त्यांना गुरुकुलातून हाकलवून द्यायची धमकी अमेरिकेनं दिली आहे. अशा कृतींमुळे चाकरमाने आणि विद्यार्थी त्रिशंकूसारखे लटकत राहणार आहेत. या सर्वांचा फटका मुख्यत: भारतीयांना बसणार आहे.

भारतानं अमेरिकेवर जीवेभावे प्रेम केलं. काश्मीर, गोवा या प्रकरणांत तिनं प्रखर भारतविरोधी भूमिका घेतली असतानासुद्धा. बांगलादेश युद्धाच्या वेळी तर अमेरिकेनं बंगालच्या उपसागरात सातवं आरमार आणून भारतावर चक्क हल्ला करायची धमकी दिली होती. पण भारत त्या गोष्टी चटकन विसरला. आपल्या प्रिय व्यक्तीवर राग फार दिवस ठेवता येत नाही. सुरुवातीची अनेक वर्षं भारतानं तिच्यावर लांबून प्रेम केलं होतं. हॉलिवूडमधल्या तिच्या छबीवर तर भारत प्रचंड लुब्ध होता. तिच्या त्या रूपावर त्यानं गद्याची आणि पद्याची पानंन् पानं खरडली. प्रत्यक्ष गाठीभेटींना मात्र सुरुवात झाली १९६५ पासून. त्या वर्षी तिच्या पालक सरकारनं बिनगोऱ्या लोकांवर तिला भेटायची जी बंदी होती ती काढून टाकली.

मग भारतानं तिथे आधी शिकायला आणि मग नोकरी घेऊन मुक्काम ठोकायला सुरुवात केली. आपल्या ज्ञानाला आपल्या देशात फारशी किंमत नाही हे कारण पुढे करून. (कालांतरानं अमेरिकेलाच आपली गरज आहे असं मानून.) १९८० च्या दशकात नव्यानं उगवलेल्या संगणकक्षेत्रात अमेरिकेमध्ये दरवर्षी २० टक्क्यांनी वाढ होत गेली. अभियंत्याचा शिक्षणकाळ साधारण दहा-बारा वर्षांचा असल्यानं त्यांच्या संख्येत त्या प्रमाणात तत्काळ वाढ देशातल्या देशात होणं अर्थातच अशक्य होतं. त्याच वेळी कायम स्वरूपानं राहायच्या व्हिसांची (ग्रीन कार्डची) टंचाई निर्माण झाल्यानं अमेरिकेत शिकलेल्या परदेशी विद्यार्थ्यांना नोकरीशिवाय परत जावा लागायचं. तेव्हा नोकऱ्या आहेत, माणसं आहेत, पण कायदा आड येतो अशा परिस्थितीत पहिल्या बुशसाहेबांच्या काळात १९९० साली अमेरिकन संसदेनं स्थलांतर कायद्यात आमूलाग्र बदल करायचं ठरवलं.

पहिला बदल केला तो ग्रीन कार्ड वाटपाच्या पद्धतीत. आधीची पद्धत होती कुटुंबप्रधान. म्हणजे अमेरिकेत स्थायिक झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांना प्राधान्य. ते देऊन उरले तरच बाकीच्यांना. त्यात नोकरी करणारे आले. नवीन कायद्याप्रमाणे सगळ्यांना सारखं प्राधान्य. ग्रीन कार्ड वाटपाचं आजचं स्वरूप असं : वर्षाला जगातील सर्व देशांना मिळून चार लाख ग्रीन कार्डं, परंतु कोणत्याही

एका देशाला वीस हजारांपेक्षा जास्त नाहीत. यात बायकामुलं आली. या मर्यादेला कॅप म्हणतात. ग्रीन कार्ड वाटपात कोणत्याही एका देशाची मक्तेदारी होऊ नये हे कॅपचं प्रयोजन. या चार लाखांत सव्वादोन लाख अमेरिकेत स्थायिक झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांसाठी. नोकरी करून अर्ज करणाऱ्या उच्चशिक्षित आणि कुशल लोकांच्या (Employment Bared: EB) वाटणीला १,४०,००० कार्डं येतात, आणि ५५,००० कार्डं लॉटरी टाकून! (लॉटरीत भारताला भाग घेता येत नाही.)

उच्चशिक्षितांमध्ये (EB) पाच प्रकार केले आहेत. EB1 हा प्रकार विलक्षण हुशार लोकांकरता, EB2 ज्यांच्याकडे MS पदवी आहे त्यांच्यासाठी, EB3 जे फक्त पदवीधर आहेत त्यांच्यासाठी, EB4 अकुशल कामगारांसाठी, तर EB5 ही दहा लाखांवर डॉलरची गुंतवणूक करणाऱ्यांकरता. EB1 आणि EB5 यांच्यासाठी अमेरिकेत नोकरीची गरज नाही, आणि त्यांच्या याचिका तेच सादर करतात. EB2, EB3 आणि EB4 यांच्या याचिका ते नोकरी करत असलेल्या कंपनीनं सादर करायच्या असतात. अर्थातच अर्जदारांना त्याकरता आपल्या कंपन्यांचं वर्षानुवर्षं मिंधं व्हावं लागतं.

EBमधील काही प्रकारांवर ३००० ची कॅप आहे, तर काहींवर ४००० ची. या कॅपच भारतीयांना डोकेदुखी ठरल्या आहेत. त्यांची गर्दी मुख्यत: EB2 आणि EB3 साठी. या दोन्ही वर्गवारींत इतकी गर्दी झाली आहे की २००९ साली केलेल्या अर्जांचा आता कुठे विचार चालू आहे. अनेक वर्षं भारताचे EB1 आणि EB5चे डबे रिकामे जायचे. आता कुठल्यातरी देशी डोक्यानं EB1मधली एक पळवाट (loophole) शोधून काढली, आणि आता EB1साठीही खच्चून गर्दी चालू झाली आहे! अजूनपर्यंत तरी EB4 मध्ये कुणी पळवाट काढलेली नाही. अर्थातच अशा पळवाटांचा फायदा सुरुवातीचा काही काळ मिळतो. नंतर तिथेही झोंबाझोंब चालू होते.

स्थलांतर कायद्यामध्ये १९९० साली केलेला दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे मर्यादित मुदतीच्या एच१बी व्हिसाची निर्मिती. एखाद्या होतकरू पदवीधारकाला अमेरिकेतील कंपनीनं नोकरीची हमी दिली तर त्याचा एच१बी व्हिसासाठी विचार होतो. जी कंपनी त्याला या व्हिसासाठी शिफारस करते ती त्याला सोडता येत नाही. सोडलीच तर दुसऱ्या कुठल्यातरी कंपनीनं त्याची जोखीम घेतली पाहिजे. दरवर्षी या व्हिसासाठीचे अर्ज आदल्या वर्षीच्या एप्रिल महिन्यातच दाखल होतात. आलेल्या अर्जांपैकी ८५,००० नवीन अर्ज लॉटरी पद्धतीनं निवडले जातात. यातील २०,००० एम.एस. पदवी मिळालेल्यांसाठी. त्याशिवाय ६,८०० जागा सिंगापूरसारख्या काही देशांकरता राखून ठेवल्या आहेत. त्या दोन्ही भरल्या नाहीत तर त्या दुसऱ्या वर्षी इतरांना मिळू शकतात. विद्यापीठांत काम करणाऱ्यांना मात्र ही मर्यादा लागू नाही.

एच१बी व्हिसा काही वर्षांपुरताच (एक किंवा तीन) मर्यादित असतो. ही मुदत वाढवूनही दिली जाते. या व्हिसावर काम करत असताना त्याची कंपनी त्याच्या ग्रीन कार्डसाठी याचिका सादर करू शकते. जर ती मंजूर झाली असेल तर एच१बीचं नूतनीकरण करून त्याची मुदत ग्रीन कार्ड मिळेपर्यंत एकेक वर्षानं वाढवता येते. नूतनीकरण करण्यासाठी केलेले अर्ज धरून वर्षाकाठी साधारण दोन लाख अर्ज एच१बी व्हिसासाठी येतात. मग त्यांतील नवीन अर्जांची छाननी होते. शंका आली तर Request for Evidence (RFE) पाठवली जाते. शेवटी काही अर्ज फेटाळले जातात. या सर्व प्रक्रियेला सहा-सात महिने लागतात. अव्वाच्या सव्वा पैसे भरून ही प्रक्रिया पंधरा दिवसांवर आणण्याचा एक स्वैरमार्ग आहे; पण तो नेहमीच चालू असतो असं नाही.

१९९० च्या सुमारास निर्माण झालेल्या सुवर्णसंधीचा फायदा आय.टी. क्षेत्रातील भारतीय कंपन्यांनी उचलला. देशात संगणकक्रांती झाली होती. खाजगी विद्यालयांचं नवीन पीक आलं होतं. एच१बी हा व्हिसा मिळायला इंजिनीयरिंगची पदवी लागते तेव्हा आंध्रसारख्या राज्यात या पदव्या खिरापतीसारख्या वाटायला सुरुवात झाली. एच१बी हा व्हिसा outsourcingसाठी नसताना भारतीय कंपन्यांनी तसा तो वापरला. आज अमेरिकेत सहा लाखांच्या आसपास एच१बी व्हिसाधारक आहेत, बहुतेक सर्व आय.टी. क्षेत्रातलेच. सत्तर टक्के भारतीय. एकेक भारतीय कंपनी वर्षाकाठी पंधरा-वीस हजार अर्ज करायला लागली. (एच१बी कमी पडले तर एल१!) लॉटरीत चार-पाच हजार तरी मिळतील असं गणित. एकूण अर्जांमध्ये घाऊक पन्नास हजार आपल्या चार-पाच देशी कंपन्यांचेच असतात. पंचाहत्तर टक्के अर्जदार भारतीय असतात. मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यासुद्धा या योजनेचा गैरफायदा घ्यायला लागल्या. त्यांनी दादागिरी करून काही काळ या व्हिसाची संख्या दुपटीनं वाढवून घेतली होती.




अमेरिकेतील काम भारतात करण्याऐवजी इथून स्वस्तातले अभियंते तिकडे नेणं –बॉडी शॉपिंग! – या व्हिसामुळे सोयीस्कर ठरलं. गिऱ्हाइकांना तासाला ७० डॉलरचे बिलिंग करून भारतीय अभियंत्यांच्या हातावर २० डॉलर टेकवायचे. (हे आकडे तेव्हाचे. ते नंतर बदलले.) प्रत्येक भारतीय अभियंत्यामागे कंपन्यांना ताशी ५० डॉलर, म्हणजे वर्षाला एक लाख डॉलर मिळतात. उद्योगधंद्यातील नफ्याचं प्रमाण ५० ते ६० टक्के जाईल तर त्यात नवल काय? अभियंते ग्रीन कार्ड मिळेपर्यंत दहा-दहा वर्षं राबतात. (कार्ड जेवढं उशिरा मिळेल तेवढा जास्त आनंद!)

काही वर्षांत एक मोठं रॅकेटच तयार झाले. अभियंता आणि गिऱ्हाईक यांच्यामध्ये दलाली कंपन्यांचे –बहुतेक भारतीय– दोन-तीन

थर तयार झाले. गिऱ्हाईकं अमेरिकन असली तरी ते नैतिकतचे पुतळे नव्हते, आणि त्यांचाही गाळा भारतीय अभियंत्यांच्या मिळकतीतून जायला लागला. (असल्या देवाणघेवाणीच्या व्यवहारात आपले लोक तरबेज असतात!) अनेक अमेरिकन कंपन्यांना स्थानिक अभियत्यांपेक्षा परदेशी अभियंते अधिक प्यारे झाले! देशी कंपन्यांचा हा डोलारा उभा आहे तो एका खांबावर आणि तो खांब म्हणजे भारत आणि अमेरिकेतील जीवनमानातील तफावत. आंध्रमधल्या गावात राहणाऱ्या चाकरमान्याला ताशी वीस डॉलर पगार म्हणजे ऐश, तर तोच पगार अमेरिकेत बिगारी कामगाराचा! माहिती-तंत्रज्ञानातील कोणत्याही अमेरिकन, किंवा ग्रीन कार्ड मिळालेल्या भारतीय, अभियंत्याला तासाला ८० डॉलरपेक्षा कमी पगारात काम करणं परवडणत नाही. (बऱ्याच जणांवर शिक्षणासाठी काढलेल्या भरमसाठ कर्जाचा बोजा असतो.)

या रॅकेटमधल्या सर्वांच्या भारतीयांमधला एक कमकुवतपणा लक्षात आला आहे. भारतीयांनी आपल्या देशाच्या मोठेपणाचे नगारे मारे कितीही बडवले तरी कोणत्याही परिस्थितीत ते आपल्या मातृभूमीला परत जायला तयार नसतात. ''मारा, झोडा, अपमान करा, पण मी अमेरिकेचा पदर सोडणार नाही,'' ही मानसिकता असते. भारतात गेल्यानंतर जो सांस्कृतिक धक्का बसेल तो मुलांना सहन होणार नाही, असली कारणं पुढे केली जातात. वास्तविक शाळा आणि ऑफिस सोडलं तर बहुतेक भारतीयांचा वावर आपापसातच असतो. त्यामुळे 'सांस्कृतिक धक्का' हा चक्क बागुलबुवा वाटतो.

कॉर्पोरेट टॉवरच्या वरच्या मजल्यावर दृष्ट लागेल अशी 'बॉटम लाइन' मिळत असताना तळमजल्यावर सगळं काही ठाकठीक नव्हतं. आहे त्या स्थानिक लोकांना नोकरीवरून काढून ती कामं भारतीय कंत्राटदारांना द्यायची अशा असंख्य प्रसंगांचा अमेरिकेत मोठा बोभाटा झाला. कॅलिफोर्नियामधील Southern California Edison या कंपनीत तर काढलेल्या अमेरिकन अभियंत्यांवर त्यांच्या जागी नेमलेल्या नवशिक्या भारतीयांना त्यांनी सर्व काम शिकवलं पाहिजे असं बंधन घातलं. नाहीतर उरलेला पगार मिळणार नाही, ही धमकी. आज अमेरिकेत आय.टी. क्षेत्रातले ३० टक्के लोक बेकार आहेत किंवा आपल्या क्षेत्राबाहेर नोकऱ्या करतात. आपल्या नोकऱ्या उपरे पळवतात, असा प्रक्षोभ अमेरिकेतील अभियंत्यांत निर्माण झाला. आमचे संसार उद्ध्वस्त होताहेत त्याची कुणाला पडलेली नाही, अशी भाषा ऐकायला यायला लागली. मग अमेरिकन लोक २०१६ साली डॉनल्ड ट्रम्प नावाच्या एका व्यक्तिकडे वळले. तो रानवट आहे




हे माहीत असूनसुद्धा. पुढची कहाणी सर्वश्रुत आहे.

''अमेरिकेतले लोक आळशी आहेत. त्यांना नुसती चैन करायला पाहिजे. आम्ही जसं STEM मध्ये प्रभुत्व मिळवलं तसं त्यांना का नाही येत?'' असा आरोप भारतीय अमेरिकन लोकांवर करतात. यातला हल्लीचा लाडका शब्द STEM हा Science, Technology, Engineering and Mathematics यांतली पहिली अक्षरं गोळा करून बनवलेला आहे. या आरोपातही फारसं तथ्य नाही. एक म्हणजे आज जवळजवळ सव्वा कोटी अमेरिकन STEM पदवीधर आहेत. दुसरं म्हणजे STEM म्हणजे फक्त आय.टी. नव्हे. भारतीय बहुतांश आय.टी.मध्येच असतात, इतर क्षेत्रांत अभावानेच. याचा अर्थ आय.टी.मध्येच काहीतरी काळंबेरं आहे, असं अमेरिकन लोकांचं म्हणणं आहे.

निवडून आल्याबरोबर ट्रम्पने बडगा दाखवला. ज्या कंपन्यांमध्ये १५ टक्क्यांपेक्षा जास्त एच १बीवाले आहेत त्यांच्यांवर कमीत कमी ६०,००० डॉलर पगार दिलाच पाहिजे असं बंधन घालण्यात आलं. ज्या कंपन्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त एच १बीवाले आहेत त्यांना प्रत्येक नवीन व्हिसाला १०,००० डॉलरपेक्षा जास्त फी लावली. एच १बी नूतनीकरण करण्यासाठी केलेल्या अर्जांसाठीसुद्धा RFE सारखी कागदपत्रं मागितली. दुसरं म्हणजे काही ना काहीतरी खुसपट काढून अर्ज नाकारायचे, असा आदेश दिला. २०१२ मध्ये अर्ज नाकारायचं प्रमाण होतं ५%. ते २०१८ मध्ये २४% वर आलं. काही भारतीय कंपन्यांचं तर हे प्रमाण ६०% पर्यंत आलं. अमेरिकेला माहीत नव्हतं की असल्या हूलझापडीला भारतीय कंपन्या धूप घालत नाहीत. त्यांनी दाखल केलेल्या अर्जांची संख्या योग्य त्या प्रमाणात वाढवली! त्यामुळे परिस्थिती जैसेथेच राहिली.

ट्रम्पने बडगा दाखवला नसता तरी भारतीयांची गाडी कोसळण्याच्या मार्गावरच होती. त्याचं कारण हे की एच१बी व्हिसांना कॅप नाही, पण ग्रीन कार्डना आहे. एच१बी व्हिसाधारकांची संख्या दर वर्षी ऐंशी हजारांनी वाढते. त्यांची बायकामुलं धरली तर दीड लाखांच्या आसपास. त्यात सत्तर टक्के भारतीय आहेत. भारतीयांचा FB ग्रीन कार्डचा वार्षिक हिस्सा आहे बारा ते पंधरा हजार. म्हणजे दरवर्षी जवळजवळ ऐंशी हजार अर्ज तुंबतात. आज नवीन ग्रीन कार्डसाठी अर्ज करणाऱ्याला सत्तर वर्षं तरी ते मिळण्याची शक्यता नाही. ज्यांच्या ग्रीन कार्डना मंजुरी मिळालेली आहे पण ज्यांना रांगेत उभं केलेलं आहे त्यांनी आपल्या देशात परत जायचं, किंवा अमेरिकेत एच१बी व्हिसांवर वाट बघायची, असे दोन पर्याय आहेत. त्यातला पहिला पर्याय अनिवार्य करायचा ट्रम्प विचार करतोय. ("You've got a beautiful country. I loved it. You should go back," वगैरे वगैरे.) अर्थातच भारतीयांना ते मंजूर नाही. आज ते एच१बी व्हीसांवर दहा-दहा वर्षं प्रतीक्षा करणं पसंत करतात.

अशा प्रतीक्षावंतांवर नाही म्हटलं तरी अमेरिकन सरकारनं दोन प्रकारची कृपा केली: (१) ज्यांचा ग्रीन कार्ड अर्ज नुसता मंजूर झाला आहे, पण कार्ड मिळालेलं नाही, अशांना वेठबिगारीतून मुक्त केलं, आणि (२) त्यांच्या बायकांना, ज्या एच४ व्हिसावर राहतात, नोकरी

करायला परवानगी दिली. ओबामानं दिलेल्या या सवलतींवरून अमेरिकेत बोंबाबोंब झाली आहे. तेव्हा वेळ पडली तर ट्रम्प यांच्यावरही गदा आणेल, अशी भीती आहे. एच४ व्हिसावरील नोकऱ्या आताच दोलायमान अवस्थेत आहेत. या सगळ्यातून आणखी अनेक समस्या डोकं वर काढत आहेत. प्रथम म्हणजे एच१बीधारकांची जी मुलं एकवीस वर्षं ओलांडताहेत त्यांना आईवडिलांकडून मिळालेलं एच४ व्हिसाचं कवचकुंडल जाणार. अशी थोडीथोडकी नव्हे तर ५०,००० मुले आहेत, आणि त्यांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. त्यांना भारतात परत तर गेलंच पाहिजे आणि अमेरिकेत यायचं असेल तर श्रीगणेशापासून (म्हणजे विद्यार्थिदशेपासून) सुरुवात केली पाहिजे. खरं म्हणजे या सर्व गोष्टींचा विचार भारतीयांनी आधी करायला पाहिजे होता.

सर्वप्रथम म्हणजे एच१बी व्हिसा हा तात्पुरत्या काळाकरता असतो, हे लक्षात ठेवायला पाहिजे. (त्याला Guest Workers Program असंच नाव आहे.) तो मिळाल्यानंतर ''अब ग्रीन कार्ड दूर नही,'' या थाटात घर, गाड्या वगैरे घेऊन बस्तान बसवणं शहाणपणाचं नाही. स्वत:ला ग्रीन कार्ड मिळत नाही म्हणून संपूर्ण इमिग्रेशन व्यवस्था बोंबलली आहे, असं म्हणणं हास्यास्पद आहे. ट्रम्पच्या नावानं कितीही जोराने बोटं मोडली तरी ती कुणाला ऐकू जाणार नाहीत. ''हा अन्याय आहे,'' असा गळा काढण्यातही काही अर्थ नाही. हल्लीच्या काळात स्वत:ला victim म्हणवून घेणं ही फॅशन झाली आहे. आपणही त्यांपैकी एक.

दुसरी समस्या म्हणजे ग्रीन कार्ड काढायच्या वेळी अर्जाबरोबर अर्जदाराच्या लायकीची (शिक्षण, पगार, वगैरे) माणसं अमेरिकेत पुरेशी नाहीत असं लेबर सर्टिफिकेट द्यावे लागते. ज्यांचे अर्ज दहा वर्षं तुंबले आहेत त्यांचं काय? आताची लेबर परिस्थिती नक्कीच बदलली आहे. म्हणजे त्यांच्या नवीन कंपनीनं त्यांच्या नवीन नोकरीकरता (दहा वर्षांत सगळंच बदललं आहे) नव्यानं लेबर सर्टिफिकेट आणलं पाहिजे. पण ते मिळेल याची खात्री काय? आणि मिळालं नाही तर काय? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत, याचं कारण १९९० साली भविष्यात असे प्रश्न उद्भवतील याची कल्पना कुणी केली नव्हती.

थोडक्यात, नवीन कायदा करायची वेळ आली आहे. अमेरिकेत बेकायदेशीर असलेल्या मातापित्यांच्या, पण जन्मामुळे अमेरिकन नागरिक झालेल्या, बिनगोऱ्या मुलांचा डाकासारखा प्रश्नही उग्र झाला आहे. तेव्हा सर्वव्यापक कायदा करावा या मताचा ट्रम्प आहे. अर्थातच गोऱ्यांची लोकसंख्या फारशी कमी होणार नाही याची खबरदारी तो घेईल. जन्मजात अमेरिकन नागरिकत्व मिळते हा कायदा (घटनेतील तरतूद?) मोडून टाकायच्या तो मागे आहे. एच१बी, एच४ व्हिसा यांच्यांतही तो फांदे घालेल. त्याचे समर्थक खूष होतील. नवीन कायदा उभा करणे हे एरवीसुद्धा वेळकाढू काम असते. आता तर करोनामुळे सर्व कामकाज ठप्प झाले आहे. त्याशिवाय करोनाने नवे प्रश्न उभे केले आहेत. १० लाख विद्यार्थ्यांना स्वगृही हाकलायची धमकी ट्रम्प देतोय. यात अडीच लाख भारतीय आहेत. पण त्याला ते जमेल असं वाटत नाही. याचं कारण म्हणजे हार्वर्ड, येलसारख्या विद्यापीठांच्या खिशात दहा अब्ज डॉलरची चिल्लर खुळखुळत असते. ट्रम्प त्यांच्याबरोबर पंगा घेणार नाही.

भारतीय उद्योगधंद्यांनीसुद्धा बिझिनेस मॉडेल बदलायला सुरुवात केली आहे. नित्यक्रमातील कामांचं यांत्रिकीकरण झालं असल्यानं बॉडी शॉपिंगऐवजी ते AI, Data Analystics, Cloud सारख्या वरच्या दर्जाच्या क्षेत्रात परामर्श कार्यामध्ये (Consultancy) गुंतवून घेत आहेत. अमेरिकेतील माहिती-तंत्रज्ञानातील एका समूहानं (यात भारतीय कोणी नाही!) लिनक्स, पायथॉन, मायएसक्यूएल, ओपनस्टॅक, अपॅची यासारखे असंख्य सॉफ्टवेअर प्रोग्रॅम्स विनाशुल्क उपलब्ध केले आहेत. आपल्या माहितीतील अँड्रॉइडसुद्धा त्यातलाच. आता मायक्रोसॉफ्ट आणि सॉफ्टवेअरचे महागडे परवाने यांचे दिवस संपले. भारतीय उद्योगधंद्यांना अशा सॉफ्टवेअरमधले कुशल अभियंते पुरवणं हा मोठा उद्योग त्यांनी त्या दृष्टीनं प्रयत्न केल्यास मिळू शकणार आहे.

''ट्रम्पच्या कृत्यांचा आमच्यावर काही परिणाम होणार नाही. उलट अमेरिकेचंच नुकसान होणार आहे,'' अशा गर्जना आपल्या देशी पंडितांनी कितीही केल्या तरी या घडामोडींचा आपल्या देशावर दूरगामी परिणाम होणार आहेत यात शंकाच नाही. आपल्या आय.टी. कंपन्या चाळीस लाख लोकांना रोजगार पुरवतात. दरवर्षी दोन लाखांची नवीन भरती होत असते. वर्षाकाठी १८० अब्ज डॉलरची उलाढाल करतात. त्यापैकी ७० अब्ज फक्त अमेरिकेत! हा धंदा भारताच्या GDP च्या सहा टक्के आहे तर एकूण निर्यातीच्या २५ टक्के आहे. हा धंदा कमी होईल असं नाही, पण फायदा जरूर कमी होईल.

अमेरिकेतील भारतीय उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या एच१बी व्हिसाधारकांच्या जिवावर चाललेली दिवाळी मात्र आता संपत आली आहे. आज भारताची प्रतिमा खराब करण्यात यांचा मोठा वाटा आहे. अमेरिकेत कायम स्वरूपानं राहणारे भारतीयसुद्धा एच१बीच्या विरुद्ध आहेत. या व्हिसाचं आकर्षण संपलं तर अभियांत्रिकीच्या सर्व शाखांचं शिक्षण घेऊन आपली मुलं शेवटी आय.टी.त गोळा होतात हे चित्रही बदलेल. नाही तरी नॅसकॉमच्या पाहणीप्रमाणे ६० टक्के अभियंत्यांना प्रोग्रॅमिंगमधलं ओ की ठो कळत नाही आणि केवळ दीड टक्का व्यवस्थित प्रोग्रॅम लिहू शकतात. तेव्हा चांगली मुलं चमकतील आणि गाळ मागे राहील. ग्रीन कार्ड फालतू लोकांना न मिळता खरोखर उच्चशिक्षितांना मिळावीत, असं मत ट्रम्पनं अनेक वेळा व्यक्त केलं आहे. या सर्वांचा फायदा भविष्यकाळात आपल्याला नक्कीच मिळेल. पण कोरोनामुळे आता भविष्यकाळच लांबला आहे.

भारतानं असं आपलं रूप बदललं तर ते सुंदरीला आवडेल. तिचा त्याच्याबद्दलचा आदर वाढेल. तिला आपण आवडत नाही म्हणजे तिच्यातच काहीतरी दोष आहे असं म्हणणं म्हणजे स्वत:च्या पायावर धोंडा टाकून घेण्यासारखं आहे. इतिहास सांगतो, की ती गुणग्राही आहे. जगातील असंख्य गुणवंतांनी तिचा आसरा घेतलेला आहे. भारतही काही कमी नाही.

**– डॉ. मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५-६३१३०
mohan.drawid@gmail.bom

**storytel**

# ‘स्टोरीटेल इंडिया’चे ‘सिलेक्ट मराठी’ भारतात दाखल!

## ‘सिलेक्ट मराठी द्वारे ऐकता येणार माफक शुल्कात हजारो मराठी ऑडिओ बुक्स

‘आपल्याकडे कोसाकोसावर भाषा बदलते’ असे म्हणतात. मराठी भाषाही अशीच समृद्ध झाली आहे. अभिजात साहित्याने परिपूर्ण असणाऱ्या भारतातील लोकप्रिय ऑडिओ बुक ॲप ‘स्टोरीटेल’ इंडियाने म्हणूनच खास मराठी श्रोत्यांसाठी ‘सिलेक्ट मराठी’ ही नवीन सेवा १५ जुलैपासून उपलब्ध केली आहे. या सेवेद्वारे श्रोत्यांना फक्त मराठी पुस्तकांचा आनंद घेता येईल. मराठी माणसाला मायबोलीविषयी असणाऱ्या प्रेमामुळे आणि विशेष करून मराठी भाषेतील रसिक श्रोते मोठ्या प्रमाणात स्टोरीटेलला प्रतिसाद देत असल्याने जगात पहिल्यांदाच ही सुविधा मराठी भाषिकांसाठी या ॲपने उपलब्ध करून दिली आहे.

स्टोरीटेल ॲप डाऊनलोड केले की आता ‘स्टोरीटेल अनलिमिटेड’ व ‘स्टोरीटेल सिलेक्ट मराठी’ असे दोन पर्याय उपलब्ध होतील. यातील ‘स्टोरीटेल अनलिमिटेड’ व स्टोरीटेल सिलेक्ट मराठी’ असे दोन पर्याय उपलब्ध होतील. यातील ‘स्टोरीटेल अनलिमिटेड’मध्ये आठ भाषांतील पुस्तके दरमहा केवळ २९९ रुपयांत उपलब्ध असतील. तर, ‘स्टोरीटेल सिलेक्ट मराठी’ फक्त ९९ रुपये प्रति महिना उपलब्ध असेल. यातील ‘सिलेक्ट मराठी’ पर्याय निवडल्यास श्रोत्यांना फक्त मराठी भाषेतील पुस्तके ऐकावयास मिळतील.

‘सिलेक्ट मराठी’बाबत बोलताना स्टोरीटेल इंडियाचे मुख्य व्यवस्थापक योगेश दशरथ म्हणाले, ‘‘मला अनेक कार्यक्रमांमध्ये प्रश्न विचारला जायचा, की ऑडिओ बुक केवळ श्रोत्यांच्या मातृभाषेत का उपलब्ध होत नाहीत. हाच विचार पुढे ठेवून, आम्ही ‘सिलेक्ट मराठी’ हे नवीन फिचर फक्त मराठी श्रोत्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे. यामुळे स्टोरीटेल ॲपमध्ये ‘सिलेक्ट मराठी’ पर्याय निवडल्यास श्रोते फक्त मराठी पुस्तकं ऐकू शकतात. याद्वारे मराठी पुस्तकं जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावीत हे आमचे ध्येय आहे.’’

‘सिलेक्ट मराठी’मध्ये दिग्गज लेखकांपासून ते प्रतिथयश व नवोदित लेखकांनी लिहिलेल्या दर्जेदार कादंबऱ्या, कथा, आत्मचरित्रे, कविता व नाटके उपलब्ध आहेत. पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, शिवाजी सावंत, वि. स. खांडेकर, भालचंद्र नेमाडे, सुहास शिरवळकर, ना. सं. इनामदार, गो. नी. दांडेकर अशा मराठीतील दिग्गज लेखकांच्या लेखणीतून अजरामर झालेल्या कलाकृती श्रोत्यांना या ‘सिलेक्ट मराठी’मध्ये ऐकता येतील. ही ऑडिओबुक्स लोकप्रिय अभिनेते विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर, मृणाल कुलकर्णी, संदीप खरे, गिरीश कुलकर्णी, किशोर कदम, अतुल पेठे, उदय सबनीस आदींनी वाचली आहेत. याशिवाय नव्या पिढीतील लेखकांची स्टोरीटेल ओरिजनल ऑडिओ बुक्सही सर्वांना ऐकता येतील. स्टोरीटेल येत्या काही महिन्यात २००हून अधिक ऑडिओ बुक्स प्रकाशित करणार आहे व दरमहा उत्तमोत्तम साहित्याची भर स्टोरीटेल सिलेक्ट मराठीत होत राहणार आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

अंकित वर्मा +९८ ८८७९१५९९२ ankita.verma@storytel.com

प्रसाद मिरासदार ९८९००२७७६६ prasad.mirasdar@storytel.com

**स्टोरीटेलविषयी...**

स्टोरीटेल ही उत्तर युरोपातील ऑडिओ बुक व ई-बुक सेवा देणारी अग्रगण्य कंपनी आहे. या ॲपद्वारे वेगवेगळ्या भाषांतील जवळपास ५ लाख पुस्तके ऐकण्यासाठी व वाचण्यासाठी उपलब्ध आहेत. कोणासही, कोठूनही आणि केव्हाही कोणीही शेअर केलेली पुस्तके वाचता यायला हवी, त्यामुळे जग समानुभूतीने आणखी जवळ येईल हे स्टोरीटेलचे ध्येय आहे. स्टोरीटेल हे एक डिजिटल व्यासपीठ आहे तसेच ती एक मोठी प्रकाशन संस्थाही आहे. स्ट्रिमिंग व्यवसायक्षेत्रात स्टोरीटेल आणि मोफिबो ब्रँड अंतर्गत ऑडिओ बुक आणि ई-बुकसाठी सबस्क्रिप्शन उपलब्ध आहे. डिजिटल-रीड-ऑल-कॅन स्ट्रिमिंग सेवा ही वृत्तपत्रे आणि मासिकांसाठी जानेवारी २०१९ पासून स्टोरीटेलचा भाग आहे. स्टोरीटेल जगभरातील २० देशांत कार्यरत असून त्याचे मुख्यालय स्टॉकहोम, स्वीडन येथे आहे.

पत्ता : स्टोरीटेल इंडिया, २१५, जानकी सेंटर, ऑफ वीरा देसाई, अंधेरी, मुंबई ५८ https://www.storytel.com

## दलदलीतून उमललेले कमळ

मराठी साहित्यात अनेक आत्मचरित्रांची झालेली नोंद ही त्या त्या काळाच्या गाण्याची नोंद म्हणता येते, मैलाच्या दगडांसारखी. प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगळे आहे. प्रत्येकाने आपली नाममुद्रा साहित्याच्या इतिहासात ठळकपणे कोरलेली आहे, अशी नाममुद्रा, जी कधीही नामशेष होऊ शकणार नाही. अक्षरलेणी म्हणून त्यांचा गौरव करण्यात येतो. असेच एक अक्षरलेणे म्हणजे 'ढोर' हे आत्मचरित्र होय. सन १९९९ साली या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. आज त्याची आठवी आवृत्ती प्रकाशित होत आहे. नाणं खणखणीत असेल तर त्याची कदर केली जाते. साहित्यात ढोर या कलदार नाण्याने आपले कलदारपण सिद्ध केले आहे. अनेक मान्यवर वाचकांनी याची नोंद घेत आवर्जून लेखकाला शाबासकीचे सन्मानपत्र बहाल केलेले आहे. त्यांच्या अभिप्रायाची दखल पुस्तकाच्या शेवटी जोडलेली आहे, त्यावरून या पुस्तकाचे उजवेपण अधिक उठावदार झालेले आहे. नामदार सुशीलकुमार शिंदे यांनी दिलेली शाबासकी आणि प्राचार्य रा.रं. बोराडे यांनी केलेली मीमांसा आणि अपेक्षा हे लेखकाच्या यशावर शिरपेच चढवल्यासारखी शोभून दिसतात.

प्रा. भगवान आपा इंगळे हे या आत्मचरित्राचे नायक. ढोर समाजाचे प्रतिनिधी आणि खर्डा या गावाचे रहिवासी. खर्डा हे गाव निजाम-मराठे यांच्या युद्धाचे एक ठिकाण म्हणून प्रसिद्ध, परंतु भामटा हा शब्द याच गावाशी जोडलेला, सुंदर पारदर्शी त्वचेवर नायटा दिसावा तसा. केवळ या भामटा शब्दामुळे किती त्रास सहन करावा लागला, कारण नसताना, याचे वर्णन वाचताना हसावे की रडावे अशी द्वंद्वाची परिस्थिती उद्भवते. ढोर समाजात जन्म घेतल्याने काय काय सहन करावे लागले आणि त्याला चरित्रनायक कसा सामोरे गेला याचे वर्णन वाचताना, आपण कल्पनेच्या किती मर्यादेत वावरतो याची लाज वाटू लागते. चामड्याच्या वस्तू वापरताना आपल्यात मुरलेला सहजपणा, हेच चामडे आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठी ढोर समाजाने किती यातना सहन केलेल्या आहेत यांच्या मुळाशी आपण कधी गेलेलो नसतो, कधी त्याचा विचारही केलेला नसतो. तो विचार, तो सहजपणा या ढोर यातना वाचताना पार गळून पडतो, नव्हे आपली लक्तरे उघडी पडली याची लाज वाटू लागते. ढोर समाजाने ढोरासारखे राबणे समजू शकतो; परंतु त्या नरकयातना आहेत याचा उलगडा ढोर वाचताना होतो. कच्चे कातडे एवढेच आपल्याला ठाऊक असते. परंतु त्याचे पक्के रूप समोर येण्यापूर्वी हालवनी, पाटनी, छिलनी, नांदी, रंगा, उभारनी या प्रक्रियेतून त्याला जावे लागते हेच आपल्याला ठाऊक नसते. ही प्रक्रिया यांत्रिक नाही, मानवी आहे. प्रत्येक टप्प्यावर हा ढोर माणूस स्वत: उसवत राहतो आणि पुन्हा पुन्हा शिवत राहतो. हे काम म्हणजे कष्ट, परिश्रम इतकेच नाही ते नरकयातना भोगायला लावणारे काम आहे, तेही जिवंतपणी, कधी उपाशी तर कधी याच नरकात राहून. लेखक या नरकयातना स्वत: सहन केलेला वज्रपुरुष आहे, पण त्यांचे मन मात्र मेणाहून मऊ आहे. नरकयातनेचे श्रम असोत, शाळेतला उपवास असो, खर्डा गावचा म्हणून पोलीसछळ असो, चकार शब्दाने तक्रारीचा सूर नाही. आपण सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलो नाही याची पुरेपूर जाणीव असून त्याचा दोष, द्वेष, राग ते कुणावर व्यक्त करत नाहीत. आपली आई गंगाबाय हिच्या शिकवणीनुसार नेहरू-आंबेडकरांसारखे शिकण्यावर लक्ष केंद्रित करतात. सगळे दारिद्र्य, कष्ट, अपमान याचे बाण पाठीशी भात्यात ठेवून जिद्दीने, मन कठोर करत आपला शिक्षणाचा प्रवास पूर्ण करतात. खर्डा, बार्शी, अहमदनगर, संगमनेर, धारावी मुंबई असा एकेक टप्पा पार करत आपल्या ईप्सितापर्यंत पोचतात.




**ग्रंथपान**

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**ढोर**

**भगवान इंगळे**





हा प्रवास एकट्या भगवानचा नाही. बाप, आई, महादेव, बहीण पदाबाई यांचा आहे. आठ बहिणी चार भाऊ यांचा आहे. ढोर समाजाचा आहे. खर्डा गावापासून मुंबईपर्यंतचा प्रवासात भेटलेल्या सगळ्या नातेवाईकांचा, सहकाऱ्यांचा, मित्रांचा, शिक्षकांचा आहे. अगदी सौ. आशा इंगळेपर्यंतचा आहे. दलदल, चिखल, दुर्गंधी, ठिगळ लावलेल्या कपड्यापासून ते कडक इस्त्रीपर्यंतचा आहे. हे सर्व वाचत असताना भगवान इंगळे यांसारखी माणसे असेही जीवन जगलेली आहेत, असेही वास्तव आपल्याभोवती आहे, हे पाहून मती दियूढ होते. यात माणसांचे स्वभाव, ग्रामीण भागात असलेले रिवाज, अंधश्रद्धा, माणसावरचा विश्वास, जातपंचायत, विधी असा सगळा ऐवज लेखकाने जिवंतपणे उभा केलेला आहे.

एकटाकी लेखन म्हणावे तसे हे लेखन आहे. ज्या भागातून आलो त्या भागात जी भाषा जशी वापरली जाते. तीच भाषा संपूर्ण लेखनासाठी वापरलेली आहे. त्यामुळे तिचे मूळचे अंगभूत सौंदर्य कायम टिकलेले आहे. (प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीची यावेळी आठवण होते.) विशेष असा, की हे संपूर्ण लेखन प्रसन्न शैलीतून साकारलेले आहे. मूळचा शाहीर, पोवाडे, विनोद, नकला यांचा सोस अंगी असल्याने सुंदर असा नितळपणाचा प्रवाह झुळझुळत जावा तसा हा लेखनप्रकार आहे. जागोजागी वापरल्या जाणार्या अस्सल रांगड्या शिव्या आणि म्हणींचा मुक्त वापर त्यामुळे मोत्याच्या माळेत माणके-हिरे जोडल्यासारखे सुशोभित झालेले आहेत. एक सुंदर प्रवास वाचल्याचा आनंद दीर्घकाळ स्मरणात होता तो या आवृत्तीने दृढ केला.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**स्वप्नपंखांना आकाश थिटे**
**धैर्य, कल्पनाशक्ती आणि नव्या युगाच्या इस्राएलची जडणघडण**
**शिमॉन पेरेस**
**मेधा आलकरी**




### इस्राएल उभारणीचे शिल्पकार

''एखाद्या राष्ट्राला खतम करायचं असेल तर तुमच्याकडे दोन गोष्टी हव्यात. पहिली अर्थात जबर इच्छा आणि दुसरी म्हणजे आपल्या लष्कराकडे तसं करण्याची श्रेष्ठता असल्याची खात्री!''

दहशतवाद्यांशी वाटाघाटी करणाऱ्या नेत्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे, की जेव्हा तुमच्या कानफटीला बंदूक रोवलेली असते तेव्हा तुम्ही वाटाघाटी करणारे राज्यकर्ते नसून ओलीस असता.''

''आम्हाला जी शस्त्रं मिळाली ती बहुतकरून नाझींनी व्यापलेल्या झेक प्रदेशात त्यांनीच सुरू केलेल्या सुविधांमध्ये बनवली गेली होती. हा विधात्याचा एक आश्चर्यकारक संकेत असावा. एकेकाळी आम्हाला मारणारी शस्त्रंच आज आम्हाला तारणार होती. आमचं रक्षण करण्यात उपयोगी होणार होती.''

'इस्राएल' या नावाची जादू जगावर अधिराज्य गाजवते आहे. वाळवंट असलेल्या भूमीला सुजलाम् सुफलाम् करण्याची जादू इस्राएलकडे आहे. ज्ञान-विज्ञान-परमाणूपर्यंतची ऊर्जा, शस्त्रास्त्रे अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेले हे चिमुकले राष्ट्र स्वत:च्या ताकदीवर उभे आहे. सगळ्यांच्या आश्चर्याचे केंद्र बनलेले आहे. याचे सारे श्रेय राष्ट्रउभारणीत ज्यांनी आपले आयुष्य समर्पित केले, त्यापैकी एक असलेल्या शिमॉन पेरेस यांचेही आहे. युनोने नोव्हेंबर १९४७ ला पॅलेस्टाईनपासून स्वतंत्र इस्राएलला मान्यता दिली. तिथून हे राष्ट्रउभारणीचे स्वप्न प्रत्येक द्रष्ट्याने पाहिले, त्यात शिमॉन पेरेस हे एक होते, पहिल्या फळातले आघाडीचे नेते.

नाझीच्या संहाराची झळ बसलेले शिमॉन पेरेस यांचे आजोबा हे त्यांचे पहिले गुरू. ज्यांनी अखेरपर्यंत यहुदी राहण्याचे आणि शांततेसाठी काम करण्याचे वचन घेतले. दुसरे आहेत डेविड बेन गुरिऑन, थोर तत्त्वज्ञानी. त्यांनी यहुद्यांना स्वातंत्र्य मिळवून दिले. ते करून देवानिर्मितीकरता नसून मानवतेसमोर उदाहरणादाखल ठेवलेल्या 'लाईट अन्टु नेशन्स' या सर्व जगासाठी मशाल बनण्याच्या ऐतिहासिक मिशनची पूर्ती म्हणून. यांच्या सहवासात आल्यापासून शिमॉनच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त झाला. विविध संघटना, संस्थांमधून आपल्या कार्याची सुरुवात करताना स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले. वेगळा दृष्टिकोन, ध्येय, जिद्द, आत्मविश्वास आणि दूरदृष्टी हे गुण अंगी असलेले शिमॉन इस्राएलच्या निर्मितीसाठी एक मुत्सद्दी राजकारणी, नवनिर्मितीचे स्वप्न साकारणारे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व ठरलेले आहेत. अनेकदा वादग्रस्त, थांग न लागलेले शिमॉन जे धाडसी निर्णय घेतात, हजरजबाबीपणा दाखवतात, डावपेचांचे आडाखे रचून समोरच्या देशाला आपल्या शब्दाशी आणतात, ते सारे कौशल्य आश्चर्यचकित करणारे आहे. देशाला स्वातंत्र्य जपायचे तर संरक्षणासाठी शस्त्राची गरज आहे. देशाला स्वयंपूर्ण करायचे तर विविध उद्योग येथे सुरू झाले पाहिजे, त्यासाठी कुशल तंत्रज्ञ देशात उपलब्ध पाहिजेत. परमाणुप्रकल्प सुरू करून सर्व राष्ट्रांना पेचात ठेवण्याचे कसब जोपासले जायला हवे, देशात बेरोजगाराचे प्रमाण एक टक्काही असता कामा नये, यासाठी ज्या विविध योजनांना- स्टार्टअप, इस्राएल नॅशनल नॅनोटेक्नॉलॉजी इनिशिएटिव्ह, इस्राएल ब्रेन टेक्नॉलॉजीतर्फे नवनिर्मितीसाठी पुरस्कार- चालना देण्याची कल्पकता अचंबित करणारी आहे. देश आर्थिक संकटात सापडला तेव्हा सर्व खात्यांच्या बजेटमध्ये कात्री लावण्यातही मागेपुढे न पाहणारे शिमॉन दहशतवादी कारवायांच्या वेळीही तितकेच खंबीरपणे उभे राहिलेले आहेत. एक साधा कार्यकर्ता ते पंतप्रधान, अध्यक्ष अशा विविध भूमिकांत वयाची सत्तर वर्षे ते कार्यरत राहिलेले आहेत.

शिमॉन पेरेस यांनी स्वत: लिहिलेला हा सत्तर वर्षांचा दीर्घ प्रवास राजकीय, सामाजिक संघर्षाने भरलेला आहे. प्रत्येक संघर्षात ते यशस्वीपणे पाऊल पुढे टाकत गेलेले आहे. या संपूर्ण प्रवासात त्यांनी जपले ते मानवाच्या शांतीसाठीचे स्वप्न, स्वदेशनिर्मितीचे स्वप्न. देशाला जगात सर्वोच्च ठिकाणी स्थानापन्न करण्याचे स्वप्न. यासाठी त्यांनी कुठेही तडजोड केलेली नाही. त्यामुळेच त्यांना शांतिदूत जसे म्हटले जाते तसे राजकारणातला बहिरी-ससाणाही संबोधले जाते.

हे आत्मचरित्र म्हणावे का, की राजकीय चरित्र म्हणावे? संपूर्ण लेखात कुटुंबाविषयी आलेला उल्लेख फार थोडा आहे. तरी त्यातून त्यांचे कुटुंबवत्सलतेचे दर्शन होते. इस्राएलची उभारणी करताना त्यावेळेचे इतर राष्ट्रांचे असलेले दृष्टिकोन, त्यावेळची राजकीय परिस्थिती, ब्रिटिश सत्तेचा खेळ, राजकारणातले डावपेच या सर्व तपशिलांचा इतिहास येथे आलेला आहे. त्याचबरोबर एका प्रगल्भ विचारवंताप्रमाणे वेळोवेळी व्यक्त झालेले विचार चाणक्याचे स्मरण करून देतात.

इस्राएलचा इतिहास समजून घेण्यासाठी ज्या संदर्भांची यादी आहे त्यात या पुस्तकाचा क्रमांक पहिला ठरावा. तपशीलवार, तारखांसह आलेला इतिहास वाचताना आपण अंतर्मुख होतो.

मेधा आलकरी यांनी केलेला अनुवाद हा तितकाच उत्तम झालेला आहे. त्यात आलेला चपखलपणा आणि सहजपणा यामुळे हा अनुवाद न वाटता मूळ मराठीतील लेखन असल्याचेच जाणवत आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**यश म्हणजे काय? भाग २**
**शिल्पा जितेंद्र खेर**




**यश जेथे शरण येते**

माणसाच्या जगण्यात दोन गोष्टींना सर्वोच्च स्थान प्राप्त झालेले आहे. एक आहे सुख आणि दुसरे आहे यश. सुख ही सामान्य माणसांची अपेक्षा तर यश हे असामान्य माणसांची. सुख अनेक गोष्टींवर अवलंबून असते. त्यात यशाचा वाटा मोठा असतो. त्यामुळे सुखही तात्कालिक कल्पना असून यश ही सर्वकालीन टिकणारी कल्पना होय. माणूस समाधान पावतो तो यशामुळे. विकास, प्रगती, समृद्धी हे सर्व काही यशावर अवलंबून असते. ते प्राप्त होणे म्हणजे यशस्वी होणे, समाधान पावणे, काहीतरी प्राप्त केले, मिळवले या यशाचे धनी होणे. यश ही कल्पना काही एकाकी साकार होणारी, साध्य होणारी गोष्ट नाही. त्यासाठी बुद्धिकौशल्य, मेहनत, अभ्यास, जिद्द, ध्येय, अविरत ध्यास अशा अनेक गोष्टींची आवश्यकता असते. अनेक प्रयासाने या सिद्धीपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे ज्यांना यश मिळाले त्यांना यशस्वी जीवनाचे शिल्पकार समजले जाते, अशांची संख्या फार मोठी नसते, परंतु त्यांचे यश हे सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. अशा काही यशस्वी मान्यवरांच्या शोधात लेखिका शिल्पा खेर आहेत. त्यांच्या यशाचे गमक, त्यांची मानसिकता, त्यांचा एकूण दृष्टिकोन, यशापयशाची मीमांसा या सगळ्यांचा शोध त्या घेत आहेत. या शोधाचा पहिला भाग यापूर्वी प्रकाशित झाला आहे. आता दुसरा भाग प्रकाशित झाला आहे.

या भागात एकूण अकरा मान्यवरांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातील डॉ. अनिल काकोडकर, विक्रम गोखले, अजित पारसनीस, डॉ. विठ्ठल कामत, मेधा पाटकर, डॉ. वि.ना. श्रीखंडे, प्रभाकर देवधर, हृषीकेश यादव, जस्टिस बी.एन. श्रीकृष्ण, सुमित्रा महाजन आणि दिलीप वेंगसरकर ही सगळी मान्यवर मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रांतली असून त्यांनी त्या क्षेत्रात आपला लौकिक प्राप्त केलेला आहे, व्यक्तित्वाचा ठसा उमटवलेला आहे. त्यामुळेच त्यांच्या नावापुढे अणुतूनी साकारिले ब्रह्मांड, नटसम्राट, लोकनायक, किमयागार, तपस्विनी, जस्ट ग्रेट अशी बिरुदावली लेखिकेने बहाल केलेली आहे. या सर्वांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा परीघ स्वतंत्र गाथेएवढा प्रचंड आहे. तो एका मर्यादेत मांडणे अशक्य आहे. परंतु लेखिकेने मोजक्या प्रश्नांसह त्यांच्या एकूण यशस्वी व्यक्तिमत्त्वाचा, कार्याचा, विचारांचा धांडोळा घेतलेला दिसून येतो. त्यासाठी एक प्रश्नावली तयार केली असून तिच्यातून हा प्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. कुठल्याही यशस्वी माणासासाठी चपखल बसतील असे ते प्रश्न आहेत.

आई-वडील, शिक्षक, गुरू, कर्तव्य त्याग, सत्यमेव जयते, भीती, सन्मान, यशापयशाचा-सामाजिक जाणिवेविषयीचा दृष्टिकोन, भारत देशाची आजची स्थिती, लोकसंख्या, ग्रामीण भाग, अशा विषयांची गुंफण करत मुलाखतीचे स्वरूप ठेवून एकेकाचे व्यक्तिमत्त्व फुलवलेले आहे. यात लालित्य असावे आणि आपण ज्या उद्देशाने हा प्रकल्प राबवत आहोत त्याच्या उद्दिष्टापर्यंत जाता यावे यासाठी कथानकाची सुंदर योजना केलेली आहे. ही एक सुंदर कल्पना म्हणता येईल. मान्यवरांच्या मुलाखतींचे संकलन करून वर्गात त्यांचे वाचन व विवेचन करायचे. असा उपक्रम विद्यार्थ्यांसमोर केला तर तो त्यांच्यासाठी प्रेरणा देणारा कल्पक उपक्रम ठरू शकेल असा लेखिकेला विश्वास आहे, त्यांच्या 'भाग्यश्री फाऊंडेशन'मध्ये असे विषय उपक्रम राबवले जातात. शिल्पा खेर या केवळ लेखिका नाहीत, तर एक संस्थाचालक, विद्यार्थी हा घटक समोर ठेवून त्यांना बहुउद्देशीय साहाय्य करणारी सक्रिय कार्यकर्ती आहेत. 'प्रयोगशील' लेखिका, समाजाचे दायित्व सांभाळणाऱ्या दातृत्वकर्त्या आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन हे इतरांहून वेगळे ठरते. त्यांचा आतापर्यंतचा एकूण लेखनप्रवास समाजभानाची जाणीव ठेवणारा प्रत्येक प्रवास आहे, संस्कारी प्रवास आहे. ''तुम्ही असं काहीतरी काम करायला हवं, ज्याचा समाजाला उपयोग होईल आणि तुमच्या मनाला त्यानं समाधान वाटेल.'' डॉ. अनिल काकोडकरांचे हे वाक्य लेखिकेने आत्मसात केलेले आहे, असे निश्चित म्हणता येईल.

''खरं यश म्हणजे तुमच्यावर झालेले चांगले संस्कार, जे तुमचा पाया मजबूत करतात. पैसे, प्रसिद्धी हे खरं यश नाही,'' विक्रम गोखले आपला सिद्धांत सांगतात. यशस्वी जीवन हे एकट्याचे नसते, समाजालाही ते मान्य असायला हवे, असे पारसनीस स्पष्ट करतात. ''यश मिळतं पण अंमलबजावणी होत नाही, तेव्हा ते अपयश ठरतं.'' हे मेधा पाटकर अनुभवातून सांगतात. ''जर तुम्ही strength, weakness, opportunity, threat यांचं गणित मांडलं नसेल, तुमचे कात आणि डोळे नीट उघडे नसतील तर १०० टक्के अपयश येणार,'' असं विठ्ठल कामत स्पष्ट करतात.

या सर्व मान्यवरांचे अनुभव उत्तमरीतीने वाचकांसमोर ठेवलेले आहेत, ते प्रेरक समाधान देण्यासाठी नक्कीच उपयुक्त आहेत.

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.**

## ग्रंथपान

**मालवणी भाषेतील वाक्प्रचार आणि हुमाणी**
**विद्या प्रभू**




**बोलीभाषेचे अलंकार**

''कोणत्याही भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार हे त्या भाषेचे ऐश्वर्य असते. संस्कृतीचा तो अनमोल ठेवा असतो. आपल्या भावना, कल्पना किंवा तत्त्वविचार हे साध्या-सरळ पद्धतीने न सांगता म्हणी किंवा वाक्प्रचार यांच्या रूपात मांडले तर भाषेला सौंदर्य येते आणि बोलणे प्रभावी होते.''

भाषेच्या समृद्धीसाठी शब्दकोशांची अधिकाधिक भर पडणे आवश्यक समजले जाते. त्याप्रमाणे संस्कृती आणि जनजीवनाची रहाटी यासाठी वाक्प्रचार व म्हणींची आवश्यकता असते. त्यामुळे भाषेचे केवळ वैभव वृद्धिंगत होते असे नाही तर त्या भाषेच्या विविधतेची कल्पना स्पष्ट होत जाते, त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य त्यातून व्यक्त होत राहते आणि त्याचप्रमाणे अशा वाक्प्रचाराचा व म्हणीचा वापर झाल्याने संबंधित व्यक्तीच्या व्यक्तित्वाचाही अमीट ठसा समोरच्या व्यक्तीवर उमटल्याशिवाय राहत नाही. त्यातून उलगडत जाणारी विविधता ही शेवटी भाषेच्या विविधतेत भर घालणारी ठरते.

विद्या प्रभू यांनी मालववण प्रदेशातील वाक्प्रचार आणि म्हणींचा संग्रह वाचकांच्या समोर ठेवला, नव्हे मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेत मोलाची भर घातली आहे. असा संग्रह करणे म्हणजे निबिड प्रदेशातून आपलीच वाट आपण शोधत ईप्सितापर्यंत पोहोचण्यासारखे आहे. समुद्राच्या तळाशी असलेल्या शिंपल्यातून एकेक मोती वेचून काढणे आणि त्यांचा सुंदर गोफ तयार करणे यासाठी लागणारे परिश्रम, कौशल्य आणि पारख असावी लागते, ती विद्या प्रभू यांच्याकडे आहे. त्यामुळेच हा सुंदर संग्रह साकारला गेला आहे. लोकसाहित्याचा, संस्कृतीचा, चालीरीतींचा एकेक शिंपला शोधून त्यांनी हे मोती गुंफलेले आहेत. यासाठी त्यांचे मनापासून कौतुक करायला हवे. 'अबोली', शब्दसौरभ', 'कोकणातील लोककथा आणि गजाली' यासारख्या प्रकाशित झालेल्या साहित्यातून त्यांची संशोधन वृत्ती, लोकसाहित्याचा, मालवण प्रदेशातील भाषेचा व्यासंग सिद्ध झालेला आहे. त्याच गुणांचा परिचय प्रस्तुत पुस्तकातून होतो.

मालवणी भाषेचा गोडवा आणि त्यातला तिरकसपणा सर्व मराठी वाचक-रसिकांच्या समोर आणला तो गंगाराम गवाणकर यांनी. त्याअगोदर या भाषेविषयीचा अभ्यास विष्णू सदाशिव सोहोनी, रा.ब. वासुदेव, अनंत प्रभू-बावर्डेकर, बा.रा. प्रभू यासारख्या अभ्यासकांनी या भाषेचे वैभव संशोधनाद्वारे अभ्यासकांच्या समोर आणले होते. विद्या प्रभू आज या संशोधकांच्या मांदियाळीत सामील झालेल्या आहेत.

वाक्प्रचार आणि हुमाणी, हुमाणी म्हणजे म्हणी, उखाणे. आतापर्यंत मराठीत आलेल्या कोशांमध्ये वाक्प्रचार व म्हणींचा अर्थ सांगितलेला आहे. परंतु विद्या प्रभू यांनी केवळ अर्थ सांगण्यापुरते आपले लेखन मर्यादित ठेवलेले नाही. वाक्प्रचार वा म्हणी, त्यात आलेल्या शब्दांचा प्रत्येकाचा स्वतंत्र अर्थ, त्याचे लिंग, त्याची पूर्वपीठिका वा संदर्भ आणि त्यास जोडून आलेली आख्यायिका वा उपकथानक ज्याला आपण इतिहासदेखील म्हणू शकतो, असा विस्तृत आढावा प्रत्येकाभोवती गुंफलेला आहे. उदहरणार्थ-

'कोचीचो हुंदीर'. हुंदरी म्हणजे उंदीर, अर्थ - केवळ संपन्न आणि प्रसिद्ध देशात राहिल्याने कोणी मोठा होत नाही. हा वाक्प्रचार जन्माला आला तो केरळमधील कोची बंदरात येणाऱ्या जहाजांमुळे आणि त्यात असलेल्या उंदरांमुळे. जहाजांची येजा होत राहते. परंतु उंदरांचे राज्य जहाजापुरतेच मर्यादित राहते. त्यावरून आलेला हा वाक्प्रचार, मोठ्या शहरात राहून आल्याचा रुबाब दाखवणार्यासाठी वापरण्यात येतो.

असे अनेक वाक्प्रचार हे विविध कारणांनी प्रचारात आहेत असे १०८ वाक्प्रचार यात आहेत. त्याचप्रमाणे म्हणी व उखाणे ९३ आहेत. ज्यांना हुमाणी म्हटले जाते. 'दोघा मत्सून इत्सेव न जाना', 'नथीत्सून तीर मारना', 'पावन्याच्या काठ्येन साप मरना' अशा म्हणी मराठी भाषेत आहेत तशाच परंतु मालवणी थाटात आलेल्या आहेत. परंतु

'झिपरी बाय आणली घरा।
ती म्हणता आधी पूजा करा।।'
'खाट खाट खुबो वाटेर हुबो।
तीन डोळ्यांचा बापूस तुजा।।'

अशा खास त्या ढंगातील म्हणी आहेत.

वाक्प्रचार, म्हणी, उखाणे यातून उलगडणारा सांस्कृतिक, लोकसाहित्याचा, भाषेचा थाट हा विद्या प्रभू यांनी अतिशय परिपूर्णतेने सजवलेला आहे. त्या भाषेचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी आणि चोखंदळ वाचकांसाठी एक उत्तम संदर्भग्रंथ म्हणून याचे स्थान मोलाचे आहे. प्रा. डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांनी दिलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संदर्भग्रंथाचे मर्म उलगडून दाखवणारी आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ सुंदर आणि साजेसे आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**


ग्रंथाली
PIXEL BY PIXEL DIGITAL MEDIA
साहित्याच्या पारावर
साप्ताहिक अक्षरमैफल
या लिंकवर पाहा – https://www.facebook.com/granthali.watch
यूट्यूबवर उपलब्ध
भाग १५
शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२०
भगवान इंगळे लेखक
अरविंद जगताप लेखक
सूत्रधार
अस्मिता पांडे
दोन साहित्यिक
आणि आपण...
दर शुक्रवारी भेटूया
सकाळी १० वाजल्यापासून उपलब्ध
ग्रंथाली फेसबुक पेजवर..
भाग १६
शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२०
संजय कृष्णाजी पाटील लेखक, कवी
मनोहर जाधव कवी
सूत्रधार
डॉ. लतिका भानुशाली
भाग १७
शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२०
कुमार सोहोनी लेखक
सदानंद डबीर गझलकार
भाग १८
शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२०
नरेंद्र लांजेवार लेखक
पद्मरेखा धनकर कवयित्री
सहकार्य
ZEE मराठी
संयोजक
सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, अरुण जोशी, राजू कदम,
धनश्री धारप आणि योगिता मोरे
किरण येले

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.